# दक्षिणेतील देवकथा

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय [illegible]
दा. क्र. १५४९८

IRBK-0115697

बाळकृष्ण बप



क्र : ५१८५७४५
१५६९८
१५।१।७५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

16 FEB 1975
20 MAY 1975
30 APR 1976

[ कृ. मा. प. ]

किशोर कथा :: ९ ::

# दक्षिणेंतील देवकथा

लेखक

बाळकृष्ण बर्वे

किंमत

मूल्य चार रुपये

IRBK-0115697

मंगल प्रकाशन : नागपूर १०

**प्रकाशिका :**

सौ. वीणा तिजारे,

मंगल प्रकाशन,

४, बजाज नगर,

नागपूर १०

**सर्वाधिकार :**

मंगल प्रकाशन

प्रथमावृत्ति
२० फेब्रुवारी १९७४

**मुद्रक :**

श्रीकांत रा. बेडेकर

मोहन प्रिंटर्स, कम्पोझिटर्स,

धंतोली,

नागपूर १२

**मूल्य चार रुपये.**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
दा. क्र. १५६२७ नों. दि. १५/७/८९
वि. बाल

## प्रकाशकीय

किशोर मित्रांना नित्य नवीन चांगलें व वाचनीय साहित्य देण्याच्या मंगल प्रकाशन, संस्थेच्या उपक्रमात आजपर्यंत " मंगलकथा ", भाग १ ते ४ " गोष्ट सांगते, ऐका " भाग १ व २ व "सुदंर गोष्टी" "तिरुपतीच्या कथा" प्रसिद्ध झाले आहेत. त्याचें महाराष्ट्रांतील कुमार मित्रांनीं, शाळाचालकांनीं स्वागत केलें व वृत्तपत्रांनीं पण कौतुक केलें आहे. आज किशोर मित्रांना आवडतील अशा कथांचें संकलन गोव्याचे सुप्रसिद्ध लेखक श्री. बालकृष्ण बर्वे " दक्षिणेंतील देव कथा " सादर करीत आहोंत, त्याचें किशोर वाचक स्वागत करतील अशी आशा आहे.

' दैनिक गोमांतक ' पणजी यांनी प्रकाशनार्थ परवानगी दिल्याबद्दल आभार. — लेखक.

दि. २० फेब्रुवारी १९७४

—प्रकाशिका

होतांच कर्ज काढून, शेजारचे गांवीं विवाह करून दिला. मुलीच्या काळजींतून मुक्त झाल्याचें समाधान बापाला मिळालें.

भोळसर स्वभाव आणि व्यवहारज्ञान बेताचें, यामुळें पतिगृहीं गोदावरी त्याज्य ठरून परत पित्याकडे पाठविली गेली. वृद्धपणांत मुलीचें हें दुर्दैव पित्याला दु:खदायक होऊन त्यानें अंथरूण धरलें. चार घरचीं मोलाचीं कामें करून गोदावरी आपणाबरोबर पित्याचा संभाळ करूं लागली. आचाऱ्याची मुलगी, त्यांतून नवऱ्यानें सोडलेली. तिला गांवांत प्रतिष्ठा ती काय असणार ? दोन वेळ अन्न घालण्याच्या उपकारांत गोदावरीला लोकांच्या घरीं सर्व कामें करावीं लागत. कधीं कोणी जुनी साडीचोळी वा रुपया दोन रुपये देई. गोदावरी यांतच समाधान मानून असे. दिवसा लोकांचीं कामें, रात्रौ वृद्ध बापाची सेवा, असा तिचा दिनक्रम होता. कोणी अपमान केला किंवा मोबदला न दिला, तरी ती कधीं रागावली नाहीं. " मीनाक्षीमाता मला देईल " म्हणून संतुष्ट असे. पहांटे उठतांच व रात्रौ निजतांना तिचें " मीनाक्षी स्तोत्र " कधीं चुकलें मात्र नाहीं.

गरीबी हें मनुष्याचें मोठें पाप आहे. वृद्धावस्था, उपासमार, कर्ज, गोदावरीची स्थिति अशा त्रिविध चिंतांनीं, एक दिवस गोदावरीचा बाप हें जग सोडून गेला, गोदावरीनें ओळखीच्या ठिकाणीं हात पसरून, बापाचें क्रियाकर्मांतर केलें. लवकरच सावकारानें गोदावरीला घराबाहेर काढून, बापाचें घर कर्जापोटीं ताब्यांत घेतलें. " घर सोडल्यावर अंगण परदेशी " अशी तिची दशा पाहून, दुसऱ्या एका दयाळू गृहस्थांनीं, आपल्या जागेंत एक झोपडी तिला बांधून दिली. मृत्युशय्येवरील बापाचा आधार संपुष्टांत आल्यानें, एकाएकी बनलेली गोदावरी, केवळ "मीनाक्षी-

माता माझा आधार" म्हणून जातो तो दिवस बरा असें समजून रहात होती.

अशाच एका सुखवस्तु सज्जनाचे (?) घरीं गोदावरी घरकाम व स्वयंपाकासाठीं राहिली होती. उठल्यापासून रात्रौ झोपेपर्यंत सारखा कामाचा पसारा ती उपशीत असे. कधीं विश्रांति घेण्यास कोणी सांगत नसे कीं, गोड शब्दांनीं तिच्या कष्टांची पावती मिळत नसे. उलट अपमान, कामांत चुका आणि आधार देऊन जगवण्याची जाणीव, पदोपदीं मिळे. अखंड कष्ट आणि विश्रांतीचा अभाव यामुळें तीन महिन्यांतच गोदावरीला ताप येऊं लागला पण तिच्या औषधाची कोणी चवकशी करीना. ती वैतागली आणि मालकिणीला निरोप देण्याची सूचना केली. औषधासाठीं पैशाचीहि मागणी केली.

कष्टाळू व लाचार गोदावरी सर्वांना हवी होती पण गरजू व मोबदल्याची अपेक्षित गोदावरी, कोणाच्या खिजगणतींत नव्हती. गोदावरीनें केलेली सूचना ऐकून, मालकिणीचा संताप झाला. तापाच्या निमित्तानें कामचोरीचा आरोप तिचेवर केला गेला. उलट जबाब न देता, 'आलिया भोगासी असावें सादर' म्हणून अंगांत ताप असतांहि, ती काम करूं लागली. रात्रौ क्लान्तदेह जमिनीवर टाकतांच तिचा ज्वर वाढला. पण तिची चौकशी कोणीच केली नाहीं. पहांटे ताप उतरला.

दुसरे दिवशीं, त्या घरचीं किरकोळ कामें आटोपून, तिनें घरीं जाण्याची सूचना मालकिणीस दिली व स्नानाला गेली. तिच्या बेतांत मोडता घालण्याची युक्ती, मालकीण शोधूं लागली. तिची नजर खुंटीवरील गोदावरीच्या फाटक्या लुगड्यावर पडली. स्नानांत गुंतलेल्या गोदावरीच्या नकळत, तिचें हें अब्रु-

रक्षणाचें एकुलतें एक जीर्ण वस्त्र, लपवून ठेवलें गेलें. गोदावरी सुकें लुगडें नेसण्यासाठीं आली तेव्हां तें मिळेना. तिनें तें आजूबाजूला पाहिलें, शेवटीं मालकिणीला विचारलें. "आमच्या घरांत कधीं कुणाची चिंधी हरवली नाहीं. तुझें लुगडें तुलाच माहीत. घरीं जाण्याच्या निमित्तानें आमच्या घरावर आरोप करूं नको. आमचें तुजवांचून अडत नाहीं. जायचें तर जा!" मालकिणीनें धमकावलें. गोदावरी अश्रु गाळीत, ओल्या वस्त्रानिशीं घरीं आली. आश्रय देणाऱ्या गृहस्थानीं तिची सर्व व्यवस्था करून दिली. औषधाची सोय केली.

झाल्या प्रकाराबद्दल गोदावरीला अत्यंत दुःख झालें. हे स्वार्थी लोक आपणाला प्रामाणिकपणें जगूंहि देत नाहींत, आपल्या कष्टांची कोणाला किंमत नाहीं, याचें तिला नवल वाटलें. रात्रौ निजतांना, "माते मीनाक्षी मला या दुःखांतून सोडीव" अशी तिनें, कळवळून प्रार्थना केली. कपटी व निर्दयी जगाचा, तिला पुरेपूर वीट आला होता. आपलें बालपण, बापाची माया, पतिगृह आणि प्राप्तस्थिति यांचा विचार करीत, ती कितीतरी वेळ अंथरूणावर पडली होती. तिनें मनाशीं निश्चय केला बस्स! सकाळीं भल्या पहांटे उठून, मंदिरासमोरील पुष्करिणींत उडी टाकून, जिवाचा अंत करायचा विचार पक्का ठरला. तिच्या मनाला समाधान वाटलें. सुखानें ती झोंपीं गेली.

पहांटे तिला स्वप्नांत मीनाक्षीमातेचें 'दर्शन' झालें. 'गोदावरी, प्राणत्यागाची आवश्यकता नाहीं. ही माझी रत्नमाला घे. गावांतील दुर्गादास महाजनाकडे सकाळीं नेऊन दे. तो तुला १०० सुवर्णमुद्रा देईल. त्या आणून क्षेत्रांत यात्रेकरूं-

साठीं खानावळ सुरू कर. दुर्गादास महाजनाला मी सूचना दिली आहे. मनांत शंका धरूं नको. तुझा धंदा बरा चालेल असा माझा आशीर्वाद आहे. एक वर्षांत महाजनाचें कर्ज फेडून, माझी माला परत कर. सकाळीं मंदिरांत जाऊन, माझें तीर्थ प्राशन कर. ताप जाईल, सुखी अस.'

गोदावरी जागी झाली. पहाते तों, खरोखरच देवीची रत्नमाला जवळ ठेवलेली ! मालेंतील रत्नमणि चकाकत होते. गोदावरीचा कंठ दाटून आला. मातेची भक्तिभावानें तिनें प्रार्थना करून, हात जोडले. आतां तिचे अंगीं ताप नव्हता. अशक्तपणाऐवजीं हुशारी व उत्साह ओसंडत होता. माळ पदराला बांधली. घरांतील किरकोळ कामें उरकून स्नान आटोपलें व ती मंदिरांत गेली. खरोखरच मातेच्या गळयांत नित्याचा रत्नहार नव्हता. श्रद्धेनें मातेला हात जोडून व तीर्थप्राशन करून, ती तडक दुर्गादास महाजनाकडे गेली. तिला पाहतांच १०० सुवर्णमुद्रा आणून, त्यानें तिच्या पुढयांत ठेवल्या व माला ठेवून घेतली. दुपारी भोजनास थांबवण्यास आग्रह केला. भोजनोत्तर तिचा महाजनपत्नीनें, लुगडें, चोळी व नारळ देऊन सत्कार केला व सायंकाळीं गोदावरी घरीं आली. पहांटेच्या स्वप्नांतील, देवीच्या सूचनेमुळें तिला या परिवर्तनाचें नवल वाटलें नाहीं. मीनाक्षीमातेवर श्रद्धा ठेवून तिनें खानावळ चालू केली.

देवीच्या गळयांतील रत्नहार चोरीला गेल्याचें पुजाऱ्यानें पाहिलें. त्यानें इतर पुजारी, महाजन वगैरेंना ती गोष्ट कळविली. हाराच्या शोधासाठीं देवीला कौल लावण्यांत आला. ' हार सुरक्षित आहे योग्य वेळीं मिळेल, चौकशी कोणी करूं नये. ' असा कौल मिळाला. सर्वजण गप्प बसले.

पण देवीची इतकी कृपा असणारा भाग्यवान भक्त कोण हें जाणण्याची उत्सुकता प्रत्येकाला लागली होती. परंतु हार मात्र कुठेंच आढळत नव्हता.

एक वर्ष संपत आलें. गोदावरीची खानावळ भरभराटीस आली होती. तिनें आतां कामासाठीं स्त्रिया व गडी ठेवले होते. फक्त व्यवस्था पाहण्याचेंच ती काम करी. कोणी कांहीं विचारल्यास 'मातेची कृपा' असें नम्रपणें उत्तर देई. यात्रेकरू गोदावरीच्या सेवेनें संतुष्ट होत. तिचें कल्याण इच्छित. या लोकसेवेनें गोदावरी मनोमन सुखावे. धनाचा अहंकार तिला कधीं जडला नाहीं कीं कधीं कुणाचा अपमान तिनें केला नाहीं. स्वच्छ व शुभ्र अशा धड वस्त्रांखेरीज, ती कधीं उंचीं वस्त्रें ल्याली नाहीं कीं, मीनाक्षीमातेचें 'स्तोत्र पठण' कधीं विसरली नाहीं. गोरगरीब व अडल्या नडलेल्यांस अन्न, वस्त्र आणि द्रव्य यांची मदत देण्यास चुकली नाहीं. तिची ही उर्जितावस्था, केवळ त्याच लोकांना पाहवली नाहीं कीं, ज्यांच्याकडे ती पूर्वीं कामें करीत असे. त्या लोकांनीं रत्नमालेच्याबाबतींत गोदावरीवर संशय व्यक्त केला. पण दुर्गादास महाजनाकडून, परस्पर निराकरण झालें. शिवाय मालेची चौकशी न करण्याचा, देवीचा आदेश असल्यानें, ते स्वस्थ होते.

बरोबर १ वर्ष संपतांच तिनें देवीची रत्नमाला सोडवून आणली. आपणाकडील सर्व द्रव्य खर्चून, गोदावरीनें तसलीच दुसरी रत्नमाला व इतर रत्नजडित अलंकार खरीदले आणि एका शुभमुहूर्तावर ती मंदिरांत गेली. मूळ रत्नमालेची कथा सर्वांस विदित करून, स्वतः बनविलेले दुसरे अलंकार व ती रत्नमाला भोळ्या भक्तिभावानें तिनें देवीपुढें ठेवून हात जोडले.

सर्वांना आश्चर्य वाटलें आणि गोदावरीबद्दल, त्यांनीं देवीकडे क्षमायाचना केली. तिचा गौरव केला.

क्षेत्रांतील मातेची परमभक्त म्हणून, गोदावरीला सन्मान मिळूं लागला. पूर्वीं छळ केलेलीं माणसें तिची क्षमायाचना करूं लागलीं. पण गोदावरीचा कुणावरच राग नव्हता. मीनाक्षी-मातेवर श्रद्धा ठेवा हेंच ती सर्वांना सांगे.

गोदावरीची पालटलेली स्थिति व लौकिक तिच्या पतीच्या कानीं गेला. त्याला पश्चात्ताप झाला. मनांत शरमिंदा होऊन तो एके दिवशीं गोदावरीला भेटण्यास आला. "मला क्षमा कर व पति म्हणून पदरांत घे" अशी त्यानें गोदावरीची विनवणी केली. सरळहृदयी गोदावरीनें पतीलाच आपला स्वीकार करण्याची विनंति केली. सर्व व्यवहार तिनें पतिचरणीं अर्पण केला व मीनाक्षी मातेच्या दर्शनास चलणेची विनंति केली. तो तिच्या परमसुखाचा क्षण होता. पतीसह मोठ्या आनंदानें, तिनें मीनाक्षी मातेचें दर्शन घेतलें. "सदैव कृपादृष्टि ठेव" असा आशीर्वाद मागितला. गोदावरीच्या थोर मनाची ओळख पटलेल्या, तिच्या पतीनेंही श्रद्धेनें हात जोडले. देवीचा तीर्थप्रसाद भक्तिपूर्वक सेवन करून तीं दोघें परतलीं. गोदावरीचा संसार सुखानें झाला. हेवा वाटेल असा.

गोदावरीच्या कष्टांची, भक्तीची व सुखी संसाराची ही कथा, अद्यापही मीनाक्षी दर्शनास जाणाऱ्या यात्रेकरूंना मोठ्या श्रद्धेनें ऐकविली जाते.

* * *

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. १५६६० नों. दि. १५/११/०५
वि. ......

कथा दुसरी.

# श्री रं गा ची से वा

---

श्रीरंग, हें दक्षिणेंतील कावेरी नदीकांठचें प्रमुख तीर्थक्षेत्र. 'श्रीरंगनाथस्वामी' हें येथील मुख्य दैवत. हें सुंदर मंदिर नदीकांठावर असून, या देवतेच्या दर्शनाशिवाय रामेश्वरयात्रेचें फल पदरीं पडत नाहीं अशी भक्तांची श्रद्धा आहे. येथील कावेरी मातेच्या स्नानानें शुद्ध होऊन, शाश्वत सौभाग्यासाठीं स्त्रिया विविध दानें देतात आणि कुलक्षय न व्हावा म्हणून, श्रीरंगनाथाची विधियुक्त पूजाकरून मिळणारा प्रसाद, पुरुष आपल्या घरीं जपून ठेवतात. तिकडील परिसरांत भक्तांत ती परंपरागत श्रद्धा आहे. वंशवृद्धि व चिरसौभाग्य यांच्यासाठीं, या क्षेत्रांत स्त्री-पुरुषांची नेहमीच गंगास्नान, दर्शन व प्रसादाकरितां गर्दी होत असते.

या श्रीरंगम् क्षेत्रांत धनपाल नांवाचा एक तरुण व्यापारी होता. हा व्यापारी अत्यंत श्रीमंत, गर्विष्ट व नास्तिक होता. लहान वयांतच बाप वारल्यामुळें, धनपाल एकंदर व्यवहाराचा मालक झाला होता. केवळ मिळवणें व त्यावर चैन करणें, हाच

त्याचा नित्य व्यवसाय बनला होता. पित्यापूर्वीच माता काळवश झाली होती आणि एकुलता एक पुत्र म्हणून, बापाचा लाडका धनपाल बापाच्या हयातींत आणि नंतरही, बेताल वागत होता. दुकानांतील मुनीम हा प्रामाणिक असल्यामुळें, व्यापार व्यवस्थित चालला होता. धनपालला कसलेच कष्ट नव्हते. लवकरच धनपाल मित्रांच्या संगतीनें सर्व व्यसनांत तरबेज बनला. बापानें ज्या श्रीरंगनाथाच्या कृपेनें, हें ऐश्वर्य आपल्याला मागें ठेवलें त्या, श्रीरंगनाथाला मानण्यासहि तो तयार नव्हता.

धनपालाचें वैभव सर्वश्रुतच होतें. तरुणवय होतें आणि या सर्व ऐश्वर्यांचा उपभोग घेणारा, एकटा धनपालच होता. अर्थात जवळच्याच गांवची एक सुस्वरूप व्यापारीकन्या, धनपालाला सांगून आली. धनपालानें होकार दिला. लवकरच त्यांचा थाटामाटानें विवाहही झाला. धनपाल संसारी बनला. निर्मला ही धनपालाची पत्नि-स्वगृहीं आल्यावर पतीचें ऐश्वर्य व सत्ता पाहून, तिला प्रथम आपल्या भाग्याचा हेवा वाटला. स्वतः निर्मला नम्र, सुस्वभावी, देवधर्मावर गाढ श्रद्धा बाळगणारी होती. पतिगृहींचे आरंभीचे कांहीं महिने, तिला सुख मिळालें परंतु, लवकरच पतीच्या ठायीं माणुसकीचा लवलेशही नाहीं याची तिला खात्री पटली. पतीच्या नास्तिकपणा पाहून ती मनांत दुःखी झाली. वैभवाची तिला किंमत नव्हती पण, पति गुणवान व्हावा या अपेक्षेनें, ती नित्य गंगामाता व रंगनाथ यांची आराधना करूं लागली.

पतीच्या दुर्वर्तनाच्या नाशासाठीं, निर्मला जोजो व्रतवैकल्यें करी, उपवास, पूजा, नवस करी तों तों, धनपालाचा नास्तिकपणा वाढूं लागला. या मूर्ख उपचारांत व्यर्थ धनव्यय होतो.,

अशी समज तो निर्मलेला देऊं लागला. निर्मला ऐकत नाहींसें पाहून, तो तिला कठोर शब्दांनीं दुखवूं लागला. आणि एके दिवशीं रात्रीं, आपली नित्यपूजा आटोपून, भोजनासाठीं पतीची वाट पहात बसलेल्या निर्मलेला, चांगला धडा शिकविणेच्या हेतूनें धनपालानें, निर्मलेच्या हातचें तीर्थ फेंकून, देवही लाथेनें उडवून लावला. निर्मलेला फार वाईट वाटलें. त्यारात्रीं धनपाल जेवला नाहीं आणि त्यामुळें निर्मलेलाहि उपवास घडला. घरच्या सेवकासमोर झालेल्या विटंबनेचें शल्य निर्मलेला अधिक जाणवलें. परंतु देव पतीला सद्बुद्धि देईल अशी तिची दृढ श्रद्धा होती आणि तशीच प्रार्थना करून, ती उपाशी निजली.

त्याच वर्षीं श्रीरंगम क्षेत्राच्या परिसरांत, पर्जन्यांभावीं दुष्काळ पडला. पाणी नाहीं कीं धान्य नाहीं अशा अवस्थेंत माणसें, जनावरें, पक्षीं उपाशीं मरूं लागले. धनपालाकडे धान्याचीं कोठारें भरलेलीं होतीं. लोकांनी त्याची धान्यासाठीं याचना केली, परंतु धनपाल द्रवला नाहीं. उलट कोठारांना जास्त कुलपें ठोकून बंदोबस्तांत धान्य ठेवलें. कित्येकपट किंमत मिळवून, आणखी श्रीमंत व्हावें हा त्याचा हेतु होता. एके दिवशीं मंदिराचे पुजारी, धनपालाकडे नित्याच्या नैवेद्यासाठीं धान्य मागण्यासाठीं आले. धनपालानें देवाला ओळखत नसल्याचें सांगून, त्यांना हांकलून दिलें. ही गोष्ट निर्मलेला कळतांच, तिनें आपल्या दासीकरवीं निरोप पाठवून, पुजाऱ्यांना बोलावून घेतलें आणि घरांतील धान्य दिलें. हें वृत्त धनपालाला दुकानीं कळतांच, तो क्रोधानें लालबुंद होऊन, घरीं आला व निर्मलेकडे एक तिरस्कृत नजर टाकून, त्यानें तिला लाथ मारली. निर्मला त्यावेळीं गरोदर होती. लाथ मारतांच ती खालीं पडली आणि गर्भपात होऊन बेशुद्ध झाली.

पत्नीला लाथ मारून, धनपाल बाहेर आला तोंच, त्याच्या पायांतून असह्य कळा येऊं लागल्या. त्याच्यानें उभें राहवेना म्हणून तो बिछान्यावर आडवा झाला. परंतु वेदनांमुळें त्याला चैन पडेना. पत्नीवर कोणता प्रसंग गुदरला याचीही त्याला शुद्ध नव्हती. घरांतील नोकरांनीं सर्व व्यवस्था केली. निर्मला शुद्धीवर आल्यानंतर तिला पतीची व्यथा जाणवली. धनपाल एकसारखा वेदनांनीं आक्रोश करीत होता, शेवटीं निर्मलेच्या सांगयावरून, नोकरांनीं पाणी पाजण्याच्या मिषानें, देवाचें तीर्थ पाजल्यावर धनपालाला आराम वाटला. परंतु त्यानें निर्मलेची विचारपूस केलीं नाहीं.

त्याच रात्रीं धनपालाचें दुकान व कोठारें लुटलीं गेलीं, धनपाल एका रात्रींत गरीब झाला. पण याचा दोष त्यानें निर्मलेवर व देवावर ठेवला. आपला पति नक्कीच एक दिवस पस्तावेल अशी तिची खात्री होती. अर्थात् ज्या संपत्तीच्या जोरावर, धनपाल माणुसकी विसरला ती संपत्तीच नष्ट झाल्याबद्दल निर्मलेला खरोखर आनंद झाला. यापुढें तरी धनपाल सुधारेल ही तिची भावना.

लवकरच निर्मला बरी झाली व ती स्वतः धनपालाची सेवा करूं लागली. औषधी उपायाबरोबरच, ती श्रीरंगनाथाचें तीर्थ श्रद्धेनें त्याला पाजूं लागली. अवध्याच महिन्यांत धनपालाचा पाय बरा झाला. निर्मलेच्या थोर मनाची त्याला ओळख पटली. पण तसें प्रत्यक्ष बोलावण्याचें धैर्य त्याच्यांत नव्हतें तरीसुद्धां निर्मला सांगेल ते, निमूटपणें करून तो मोकळा होई. त्याच्या नकळत निर्मलेनें, श्रीरंगनाथस्वामीचा नित्य नैवेद्य चालूच ठेवला होता.

निर्मलेच्या सेवेनें धनपालाच्या माणुसकीला आव्हान दिलें होतें. तो आतां तिच्या वचनांत वागूं लागला. पुढील वर्षी पाऊस पडला. लोक सुखी झाले. धनपालाला पुन्हां व्यापार करण्या-साठीं, निर्मलेनें आपले सर्व अलंकार दिले. धनपालाचा व्यापार पूर्वीप्रमाणें चालू झाला. त्याला पूर्ववैभव प्राप्त झालें. पूर्वस्थिति प्राप्त होतांच, धनपालाचा मूळ स्वभावही जागृत झाला. पण तो निर्मलेला वचकून असे. निर्मला एकीकडे त्याला सुधारण्याच्या प्रयत्नांत असतां, संततीसाठीं म .ोमन झुरत होती. अद्याप तिची कूस उजवली नव्हती. घरांत कुलदीपक नव्हता. वंशरक्षणासाठीं तिनें गंगामातेची व रंगनाथाची सेवा चालू ठेवली.

कितीक वर्षे लोटलीं. धनपाल वृद्ध होत चालला. संतती-साठीं निर्मलेची आराधना चालूच होती, पण ती निराश बनतच चालली होती. तिला जीवनाचा वीट आला होता. धनपालालाही हल्लीं या गोष्टीची अंधुक जाणीव होत असे. उतारवयानुसार त्याचा स्वभाव शांत होत होता. पण, अंत:करण पाश्चात्तापानें पूर्ण शुद्ध नव्हतें. तरी सुद्धां निर्मलेच्या आग्रहामुळें तो हल्लीं श्रीरंगनाथस्वामींची प्रार्थना करूं लागला होता. क्वचित् पूर्वा-युष्यांतील आठवणींनीं त्याला खंत वाटें पण तें क्षणिक ! आतां ते जुने मित्रही नव्हते. निर्मलेला मात्र सर्वत्र आदर होता.

अखेर गंगामाता व श्रीरंगनाथानें त्या उभयतांची कसोटी पाहण्याचें ठरविलें. एके दिवशीं एक संन्यासी धनपालाच्या दारीं आला. निर्मलेनें त्याचें स्वागत करून भोजनास थांबण्याची विनंति केली. संन्यासी थांबला. निर्मलेनें त्याची सेवा करून मिष्टान्न भोजन देऊन, त्याला प्रसन्न केलें. तिसऱ्या प्रहरीं निघ-तांना 'इच्छा असेल तें मागून घे' असें संन्याशानें सांगितलें.

निर्मलेनें पुत्रफलाची इच्छा बोलून दाखविली. 'पुत्र मिळेल पण जन्मानंतर १ महिन्याचे आंत तो श्रीरंगनाथासमोरील गंगाजलांत अर्पण करावा लागेल. आहे मान्य ?' संन्याशानें प्रश्न केला. निर्मलेनें दुःखी मनानें संमति दिली. आशीर्वाद देऊन संन्यासी निघून गेला, वांझपणाचा दोषांतून तरी मुक्तता झाली या समाधानांतून निर्मला आपली दैनंदिन ईश्वरोपासना आत्मविश्वासानें करूं लागली.

लवकरच निर्मलेला दिवस गेले. तिला फार संतोष झाला. तिनें देवाला हात जोडून, बाळाला आयुष्य देण्याबद्दल प्रार्थना केली. हे दिवस तिच्या आयुष्यांत सुखाचे गेले. प्रसूतीसाठीं निर्मलेला माहेरीं जाण्याची इच्छा झाली. पतीच्या मान्यतेनें ती माहेरी गेली. योग्य वेळीं तिला निरोगी बाळ झाला. मनोमन तिनें संन्याशाचे व दैवाचे आभार मानले. थाटामाटानें नामकरण झालें. बाळाचें नांव 'श्रीरंग' ठेवण्यांत आलें. निर्मला फार सुखांत होती. परंतु धनपालाला वृद्ध व अनारोग्य यामुळें अजून पुत्रमुख पाहता आलें नव्हतें. म्हणून निर्मला दुःखी होती.

मुलाच्या २८ व्या दिवशीं निर्मला, त्याला घेऊन घरीं येण्यास निघाली. संन्याशाच्या शब्दांनीं तिचें मन भरून गेलें होतें. ती मुदत जवळ आली होती. बाळाच्या आयुष्याच्या चिंतेनें ती मनांत जळत होती. तिचे गृह जवळ येत होतें. तिच्या डोळ्यांतून सतत अश्रुप्रवाह चालू होता. ती श्रीरंगनाथस्वामी मंदिरासमोर पलीकडच्या कावेरी कांठीं पोचली. तेथें तिनें थोडी विश्रांति घेतली व नदीपात्रांतून पुढें जाण्यास सज्ज झाली. तों काय ! तो पूर्वीचाच संन्यासी तिला, आपल्या वचनाची आठवण देण्यासाठीं उभा असलेला दिसला, निर्मलेनें बरोबरच्यांना पुढें

होण्यास सांगितलें. आपण एकटीच मागें राहिली. "निर्मला. वचनपालनाला हीच योग्य वेळ आहे," संन्यासी म्हणाला. निर्मलेनें होकार दिला. मन घट्ट केलें. आपल्या बाळाचे मुके घेतले. गंगेची प्रार्थना केली आणि अर्ध्या पात्रांत आल्यावर, इतरांची दृष्टी चुकवून, तिनें तें सुंदर बाळ गंगार्पण केलें. अश्रु पुसून जणु कांहीं घडलेंच नाहीं अशा थाटांत, वरकरणीं हास्य-मुद्रेनें तिनें बाळाला घेऊन येत असल्याचें, इतरांना भासविलें. कांठावर येतांच इतरांना पुन्हां पुढें चलण्याचा इशारा तिनें दिला. ती एकटीच उरली व त्याचवेळीं तो संन्यासी, तिच्यापुढें येऊन त्यानें तिच्या ओटींत, एक शुभ्रस्फटिक टाकला. 'घरीं जातांच हा पाळण्यांत ठेव' संन्यासी म्हणाला व देवमंदिरासमोर जाऊन गुप्त झाला. निर्मलेला यांतच कांहीं रहस्य असल्याची, जाणीव होऊन दुःखांत सुख वाटलें. तिनें गंगेची पुन्हा प्रार्थना केली. श्रीरंगनाथाचें दर्शन घेतलें व घरीं जाण्यास निघाली. परंतु घरीं जातांना तिला प्रसन्नता वाटत नव्हती. सारखे अमंगल विचार मनांत येत होते. बाळाचें दुःख होतेंच. त्यांत, पतीची चिंता वाढली होती. आतां पतीला कसें सांगावें ? या विचारांत चूर असतांनाच ती घरीं पोंचली.

संन्याशानें सांगितल्याप्रमाणें ती प्रथम घरांत गेली व शुभ्र स्फटिक तिनें पाळण्यांत ठेवला तों काय ! नुकताच तिनें गंगार्पण केलेला तिचा बाळ हंसत, तिजकडे पहात होता. तिला अत्यानंद झाला. बाळाला उचलून ती तडक पतीकडे जाण्यास निघाली. परंतु ती खोलीच्या दारांत पोंचली तों, सेवकांनीं तिला थांबविलें. कोणी कांहींच सांगेना. काय प्रकार आहे हें तिला कळेना. शेवटीं दासीकडे बाळाला देऊन ती, हट्टानें पुढें गेली. धनपाल जिवंत

नव्हता ! एकीकडे मृत्युमुखांतून परत मिळालेल्या बाळाचा आनंद तर त्याचवेळीं, वैधव्याची कुऱ्हाड मस्तकीं कोसळलेली ! या मानसिक धक्क्यानें ती सुखदु:खाच्या सीमेपलीकडे पोचली. नुकतेंच तिला वैधव्य प्राप्त झालें होतें. पति गमावून तिला पुत्रप्राप्ती झाली होती. केवळ रंगनाथावर विश्वास ठेवून, आल्या प्रसंगाला तिनें धैर्यानें तोंड दिलें. धनपालाला सद्‌गति मिळावी म्हणून, तिनें सर्व विधी यथासांग करून अपार दानधर्म केला.

श्रीरंग हेंच आतां निर्मलेचें सर्वस्व होतें. तो गुणी, कर्तबगार व देवभक्त व्हावा म्हणून, ती अहोरात्र रंगनाथाची विनवणी करी. असे ३ महिने लोटले. एके दिवशीं रात्रीं, तिचे स्वप्तांत तो परिचित संन्यासी आला. संन्यासी म्हणाला, "नर्मला, धनपालाला पुत्रसुख नव्हतें. त्यानें आपल्या दुष्कृत्यांनीं श्रीरंगनाथाची अवकृपा ओढून घेतली. परंतु तुझ्या निष्ठायुक्त भक्तीनें त्याला करुणा आली. हा पुत्र म्हणजे तुझें सेवाभक्तिफल आहे. कुलक्षय टळला आहे. हा मुलगा तुला सुख देईल. भावी आयुष्यांत धनपालाचे विचार सोडून, या बाळाकडे लक्ष पुरव. श्रीरंगनाथाचा तुला व बाळाला आशीर्वाद आहे." संन्यासी गुप्त झाला.

आईच्या उत्तम शिकवणीनें श्रीरंग पुढें गुणी निघाला. आपल्या पित्याची कथा, त्याला निर्मलेकडून समजली. प्रामाणिकपणें व्यापार करून त्यानें पुष्कळ धन मिळविलें व सारें दानधर्मात वेंचलें. श्रीरंगाची मातृभक्ति, गंगाभक्ति आणि श्रीरंगनाथभक्ति प्रखर होती. आपल्या मातेच्या पश्चात् त्यानें श्रीरंगनाथस्वामी मंदिरासमोर यात्रेकरूंच्या सोईसाठीं एक घाट बांधला. तोच श्रीरंगम्‌चा 'निर्मल घाट.'

* * *

कथा तिसरी.

# श्री दत्त प्रसाद

मानवाच्या कल्याणासाठीं, उद्धारासाठीं जे ईश्वरी 'अवतार' प्रसिद्ध आहेत, त्यांत 'श्रीदत्तात्रेय' हा अवतार फार प्रसिद्ध आहे. ब्रह्मा, विष्णु व महेश यांचा संयुक्त अवतार म्हणजे दत्तावतार. अत्रिपत्नि अनसूया हिचे पोटीं दत्त-जन्म झाला. खरें म्हणजे सती अनसूयेची सत्वपरीक्षा पाहण्याच्या अहंकारापोटीं, या तिन्ही देवांना पुत्ररूपानें अनसूयेच्या घरीं राहणें भाग पडलें. ईश्वरावतार हे 'अयोनिसंभव' मानतात. दत्तांची जन्मकथाहि अशीच मजेदार आहे. योगेश्वर म्हणून दत्तांचा लौकिक असून, त्यांचा संचार सर्वत्र असतो अशी भक्तांची श्रद्धा आहे.

दक्षिण भारतांत 'सुचिंद्रम' या पुण्याक्षेत्रांत अवतार धारण केला असें मानतात. या पुण्यभूमींत ब्र व महेश यांचीं भव्य मंदिरें आहेत. दत्तांचे माता अनसूया यांचींही स्वतंत्र मंदिरें येथें असून, भारत दोन्ही मंदिरें अभावानेंच आढळतात. शिवाय हनुमंताचा भव्य

मूर्ति असून, पूजाविधी शिडी लावून होतो. नृसिंहवाडी, गाणगापूर, औदुंबर, पाताळगंगा, सांखळी या दत्तक्षेत्रांप्रमाणेंच 'सुचिंद्रम' दत्तस्थान म्हणून व त्यांच्या मातापित्यांच्या स्वतंत्र मंदिरामुळेंही प्रख्यात आहे. दत्तगुरूंच्या भक्तीनें, नामस्मरणानें पिशाच्चबाधा नष्ट होतें व पिशाच्चें त्यांना थरकांप भितात असा भक्तांचा अनुभव आहे.

या सुचिंद्रम क्षेत्रांत, कमलाकर नामें एक वेदविद्यापारंगत, धर्मपरायण व पापभीरू ब्राह्मण राहत असे. सचोटी, नम्रता व परोपकारी वृत्ति यामुळें त्याला आणि आतिथ्य, पातिव्रत्य, सुगरणपणा या गुणामुळें त्याची पत्नि लक्ष्मी हिला क्षेत्रांत मान मिळत असे. चार घरचीं धर्मकृत्यें करून कमलाकर आपला निर्वाह चालवी. क्षेत्रांतील सर्व देवतांचें पूजन तो नित्य नेमानें करी. सायंकाळीं श्रद्धेनें दर्शन घेई. घरीं परततांना तो वाटेंत एका तळ्याकांठीं थोडा वेळ विश्रांति घेई. मावळत्या सूर्यनारायणाकडे हात जोडून प्रार्थना करी कीं, 'हे भगवान्, सर्वांचें दु:ख दैन्य नष्ट करून त्यांना सुखी कर' त्याच्या या नित्यक्रमांत क्वचितच खंड पडे. हा नित्यक्रम चालू होता.

असाच एके दिवशीं आपली नित्यप्रार्थना आटोपून कमलाकर घरीं चालला असतां, तेथल्याच एका चंपकवृक्षाखालीं, त्याच्यासमोर एक पिशाच्च प्रकटलें. कमलाकर भ्याला. पण पिशाच्च स्नेहवाणीनें म्हणालें, "कमलाकर भिऊं नकोस. मजपासून तुला ... होणार नाहीं. तुझ्या नित्य प्रार्थनेमुळें माझा कांहीं हेतु साध्य
प्रखर ग आशेनें माझी तुजकडे एक मागणी आहे. पहा, कबूल
मंदिरास कामगिरी सांगतों."
श्रीरंगम्चं ती कामगिरी ?" कमलाकर.



२ द. क.

" या क्षेत्रांत आपल्या मातापित्यांच्या दर्शनार्थ, श्रीदत्तगुरु मधून मधून येत असतात. विश्रांतीसाठीं ते याच तळ्याकाठीं येत असतात. ते आल्याची सूचना मजकडून मिळतांच, तूं त्यांचे- कडे जाऊन एकदम पाय धर व त्यांना पंक्तिलाभ देण्याची विनंति कर. पुढील बेत मी नंतर सांगेन. पण दत्तांनीं विनंति मान्य केल्याशिवाय पाय सोडायचे नाहींत हें पक्कें ध्यानांत ठेव !" पिशाच्च.

" या कृत्यामागील हेतु कोणता ? इतकी माझी पुण्याई आहे ?" "कमलाकर, या क्षेत्रांत केवळ तुझीच इतकी पुण्याई आहे. दत्तात्रेय कधीं भिकारी तर कधीं साधु अशा वेषांत येथें विश्रांतीस्तव बसतात. मी गुरूंच्या शापामुळें ही पिशाच्चयोनी भोगीत आहे. धनी ब्राह्मण मातापित्यांचा मी एकुलता एक पुत्र. विद्याध्ययनासाठीं पित्यानें मला शिवमंदिरांतील गुरूकडे ठेविलें होतें पण मी अध्ययन न करतां उद्धटपणानें वागलों. गुरूंचीही थट्टा केली. प्रथम गुरूंनीं मला पुष्कळ बोध केला पण त्याचा उपयोग न होतां मी एके दिवशीं त्यांचा अपमान केला, त्याचें पर्यवसान या योनींत पडून, हे क्लेश भोगण्यांत झालें. शाप मिळाल्यावर मी शुद्धीवर आलों. माझ्या व सहविद्यार्थ्यांच्या पुष्कळ विनवण्यांवरून, 'दत्ताचें उच्छिष्ट सेवन केल्यास मुक्ति मिळेल,' असा गुरूंनीं उःशाप दिला. माझ्या या शापाची हकीगत ऐकून माझे मातापिताही दुःखानें मृत्यु पावले व आज हजार वर्षे तेही सर्परूपानें येथेंच वावरत आहेत. ही ओसाड जागा त्यांचीच असून, जमिनींत तळघरांत त्यांचें धन आहे. कमलाकर, केवळ मजमुळेंच माझे आईबाप, हें दुःख भोगीत आहेत. माझा उद्धार करण्याचें पुण्यकृत्य तूं मनावर घेतल्यास, त्यांचाही उध्दार

होणार आहे. मग तें सर्व धन मी तुलाच देईन. कमलाकर, मला एवढी भिक्षा घालच."

"मी ही गोष्ट अवश्य करीन. मला धनाची इच्छा नाहीं. श्रीचें आगमन होईल तेव्हां सूचना दे." पिशाच्चाविषयीं विचार करीत कमलाकर घरीं आला. लक्ष्मीला त्यानें सर्व कथन केलें. रात्रौ निद्रासमयीं त्या दोघां पतिपत्नींनीं, पिशाच्चाची मुक्ती साधण्यांत यश देण्याबद्दल दत्तांचीच प्रार्थना केली. पिशाच्चही आनंदित झालें व योग्य संधीची वाट पाहात राहिलें. कमलाकराला देवपूजेसाठीं, नित्य पहांटे सुंदर व सुगंधित पुष्पें, त्याच्या तुलसीवृंदावनाकडे ठेवून, त्याच्या करवीं स्वतःची ईशसेवा, तें पिशाच्च रुजू करूं लागलें. रोज प्रातःकालीं फुलें गोळा करण्याचे कमलाकराचे श्रम, अशात-हेनें वांचले. लक्ष्मीलाही सुंदर सुंदर फुलें वाहून, आपलें देवघर सुशोभित राखण्याचें समाधान लाभलें. पूजासमयीं नित्य पिशाच्चाच्या उद्धाराची, ती प्रार्थना करी.

लवकरच एके दिवशीं सायंकाळीं, तळ्याकाठीं नित्यक्रमानुसार कमलाकर बसला असतां, दत्तांची स्वारी जवळच्याच औदुंबर वृक्षाखालीं बसली असल्याचें पिशाच्चानें सांगितलें. "कमलाकर, दत्तमहाराज साधुवेषांत असून तूं जवळ जाऊं लागतांच, त्यांचा श्वान तुझ्या अंगावर धावेल, वाटेंत कांटे, सर्प वगैरे दिसतील, क्रोधानें तुला जवळ न येण्याबद्दल धमकावतील. त्यांच्या अंगावरील व्रणांतून रक्त व पू वहात असून, दुर्गंधीमुळें तूं कंटाळशील. ते तुला दगडही मारतील, पण हा सर्व आभास आहे. ही धैर्य व निष्ठापरीक्षा ते पाहतील. या परीक्षेंत उतरलास तर, तेजस्वी कांति, निरोगी व स्मितमुखी अशा त्या श्रेष्ठ योग्याचें वास्तवदर्शन घेऊन माझा उद्धार कर. निःशंकपणें जा."

कमलाकर लगेच निघाला पिशाच्चानें केलेल्या सूचनां-प्रमाणेंच त्याला प्रथम अनुभव आला. पण दृढनिश्चयपूर्वक तो पुढें पुढें जातच राहिला. जवळ जातांच त्यानें एकदम, पाय धरले. मागणी मान्य झाल्याशिवाय पाय सोडणार नसल्याची प्रतिज्ञा केली. आपण त्या गांवचेच नव्हे असा बहाणा दत्तांनीं पुष्कळ केला. पण कमलाकराची निर्धार वृत्ति पाहून त्यांनीं आपलें दर्शन दिलें व मागणी काय आहे तें सांगण्यास आज्ञा केली.

" देवा, पंक्तिलाभ मिळावा. "

" मागणी विचित्र आहे. पण माझ्याच योग्यतेचे दोनअतिथी असतील तर मी अवश्य येईन. '

" कबूल ! आपल्या योग्यतेचेच दोन अतिथी असतील. भोजनास केव्हां याल ?"

" येत्या पौर्णिमेला माध्यान्हीं येईन. जा, तुझें कल्याण असो. तुझा हेतु समजला." कमलाकराला धन्यता वाटली. पाय सोडून तो वर पहातो तों, अवधूत अदृश्य झाले होते. कमलाकर तें ' ध्यान ' पाहून भारावला होता. एका निराळ्याच सुखांत पोहत होता. लवकरच तो पूर्वस्थितीवर आला. झपाझप पावलें टाकीत तो मूळ जागीं आला. पिशाच्च प्रतीक्षा करीतच होतें. सर्व वर्तमान कमलाकरानें सांगितलें. पिशाच्च हर्षानें नाचूं लागलें. त्याचा निरोप घेऊन कमलाकर घरीं आला. लक्ष्मीला सर्व समजल्यावर तिनें श्रद्धेनें त्या दयाघनाचे आभार मानले.

पौर्णिमा उजाडली. आज प्रात:कालपासून कमलाकर व लक्ष्मी यांची चालली होती. अतिथी-सत्काराची व सुग्रास भोजनाची तयारी करून तीं दोघें अधीरतेनें वाट पाहात बसलीं

होतीं. इतक्यांत बरोबर माध्यान्हकालीं ब्राह्मणवेषधारी दत्तांचें आगमन झालें. कमलाकर व लक्ष्मीनें त्यांचें स्वागत करून आसन दिलें. दोघांना अत्यानंद झाला.

पूजासाहित्य घेऊन कमलाकर तुलसीवृंदावनाजवळ अंगणांत आला. सूर्यनारायणाची मनोभावें पूजा करून, दत्तगुरूंच्या पंक्तीला येण्याचें आमंत्रण दिलें. तेथून स्वयंपाकगृहांत आला. चुलीसमोर बसून अग्निपूजा केली आणि दत्त व सूर्यदेवांबरोबर भोजनाचें आमंत्रण दिलें. थोडयाच वेळांत दोघेही ब्राह्मणरूपानें अंगणांतून आंत आले. त्यांचेंहि दोघांनीं स्वागत करून तिघांसह कमलाकर भोजनास बसला. लक्ष्मीनें आग्रह करकरून त्यांना जेवविलें. भोजनोत्तर तिन्ही देवांनीं त्यांना विविध आशीर्वाद देऊन ते स्वस्थानीं गेले. लक्ष्मीनेंही नंतर भोजन आटोपलें. दुर्लभ असें देवभोजन घातल्याचें समाधान त्या पतिपत्नीला लाभलें होतें.

दत्तांचें भोजनपात्र कमलाकरानें काळजीपूर्वक जपून ठेवलें. सायंकाळीं तें नेऊन त्या पिशाच्चास दिलें. त्यानें तें अधाशाप्रमाणें खाल्लें. त्याचवेळीं सर्परूपांत असलेले मातापिताहि तेथें आले. त्यांनींही तें सेवन केलें. पाहातांपाहातां त्या तिघांना पूर्वरूप प्राप्त झालें व त्यांनीं कृतज्ञतेनें कमलाकराचे पाय धरले. कमलाकरानें त्यांना उठविलें. ब्राह्मणपुत्राच्या मातापित्यांनीं कमलाकराला तळघरांतील धन दाखविलें व तें घेण्याची विनंति केली. कमलाकरानें तें द्रव्य, क्षेत्रांतील अन्नछत्रास त्या तिघांच्या नांवें अर्पण करण्याचेच अटीवर, स्वीकारण्याचें कबूल केलें. त्यांनीं मान्यता दिली. मात्र ब्राह्मणस्त्रीनें लक्ष्मीसाठीं, एक रत्नहार सौभाग्यचिन्ह म्हणून स्वीकारण्याची केलेली विनंति, नाइलाजानें कमलाकराला मान्य करावी लागली.

हा सर्व व्यवहार होत आहे तोच, तिघांसाठीं स्वर्गातून विमान आलें. दूतांनीं कमलाकराला वंदन करून, योग्यवेळीं स्वर्गात नेण्यासाठीं, पुन्हा विमान येईल व तुम्हा उभयतां पति-पत्नीला नेऊं असें सांगून, तिघांना विमानांत आदरपूर्वक बसविलें. तिघांनीं कमलाकराचा निरोप घेतला व विमान निघून गेलें. श्रद्धा, भक्ति व देवकृपा यांनीं भारावलेला कमलाकर घरीं परतला.

---

* * *

कथा चौवथी.

# व र द रा ज श्री वि ष्णू

---

दक्षिण भारतांत 'विष्णुकांची' हें मद्रासकडील वरदराज श्री विष्णूंचें तीर्थस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. मंदिर भव्य, स्वच्छ व सुंदर असून, गोपुरें प्रेक्षणीय आहेत. सभामंडप ९६ खांबाचा शिल्पकलायुक्त व विस्तीर्ण आहे श्रीविष्णुमूर्ति पुरुषभर उंचीची शाळिग्राशीळेची आहे. प्रथम दर्शनींच मूर्तीवर दृष्टि खिळून जाते. जवळच सुवर्णाची पाल असून देवदर्शनांत या पालीचेंही दर्शन आवश्यक मानलें जातें. भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारा म्हणून या विष्णूला 'वरदराज' म्हणतात. क्षेत्र-निवासी परमविष्णुभक्त असून प्रत्येक घरीं अगत्यपूर्वक विष्णु-पूजा चालते. क्षेत्रस्थांचा तोच कुलदेवहि आहे. येथून जवळच शिवभक्तांचे 'शिवकांची' हें सुंदर तीर्थस्थान आहे. मोक्षदायिनी सप्तपुरींपैकीं 'शिवकांची' ही एक मानतात. या स्थानाची पृथ्वी-तत्त्व' अशी ख्याती आहे. उभय क्षेत्रें नजीक असल्यानें यात्रेकरू दोन्ही तीर्थस्थानीं दर्शनासाठीं गर्दी करतात.

दोन्हीं 'कांची' क्षेत्रांत स्वच्छतेकडे कटाक्षानें ध्यान दिलें जातें. पावित्र्य राखले जातें आणि यात्रेकरूंच्या सर्व सोयी पाहिल्या जातात. उभय क्षेत्रांचा परिसर रम्य असून, मंदिरांतील शांत व मंगल वातावरणामुळें भक्ताची श्रद्धा दुणावते. देवदर्शनाचा खरा आनंद लुटून ते तृप्त होतात.

या 'विष्णुकांची' क्षेत्रांत कामण्णा नांवाचा एक श्रीमंत व्यापारी पूर्वीं होऊन गेला. हा कामण्णा धनलोभी होता. घरीं विधवा माता व रेणुका ही सुशील आणि विष्णुभक्त पत्नी होती. कामण्णा कंजूष म्हणून प्रख्यात होता. सर्व क्षेत्रांत त्याचा लोक तिरस्कार करीत परंतु त्याच्या आईला व पत्नीला आदरानें वागविलें जाई. कारण त्यांची धर्मपरायणता. कामण्णा नास्तिक नव्हता पण धनलोभापुढें त्याला घरांतील किंवा क्षेत्रांतील विष्णुदेवाचें स्मरणहि होत नसे. उलट पत्नी व माता यांचा धर्मकृत्यांस तो खर्चाच्या सबबीखालीं विरोध करी.

कामण्णाचा दूरदेशीं मोठा व्यापार चाले. आपल्या पंच-क्रोशींतील माल जहाजांतून तो विदेशी पाठवी व विदेशचा माल आणून, त्यावर अलोट धन मिळवी. धनप्राप्ति हाच त्याचा ध्यास. धन हेंच त्याचें दैवत. याशिवाय त्याला थोडा वैभवाचा गर्वहि होता. कंजूष व गर्विष्ठ स्वभावामुळें कामण्णा बरोबर-च्या अन्य व्यापारी मंडळींत अप्रिय होता. घरांत विष्णुपूजे-ऐवजीं तो सुवर्णमुद्रांचीच पूजा करी. अर्थात ही पूजा तो मनो-मन करी आणि आपल्या द्रव्यकोठींत कोणालाहि प्रवेश देत नसे. कामण्णाकडे किती धनसाठा आहे याची कुणालाच कल्पना नव्हती. माता किंवा पत्नी रेणका यांनाहि तें ज्ञान नव्हतें. दुकान व परदेशीं सफरी यांतच त्याचा सर्व वेळ खर्च होत असे.

कामण्णाची पस्तिशी उलटली तरी, रेणुकेची कूस उजवली नाहीं म्हणून रेणुका व तिची सासू दु:खी होती. म्हातारपणीं नातवाचें मुख पाहून मृत्यु यावा अशी, कामणाची आई विष्णूची प्रार्थना नित्य करी, तर या अपत्यहीन दशेंतून मुक्त कर अशी रेणुकेची देवाकडे विनवणी असे. उभयतांनीं भावी वंशांकुर हवा म्हणून, श्रीविष्णूची महापूजा आरंभिली. कामण्णाला चार हिताच्या गोष्टी सांगितल्या व त्याच्या अफाट धनाला पुढें वारस हवा या उपदेशाचा त्यावर परिणाम होऊन, तो माता व पत्नी यांच्या आग्रहानें वरदराज विष्णूकडे पुत्रफलाची प्राप्ति झाल्यास देवाला सुवर्णमुकुट अर्पण करण्याचा शब्द देऊन चुकला. परंतु धनव्ययाची टोचणी त्याच्या मनाला मागाहून जाणवूं लागली. वेळ येईल तेव्हां पाहूं म्हणून, त्यानें मनाचें समाधान करून घेतलें. महापूजा सांगता झाली व रेणुका आणि तिची सासू यांच्या सेवेचें फल, त्यांना मिळण्याचा रंग दिसूं लागला. उभयतांना आनंद झाला तर, कामण्णाला अंतरीं नवसफेडीच्या खर्चाचें दु:ख तीव्रतेनें टोचूं लागलें.

योग्य वेळीं रेणुकेला पुत्रप्राप्ति झाली. वरदराज श्रीविष्णुकृपेनें झालेला पुत्र तो निरोगी, हसतमुख व रूपसंपन्न असें तें पुत्ररत्न पाहून रेणुका व कामण्णाची माता धन्य झाली. कामण्णानें आनंदाची बतावणी केली परंतु नामकरणाचेवेळीं आपल्या स्वभावाला अनुसरून हात राखूनच खर्च केला. आजी व आई यांनीं मुलाचें नांव 'विष्णुदास' ठेविलें. परंतु कामण्णानें मात्र नवसफेडीचे आईकडे वायदे सुरू केले. तीं उभयतां कामण्णाच्या या टाळाटाळीला कंटाळली. विष्णुदास सुखांत वाढत होता.

विष्णुदास ६ महिन्यांचा असतांना एके दिवशीं त्याला खूप ताप आला. सर्व उपचार करूनहि त्याचा ताप हटेना. हा नवस न फेडण्याचा परिणाम हें रेणुका व कामण्णाची आई यांना समजून चुकलें. त्यांनीं कामण्णाला याची जाणीव दिली. कामण्णानें पूर्वीप्रमाणें ताप उतरल्यावर नवस फेडण्याचा वायदा केला. रेणुकेचें मातृहृदय कळवळलें पण कामण्णापुढें नाईलाज होता. उभयतां सासू-सुनेनें वरदराजाची विनवणी केली व यथावकाश मुलगा बरा झाला. आजी व माता यांच्या श्रद्धा-भावनेला, श्रीविष्णु पावले परंतु कामण्णा गप्प होता. आज नाहीं तरी पुढें विष्णुदास कर्ता पुरुष झाल्यावर, त्याकडून नवस फेडवून घेईन या आशेवर रेणुका, स्वतःचें समाधान मानी आणि सासूचेंही असें समाधान करी.

विष्णुदास १ वर्षाचा झाला. आपल्या इच्छेनुसार आजी, आईनें त्याला वरदराजाचे पायांवर नेऊन ठेवलें. त्याला देवाचें दर्शन करवून तीर्थ पाजलें आणि मुलाकडूनच नवस फेडवू त्याच्या-वर कृपादृष्टि ठेव अशी उभयतांनीं करुणा भाकली. कामण्णाला ही वार्ता कळली आपली जबाबदारी टळली यातच त्यानें आनंद मानला.

याच सुमारास कामण्णा दूरदेशी व्यापारानिमित्त, समुद्र-सफरीवर गेला होता. त्याच्या अपेक्षेप्रमाणें व्यापारांत भरपूर नफा झाला होताच पण, बरोबर जहाजें भरून त्यानें जो माल आणला होता, त्यांतहि त्याला बराच फायदा होणार होता. तो जहाजांसह, नित्यपरिचयाच्या जवळच्या गांवीं पोंचला. अनुकूल वारा वाहिला तर, उद्यां परवांच तो स्वगृहीं पोंचणार होता.

बरोबरच्या मालावर किती नफा मिळवायचा याचे बेत तो मनाशीं करीत होता. सायंकालचा समय होता, इतक्यांत आकाश ढगांनीं भरून गेलें, वारा वाहू लागला आणि वादळाचीं चिन्हें दिसू लागलीं. पाहतां पाहतां समोरून चक्री वादळाचे वारे त्याच्या दिशेकडे येऊ लागले. कामण्णा घाबरला. आतां त्याला वरद-राजाची आटवण झाली. यापूर्वीं त्यावर असा प्रसंग आलाच नव्हता. तो देवाची विनवणी करूं लागला. त्यावेळीं त्याचे-समोरचें एक जहाज, पाण्याच्या लाटांबरोबर दूरदूर चाललें. कामण्णा असलेल्या जहाजांत, त्याचें व्यापारांत मिळविलेलें द्रव्य होतें. तें बुडूं नये म्हणून त्यानें वरदराजाची कळवळून प्रार्थना केली. 'हें वरदराजा, या वेळचें सर्व द्रव्य व मग मिळणारें सर्व द्रव्य तुला अर्पण करीन. सुखरूप घर दाखव. शिवाय मुलाचाहि नवस फेडीन. मी तुला शरण आहे'. तो पुरा गडबडला होता.

लवकरच वादळ शमलें. दूर गेलेलें जहाज मिळवून त्या गांवीं आला. व्यापाराची मुनीमामार्फत व्यवस्था लावून घरीं गेला. परंतु आपत्कालीं देवाला दिलेल्या वचनाला विसरला. जणुं कांहींच घडलें नव्हतें हीच कल्पना करून, त्यानें शिर-रस्त्यानुसार माल विकून भरपूर फायदा मिळविला. या गडबडींत त्याचे चार दिवस गेले. पांचव्या दिवशीं सर्व द्रव्य कोठींत ठेवण्यासाठीं, त्यानें पिशव्या भरून घेतल्या व घरीं आला.

रात्रीं भोजनोत्तर सर्वांची निजानीज झाल्यावर, द्रव्य-पिशव्या घेऊन त्यानें कोठीचें दार उघडलें तों काय? कामण्णाची भितीनें बोबडी वळली, हातांतील पिशव्या गळून पडल्या व कामण्णा बेशुद्ध होऊन धाड्कन खालीं कोसळला. आवाजानें

शेजारच्या खोलींत निजलेली रेणुका धांवत आली. कामण्णाची मातांहि आली. पाहतात तों, एक मोठा भुजंग फणा काढून, वेटोळें करून कामण्णाकडे पाहून, डोळ्यांतून आग ओकीत होतें. कामण्णा पुरा बेशुद्ध होता परंतु रेणुका व सासू तेथें पोंचतांच भुजंग शांत झाला.

"घाबरूं नका. मी तुमचा मूळ कुलपुरुष आहे. या कुलकलंकानें धनांध बनून, कुलदेव श्रीविष्णूला दिलेलें वचन मोडलें. मुलाचा नवसहि फेडण्याचें टाळलें. समुद्रावर वादळांत सांपडला असतां, मिळालेलें व मिळणारें सर्व धन त्या कुलदेवतेला अर्पण करीन आणि विष्णुदासाचाही, राहिलेला नवस फेडीन असें त्यानें विदेशांतून परततांना, प्राणभयानें देवाला विनविलें होतें, पण आतां संकटमुक्त होताच याच्या मूळ स्वभावानें उचल खाल्ली आहे. या पिशव्यांतील एकंदर धन त्याच्या हस्तें देवार्पण झालें पाहिजे आणि येत्या चार दिवसांत मुलाचा नवसही यानें फेडला पाहिजे. घरचें कुलाचार यानें बंद केल्यामुळें, त्या कुलदेवाची अवकृपा ओढवली आहे. द्रव्य तर नष्ट होईलच पण आमचा कुलक्षयहि याच्या धनलोभानें ओढवला आहे. याला पाणी शिंपडून व घरांतील तीर्थ पाजून सावध करा. माझी भीति बाळगण्याचें कारण नाहीं."

रेणुका व सासूनें आदरपूर्वक त्या कुलपुरुषाला हात जोडले, आईनें पाणी आणून कामण्णावर शिंपडलें. रेणुकेनें तीर्थ पाजलें. कामण्णा सावध झाला. तो पुन्हा भिऊं नये म्हणून भुजंग दूर गेला. दुरून त्यानें कामण्णाला सर्व कल्पना दिली परंतु लाजेनें कामण्णा बोलेना. तेव्हां अधिक संतापून 'तूं पालीचा जन्म घेशील'

असा त्यानें कामण्णाला शाप दिला. आतां कामण्णाचे डोळे उघडले. रेणुकाहि सौभाग्य राखण्याची विनवणी करूं लागली. माताहि नातवाला, त्या भुजंगरूपी कुलपुरुषासमोर ठेवून, मुलाला क्षमा करण्यासाठीं विनवूं लागली. कामण्णानें आतां हात जोडून क्षमायाचना केली व चुका सुधारण्याचें वचन दिलें. 'माझा शाप टाळण्यासाठीं, या कोठींतील सर्व मूळच्या द्रव्याची सुवर्णपाल करून, ती विधीपूर्वक वरदराजाला श्रद्धेनें अर्पण कर. तसेंच, या पिशव्यांतील द्रव्यहि वचनाप्रमाणें देवार्पण कर आणि विष्णु-दासाचा नवसहि फेड,' कामण्णानें लगेच सर्व गोष्टी कबूल केल्या. भुजंगरुपी कुलपुरुषानें आशीर्वाद दिला आणि प्रामाणिक-पणें व्यापार करण्याची आज्ञा केली. कामण्णानें हात जोडून मान्यता दर्शविली. कुलपुरुष गुप्त झाला.

वचनाप्रमाणें दुसरे दिवशीं, कामण्णानें कुटुंबासह शुचि-र्भूत होऊन प्रथम, घरीं स्वत: देवपूजा केली. सर्वांसह वरदराज मंदिरांत जाऊन श्रीविष्णुदर्शन घेतलें आणि चार दिवसांत वचन-पूर्ति करण्याचा संकल्प सोडला, सदैव कृपादृष्टि ठेवण्याची प्रार्थना करून संतोषानें घरीं परतला. कामण्णाला 'समज' आली असावी असा त्यांनीं तर्क केला. कामण्णा आतां सर्वांशीं नम्रपणें वागूं लागला. लोकांनाहि या चमत्कारानें समाधान झालें.

कामण्णानें त्याच दिवशीं, सुवर्ण कामाचे कितीक कारागीर बोलावले, प्रथम त्यानें वरदराजासाठीं रत्नजडित सुवर्णपाल तयार करविली आणि सर्व गांवाला भोजनदक्षिणा देऊन, विधीपूर्वक वरदराजाची पूजा करून मुकुट व पाल अर्पण केली, थोडेंहि द्रव्य पदरीं न ठेवतां दानधर्महि केला. त्या रात्रीं तो भुजंगरूपी

कुलपुरुष, भोजन समयीं पुन्हा प्रकट झाला व त्यानें सर्वांना संतोषून आशीर्वाद दिला व वरदराजाबरोबर त्या सुवर्णपालीचेंही यात्रेकरू दर्शन घेतील असा वर दिला. नंतर कामण्णा नीट वागून माता पत्नीसह मुक्तीला गेला. विष्णूदासहि कुलदीपक निपजला. तूर्त वरदराजाजवळ दिसते, ती पाल हीच असें तेथील लोक सांगतात,

* * *

कथा पांचवी.

# शिवतीर्थ जंबुकेश्वर

---

पंचतत्त्वांपैकीं 'आपतत्त्वलिंग' म्हणून दक्षिणेंत 'जंबुकेश्वर' हें शिवतीर्थ प्रसिद्ध आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश हीं पंचतत्त्वें होत. जंबुकेश्वर हें शिवलिंग पाण्याखालीं असून, वरूनच पुष्पपूजा करतात. ज्या यात्रेकरूची पुष्पपूजा आंतील शिवलिंगाचे माथ्यावर पाण्यांत स्थिर राहते, बाजूला प्रवाहाबरोबर वाहून जात नाहीं तो यात्रेकरू 'विशेष पुण्यवान' समजतात. हें शिवलिंग पूर्वी पाण्यावर होतें. तें पाण्याखालीं कां गेलें त्याची मजेदार कथा येथील क्षेत्रस्थ यात्रेकरूंना ऐकवितात. ती कथा श्रवणीय आहे.

जंबुकेश्वर हा मूळचा एका विद्वान, धर्माचरणी परंतु निर्धन ब्राह्मणाचा कुलदेव. निर्धनावस्थेंत या कुलदेवावर गाढ श्रद्धा ठेवून, अल्पसंतुष्ट वृत्तीनें हा ब्राह्मण गांवांत भिक्षा मागून आपली उपजीविका चालवी. त्याची पत्नीहि परम शिवभक्त व पतिव्रता होती. ग्रामस्थ त्यांचा आदर करीत असत. निर्धनावस्थेंतहि आपणावर भक्ताची अपार श्रद्धा पाहून, शंकरांना

त्याची दया आली. त्याचें दारिद्य नष्ट करण्याचे हेतूनें, शिव त्या ब्राह्मणाचें स्वप्नांत दर्शन देऊन म्हणाले, "हे परमभक्ता, तुझ्या सेवेनें मी प्रसन्न आहे. तुझी गरीबी यापुढें नष्ट होईल. देवघरांतील माझें लिंग घरामागच्या डोंगरांतून वाहणाऱ्या झऱ्याच्या प्रवाहाकाठीं स्थापन कर व दर्शनार्थींना माझें तीर्थ पाज, प्रसाद म्हणून निर्माल्य दे. त्यामुळें त्यांच्या इच्छा पूर्ण होतील व तुझे दिवस पालटतील. अशीच निष्ठेनें सेवा करीत रहा." शिव गुप्त झाले.

ब्राह्मण जागा झाला. पत्नीलाहि हेंच स्वप्न पडलें होतें व पतीला सांगण्यासाठीं ती आली होती. प्रात:कालची वेळ होती. उभयतांनीं शिवस्मरण करून कृतज्ञतेनें हात जोडले व तीं आपल्या नित्याच्या कार्याला लागलीं.

लवकरच शुभमुहूर्तावर त्या ब्राह्मण पतिपत्नीनें स्वप्नांतील दृष्टांतानुसार घरामागील झऱ्याकाठीं शिवलिंगाची प्रतिष्ठापना केली. अन्य ब्राह्मणांनीं या कामीं, त्यांना अगत्यानें मदत दिली. जंबुकेश्वराची किर्ती सर्वत्र पसरली कीं, श्रद्धायुक्त मनानें दर्शन घेतल्यानें, संकटमुक्त होऊन इच्छापूर्ति होते. शिवदर्शनासाठीं भक्त, आपद्ग्रस्त, यांची गर्दी होऊं लागली. 'रिक्तहस्तें देवदर्शन करूं नये' या वचनानुसार शिवापुढें द्रव्य, धान्य, फळें व फुलें यांचा ढीग जमूं लागला. जंबुकेश्वराकडे भक्तांचीं गाऱ्हाणीं सुरू करून त्यांना तीर्थप्रसाद देण्यास, ब्राह्मणाला दिवस अपुरा पडूं लागला तर, दर्शनार्थींच्या भोजनाची व्यवस्था ठेवण्यांत, ब्राह्मणीला अपार धन्यता वाटूं लागली. उभयतांना शिवसेवा व अन्नदान यापुढें स्वत:च्या भोजनाचीहि चिंता नसे. प्रात:कालपासून प्रहररात्रींपर्यंत नित्य हा व्यवहार चाले. शिवसेवेंत

उभयतां संतुष्ट होतीं.

त्या पतिपत्नीचें नांव विद्याधर व वत्सला होतें. आपल्या कुलदैवताची ती अपार कृपादृष्टि अनुभवून त्यांना कृतकृत्य झाल्याचें समाधान होतें. यात्रेकरूंच्या सोईसाठीं त्यांनी जमलेल्या धनांतून जवळच मोठी अग्रशाळा बांधली. धान्यसंग्रह व भोजन व्यवस्थेसाठीं निराळी पाकशालाहि बांधविली. जंबुकेश्वरावर तात्पुरतें छप्पर होतें. तें हलवून विस्तीर्ण मंदिर बांधलें. उरलेलें धन व धान्य त्या उभयतांनी अनाथ, आपद्ग्रस्त यांना दान केलें. तरीसुद्धां धन व धान्य यांचा ओघ सतत चालू असे. विद्याधर दर महिन्यास एका ठराविक दिवशीं तें सर्व धनधान्य दानधर्मांत खर्चूं लागला.

जंबुकेश्वरकृपेची कीर्ति त्या भागांतील राजापर्यंत पोंचली. राजानें दर्शनास जाण्याचा बेत केला. परंतु प्रत्येक वेळीं कांहींतरी अडचण उपस्थित होऊन, राजाचें शिवदर्शन लांबणीवर पडूं लागलें. विद्याधराची विद्वत्ता व शिवभक्ति परमुखानें राजा ऐकत होताच. शेवटीं त्यानें विद्याधरालाच आपल्या दरबारीं येऊन भेट देण्याचें आमंत्रण दिलें. देवदर्शनापूर्वीं या देवभक्ताचें दर्शन घेऊन पावन व्हावें हा राजाचा हेतू होता. राजदरबारीं जाण्यापूर्वीं विद्याधरानें आपल्यामागें शिवसेना व भक्तांची व्यवस्था पाहण्यासाठीं कांहीं धर्मपरायण ब्राह्मणांची कायमचीच नियुक्ति केली. यामुळें त्याला थोडी विश्रांति मिळूं लागली होती. वत्सलेलाहि आतां थोडी उसंत लाभत होती.

जंबुकेश्वराचें तीर्थ व प्रसाद घेऊन मोठ्या श्रद्धेनें, विद्याधर योग्य दिवशीं राजदर्शनाला दरबारांत हजर झाला. राजासमोर त्यानें आपल्या कुलदेवाचा प्रसाद व तीर्थ ठेवून त्याला आशीर्वाद

दिला. विद्याधराचें तें तोंडावरील शिवभक्तीचें तेज पाहून राजा दिपून गेला. विद्याधराची योग्य संभावना करून त्यानें मोठ्या निष्ठेनें तीर्थप्रसाद स्वीकारला. शिवदर्शनाची इच्छा व्यक्त केली व राज्यरक्षणासाठीं जंबुकेश्वराची प्रार्थना करण्यास विद्याधराला विनविलें. विद्याधराने जंबुकेश्वरावर श्रद्धा ठेवून राजकार्य चालवा तो यश देईल असा भरवसा दिला. राजाचा निरोप घेवून विद्याधर परतला व राजाहि विशेष समाधानांत कारभार चालवूं लागला.

पुढें राजावर त्याच्या शत्रूनें स्वारी केली. राजाचा पराभव होण्याचें चिन्ह दिसूं लागलें परंतु, विद्याधरानें शिवतीर्थ व प्रसाद त्वरेनें नेऊन राजाला दिला आणि त्याच दिवशीं, राजाला यश मिळून शत्रू पराभूत झाला. यामुळें राजाचा विद्याधरावरचा विश्वास दृढ होऊन त्यानें त्याला आपल्या दरबारीं 'धर्मपंडित' ही मानाची जागा दिली व मूळ धर्मपंडिताला विद्याधराचा दुय्यम नेमला. विद्याधरानें ही शिवाज्ञा मानून ती जागा स्वीकारली.

आपला अधिकार कमी झाल्यामुळें मूळ धर्मपंडित विद्याधराशीं अकारण वैर धरून मनोमन त्याचा नाश करण्याचें गुप्त बेत रचूं लागला. सरळस्वभावी विद्याधराला याची कांहींच कल्पना नव्हती. धर्मपंडिताच्या कामापायी त्याला दरबारांत नित्य उपस्थित रहावें लागे. यामुळें तो प्राप्तःकालीं स्वतः शिवपुजा आटोपून, पालखींतून दरबारी जाई व सूर्यास्तसमयीं घरीं परते. प्रत्येक दिवशींच्या दरबारांतील कामाची रुजवात रात्रौ जंबुकेश्वरापुढें करून व त्याची प्रार्थना करून मग भोजन व निद्रा करी, त्याला दरबारीमानाचा लोभ नव्हता. त्याच्या धर्मनिर्णयाने राजा व दरबारी मंडळी खूष असत. औदार्य व नम्र

स्वभावामुळें तो सर्वांनाच प्रिय होता, फक्त एकच गुप्त शत्रू त्याच्या प्राणांवर उठला होता. नित्य सेवेंत अंतर देऊं नको हीच त्याची शिवाकडे प्रार्थना असे.

राजदरबाराचा मार्ग विद्याधराच्या गांवापासून जंगलांतून गेलेला होता व दोन कोसांचें अंतर तोडावें लागे. या मार्गावर मारेकरी ठेऊन विद्याधराचा काटा काढण्याचा त्या धर्माधिकाऱ्यानें बेत केला व एका सायंकाळीं मारेकरी रवाना झाले. आडवळणावर विद्याधराची पालखी पोंचतांच, मारेकरी पुढें धावून आलें परंतु जवळच एका झाडाखालीं, भलामोठा वाघ वाट अडवून बसलेंला त्यांना दिसला. भीतीनें त्यांनी पळ काढला व झालेली हकीकत मालकाला निवेदन केली. निराशेने मालक चडफडला व पुढील संधीची वाट पाहूं लागला. विद्याधरला या गोष्टीचा पत्ताच नव्हता.

दुसऱ्यावेळीं त्या मारेकऱ्यांना लपून बसलेल्या जागी कोणांतरी अदृश्य शक्तीने भरपूर चोप दिला व त्यांचें अंग रक्तबंबाळ झाल्यानें, विव्हळत रातोरात ते परतले. विद्याधराचें रक्षण त्याच्या कुलदेवच करीत असल्याची त्या दुष्टांची खात्री झालीं. त्यामुळें प्रत्यक्ष राजाचें मत कलुषित करून, त्याचा कांटा काढण्याचें त्यानें ठरविलें.

विद्याधरावरील द्वेषामुळें तो मनोमन त्याच्यां देवालाही शिव्या देई, मात्र दरबारांत विद्याधरासमोर आज्ञाधारक सेवकाचा आव आणी. संधी मिळेल तेव्हां विद्याधर हा दांभिक शिवभक्त असून, त्याच्या चहात्यांनीं हा बनाव घडविला असल्याचें व जंबुकेश्वर हा तसा विशेष देव नसल्याचें, युक्तियुक्तीनें त्याने राजाला पटविण्यास आरंभ केला आणि अविचारी

दिला. विद्याधराचें तें तोंडावरील शिवभक्तीचें तेज पाहून राजा दिपून गेला. विद्याधराची योग्य संभावना करून त्यानें मोठ्या निष्ठेनें तीर्थप्रसाद स्वीकारला. शिवदर्शनाची इच्छा व्यक्त केली व राज्यरक्षणासाठीं जंबुकेश्वराची प्रार्थना करण्यास विद्याधराला विनविलें. विद्याधराने जंबुकेश्वरावर श्रद्धा ठेवून राजकार्य चालवा तो यश देईल असा भरवसा दिला. राजाचा निरोप घेवून विद्याधर परतला व राजाहि विशेष समाधानांत कारभार चालवूं लागला.

पुढें राजावर त्याच्या शत्रूनें स्वारी केली. राजाचा पराभव होण्याचें चिन्ह दिसूं लागलें परंतु, विद्याधरानें शिवतीर्थ व प्रसाद त्वरेनें नेऊन राजाला दिला आणि त्याच दिवशीं, राजाला यश मिळून शत्रू पराभूत झाला. यामुळें राजाचा विद्याधरावरचा विश्वास दृढ होऊन त्यानें त्याला आपल्या दरबारीं 'धर्मपंडित' ही मानाची जागा दिली व मूळ धर्मपंडिताला विद्याधराचा दुय्यम नेमला. विद्याधरानें ही शिवाज्ञा मानून ती जागा स्वीकारली.

आपला अधिकार कमी झाल्यामुळें मूळ धर्मपंडित विद्याधराशीं अकारण वैर धरून मनोमन त्याचा नाश करण्याचें गुप्त बेत रचूं लागला. सरळस्वभावी विद्याधराला याची कांहींच कल्पना नव्हती. धर्मपंडिताच्या कामापायी त्याला दरबारांत नित्य उपस्थित रहावें लागे. यामुळें तो प्राप्त:कालीं स्वत: शिवपुजा आटोपून, पालखींतून दरबारी जाई व सूर्यास्तसमयीं घरीं परते. प्रत्येक दिवशींच्या दरबारांतील कामाची रुजवात रात्री जंबुकेश्वरापुढें करून व त्याची प्रार्थना करून मग भोजन व निद्रा करी, त्याला दरबारीमानाचा लोभ नव्हता. त्याच्या धर्मनिर्णयाने राजा व दरबारी मंडळी खूष असत. औदार्य व नम्र

स्वभावामुळें तो सर्वांनाच प्रिय होता, फक्त एकच गुप्त शत्रू त्याच्या प्राणांवर उठला होता. नित्य सेवेंत अंतर देऊं नको हीच त्याची शिवाकडे प्रार्थना असे.

राजदरबाराचा मार्ग विद्याधराच्या गांवापासून जंगलांतून गेलेलां होता व दोन कोसांचें अंतर तोडावें लागे. या मार्गावर मारेकरी ठेऊन विद्याधराचा काटा काढण्याचा त्या धर्मधिकाऱ्यानें बेत केला व एका सायंकाळीं मारेकरी रवाना झाले. आडवळणावर विद्याधराची पालखी पोंचतांच, मारेकरी पुढें धावून आलें परंतु जवळच एका झाडाखालीं, भलामोठा वाघ वाट अडवून बसलेंला त्यांना दिसला. भीतीनें त्यांनी पळ काढला व झालेली हकीकत मालकाला निवेदन केली. निराशेने मालक चडफडला व पुढील संधीची वाट पाहूं लागला. विद्याधरला या गोष्टीचा पत्ताच नव्हता.

दुसऱ्यावेळीं त्या मारेकऱ्यांना लपून बसलेल्या जागी कोणांतरी अदृश्य शक्तीने भरपूर चोप दिला व त्यांचें अंग रक्तबंबाळ झाल्यानें, विव्हळत रातोरात ते परतले. विद्याधराचें रक्षण त्याच्या कुलदेवच करीत असल्याची त्या दुष्टांची खात्री झालीं. त्यामुळें प्रत्यक्ष राजाचें मत कलुषित करून, त्याचा कांटा काढण्याचें त्यानें ठरविलें.

विद्याधरावरील द्वेषामुळें तो मनोमन त्याच्यां देवालाही शिव्या देई, मात्र दरबारांत विद्याधरासमोर आज्ञाधारक सेवकाचा आव आणी. संधी मिळेल तेव्हां विद्याधर हा दांभिक शिवभक्त असून, त्याच्या चहात्यांनीं हा बनाव घडविला असल्याचें व जंबुकेश्वर हा तसा विशेष देव नसल्याचें, युक्तियुक्तीनें त्याने राजाला पटविण्यास आरंभ केला आणि अविचारी

राजाला विद्याधराबद्दल संशय निर्माण झाला. राजा कडून विद्याधराचें पारिपत्य झाल्यास उत्तमच नपेक्षा, कांहीं आपत्ति ओढवल्यास परस्पर राजाला ती भोगावी लागेल असा धूर्त डाव होता. कपटी व स्वार्थी लोकांचे हेच मार्ग असतात. अज्ञानी राजा या जाळ्यांत सांपडला.

विद्याधराविषयीं मनांत किंतु धरल्यापासून राजाची प्रकृति बिघडली होती. त्याचें कोणत्याच गोष्टींत मन रमत नसे. त्यांतच आपला कार्यभाग साधण्याचे प्रयत्न, विद्याधराच्या शत्रूनें चालू ठेवले होते. याच मुदतींत राजाज्ञेनें आपल्या वार्षिक शिवोत्सवा-साठीं, विद्याधर घरीं राहिला होता.

विद्याधराबद्दल मन संशयित बनल्याने, राजानें आपले उपचार राजवैद्यामार्फत चालू ठेवले होते. परंतु त्याला गुण येत नव्हता. खरोखर राजाला कसलाच रोग झाला नव्हता. राजवैद्यानेही हेंच निदान सांगून औषध देणें बंद केलें. शेवटीं राजाला विधाधराच्या देवाची आठवण झाली. त्यानें दुय्यम धर्मपंडिताला त्याकडे जाऊन, जंबुकेश्वराचा तीर्थप्रसाद आणण्याचीं विनंति केली. वरून राजाच्या आरोग्याची चिंता दर्शवून, पण अंतर्यामी संतप्त असा तो धर्माधिकारी विद्याधरा-कडे येण्यास निघाला.

विद्याधर शिवसेवेंत मग्न होता. त्याला दुय्यमानें सर्व कथन केलें. विद्याधरानें लगेच राजाला आरोग्य देण्याबद्दल, देवाची प्रार्थना केली व तीर्थप्रसाद देऊन त्या धर्मपंडिताला परत राजा-कडे धाडलें. शिवोत्सवसमाप्तीनंतर स्वतः पुन्हा तीर्थप्रसाद राजासाठीं आणीन असा निरोपहि पाठविला. राजासाठीं पुन्हां प्रार्थना केली.

विद्याधरानें राजासाठीं जें निर्माल्य पाठविलें होतें तें, वत्सलानें मोठ्या श्रद्धेनें स्वहस्तें आणून, विद्याधराकडे दिलेलें होतें. वत्सला त्यावेळीं स्नान आटोपून आपला केशसंभार वाळण्यासाठीं मुक्त ठेवूनच पतिसमवेत वावरत होती. निर्माल्यांत चुकून तिच्या माथ्यातील एक केस मिसळला गेला. कुणालाच याची कल्पना नव्हती.

राजाला धर्मंडितानें जंबुकेव्वराचा तीर्थप्रसाद आणून दिला. राजानें तीर्थ प्राशन केलें. त्याला किंचित हुशारी वाटली. इतक्यांत त्या धर्मपंडिताने, विद्याधराने राजाबद्दल विषेश जिव्हाळा दाखविला लाहीं किंवा, आपलीहि विषेश चौकशी केली नाहीं असा राजाचा विद्याधराविषयीं प्रतिकूल ग्रह केला. राजाला तें सत्यच वाटलें. त्याला विद्याधराचा राग आला. आपला अपमान झाला अशी त्याची समजूत झाली नंतर त्यानें निर्माल्याची पुडी उघडली. त्यांत वरच वत्सलेच्या डोक्यांतील केस दिसला. संतप्त राजाची विचारशक्ति नष्ट झाली. त्याने तें निर्माल्य तसेंच ठेवलें व धर्मपंडिताला निरोप दिला. विद्याधराची भरदरबारांत खोड मोडण्याचें त्यानें ठरविलें.

विद्याधराबद्दल राजाचे मनांत आकस निर्माण करण्याचें कार्य साधलें हें जाणून त्याच्या शत्रूस अत्यानंद झाला. दुष्ट विचारसरणीचीं माणसें तात्कालिक यश हें शाश्वत समजून त्यांतच आनंद मानतात. अशाप्रसंगीं त्यांना ईश्वर किंवा धर्म याचें स्मरण कधींच होत नाहीं. उलट अशा कृत्यांनीं ते आपल्याच सर्वनाशाची तयारी करीत असतात हें मात्र त्यांना कळत नसतें. त्यांची सुविचारशक्ति त्यांना सोडून गेलेली असते. त्याचे जवळचा पुण्यसंचयहि संपुष्टांत आलेला असतो.

विद्याधर आपल्या शिवसेवेंत दंग असतां त्याशीं विनाकारण शुत्रुत्व करणारा दुय्यम धर्मपंडित त्याच्या द्वेषानें जळत होता. तोंच देहदाहाचा रोग त्याला जडला व त्याच्या सांगण्यानें विद्याधर व त्याचा कुलदेव जंवुकेश्वर यांच्याबद्दल, मनांत किंतु बाळगणाऱ्या राजावर याच सुमारास, त्याच्या मूळ शत्रूने पुन्हा स्वारी केली. राजाला मोठ्या शर्थीनें जय मिळाला. परंतु त्याचें सैन्य नष्ट झालें. हा परिणाम विद्याधरामुळेंच भोगावा लागत आहे अशी त्यानें समजूत करून घेतली. कारण विद्याधरानें पाठविलेला सकेश प्रसाद ही त्याची कल्पना झाली. या विचाराला त्याच्या स्वार्थी धर्मपंडिताने दुजोरा दिला. धर्मपंडित देहदाहानें अस्वस्थ होताच तो सूडाची संधी पहात होता.

विद्याधर आपली वार्षिक कुलदेव सेवा-उपासना पूर्ण करुन मोकळा झाला व दुसरे दिवशी, राजासाठीं देवाचा तीर्थप्रसाद घेऊन मोठ्या लगगबगीनें दरबारांत हजर झाला. लगेच त्यानें राजाचें कुशल विचारून त्यापुढें तो तीर्थप्रसाद ठेऊन ग्रहण करण्याची विनंति केली. पण राजानें कांहीच उत्तर केलें नाहीं. दुय्यम धर्मपंडित मात्र आतां घोडामैदान जवळ असल्यानें आनंझाला होता.

दरबारांतील काम आटोपल्यावर राजानें विद्याधराला अवचित प्रश्न केला,

'विद्याधरपंडित, पूर्वी प्रसाद पाठविला तो सर्वच देवप्रसाद आहे ना?'

'होय महाराज ! तें शुद्ध शिवनिर्माल्य आहे.'

'शिवलिंगाला केस दिसतील?'

'महाराज ! ज्या श्रद्धादृष्टीनें आपण दर्शन घ्याल तसा तो दिसेल.'

'पंडितमहाशय, आपल्या वचनावर मी पूर्ण विश्वास ठेवावा ना ?'

'होय महाराज ! माझें कथन संपूर्ण सत्य आहे.'

विद्याधर. उदईक दोन प्रहरी, मी शिवदर्शनाला येणार आहे.'

'अवश्य यावे महाराज. मी सर्व पूजासामुग्री सिद्ध ठेवतें.'

'आपण पाठविलेला हा प्रसाद जपून ठेवा.'

राजानें आसनावरील प्रसादपुडी क्रोधाने विद्याधराच्या अंगावर फेकून दिली. ती सरळ विद्याधराचे हातात येऊन पडली. विद्याधराने ते निर्माल्य आपल्या मस्तकीं लावून, मग खिशांत ठेवलें. आजचा राजाचा निराळा नूर पाहून तो आश्चर्यचकित झाला होता, पण त्याच्या मनाला भीति वाटली नाहीं. त्याचें मन शुद्ध होतें. सर्व दरबारी स्तब्ध होते. राजा विद्याधराकडे क्रोधदृष्टि फेंकून निघून गेला.

राजा उठून गेल्यानें दरबार आपोआपच समाप्त झाला. विद्याधराचे चाहते यामुळें चकित झाले होते. इतक्यांत दुय्यम धर्मपंडित हळूच, विद्याधराकडे हळहळ व्यक्त करून, देवप्रसादांत 'मानवी केस' सांपडल्याने राजा संतप्त झाल्याचें सांगू लागला. अचंब्याने विद्याधरानें ते निर्माल्य पाहिलें. खरोखरच त्यांत केस होता. आतां मात्र विद्याधर चपापलो. त्याच्या चर्येवरील भाव पाहून, तो कपटी पंडित मनांतून हर्षित झाला. लबाडीचें पाप लागल्याच्या खेदानें व भरदरबारांत अपमानित झाल्याच्या

दु:खानें तो लज्जित झाला. लगेच तो स्वगृही जाण्यास निघाला. ही चूक कशी आली याचाच विचार तो वाटभर करीत होता.

घरीं पोंचतांच त्यानें सर्व प्रकार वत्सलेला कथन केला. तीहि गोंधळली, पण तो केस पाहिल्यावर, तो आपलाच असल्याची तिला खात्री पटली. राजाला निर्माल्यप्रसाद देतांना आपले केश मुक्त असल्याने हा केस चुकून गेला असण्याची शक्यता, तिनें पतीला बोलून दाखविली. विद्याधराला उलगडा झाला.

त्या रात्री भोजन न करतां विद्याधर वत्सला जंबुकेश्वरासमोर बसून त्याची करुणा भाकूं लागली, 'हें देवाधिदेवा, राजाला वचन देऊन चुकलों. त्याच्या इच्छेनुसार आमचें अब्रूरक्षण कर, तूंच आतां आमचा आधार आहेस.' उभयतां अगदी कळवळून विनवणी करीत होतीं. मध्यरात्रीं त्यांना निद्रा लागली.

प्रा:तकालीं उभयतांना स्वप्नात शिवदर्शन झालें. 'वत्सला-विद्याधर, निश्चित रहा.' आशीर्वाद देऊन शिव गुप्त झाले. उभयतां जागीं झालीं. त्यांची चिंता आता दूर झाली होती. आनंदानें उभयता आपल्या कामांत मग्न झालीं.

विद्याधर राजाच्या आगमनाचीं प्रतीक्षा करीत होता. सर्व सिद्धता होतीं. वत्सलाहि जवळच बसून विद्याधराला मदत करीत होती. दोन प्रहरचीं वेळ जवळच येत होती. इतक्यांत राजसेवकानें राजा व धर्मपंडित यांच्या आगमानाची सूचना दिली. स्वागतासाठी विद्याधर वत्सला मंदिराबाहेर उभीं राहिलीं.

पुढें राजा व मागें धर्मपंडित अशा स्वाऱ्या येत होत्या. विद्याधरानें स्वागत करून राजाला मंदिरांत आणलें. पंडित

मंदिराचे मुख्य घंटेखालीं थांबला. गर्भागारांत शिवलिंग दर्शनासाठीं विद्याधर राजाला नेऊ लागला. इतक्यात मोठा आवाज झाला. घंटा धर्मपंडिताचे डोक्यावर कोसळून तो गतप्राण झाला. मंदिर ऊंच उडून आकाशांत गुप्त झालें व शिवलिंग झऱ्याच्या पात्रांत अदृश्य होऊन तेथें, मोठा जलाशय निर्माण झाला, काय घडत आहें हे कुणालाच कळेना. तोच 'विद्याधर, तुझ्याविषयीं द्वेष धरून राजाचें मन लंशयित करणारा तुझा गुप्त शत्रु हा दुष्ट ब्राह्मण, आपल्या कर्माची फळें भोगण्यास मी यमराजाचे स्वाधीन केला आहे. आणि हा राजा ! याचें मन शुद्ध नाहीं. माझ्या प्रसादावर याची श्रद्धां नाहीं. अशा अशा श्रद्धाहीन राजाला माझ्या दर्शनानें कोणता फायदा होणार आहे ? हा संशयी आहे. माझें दर्शन धर्मपारायण श्रद्धाळू भक्तांसाठीं आहे. यासाठीं मी यासाठी मी या जलप्रवाहाखालीं गेलों आहे. निष्ठावान भक्तांवर माझी कृपादृष्टि सदैव राहील वरून केलेली पूजा मी स्वीकारीन राजसेवा त्यागून, पूर्ववत फक्त माझीच सेवा कर."

धीरगंभीर आवाज सर्वांनी ऐकला. विद्याधर-वत्सलांनी नतमस्तक होऊन हात जोडले. राजाला पश्चात्ताप झाला. तो विद्याधराला शरण गेला. विद्याधरानें शिवप्रार्थना करून राजासाठी अभय मागितलें, अभयवचन घेऊन राजा निघून गेला. तेव्हांपासून जंबुकेश्वरांची पाण्यावरून पुष्पपूजा यात्रेकरू करूं लागले.

* * *

कथा सहावी.

# पद्मनाभाची भक्ति

केरळ हा दक्षिण भारतांत पश्चिम समुद्रकांठचा प्राकृतिक सौन्दर्यानें नटलेला प्रसिद्ध प्रदेश आहे. पूर्वींची कोचीन व त्रावणकोर हीं दोन संस्थानें मिळून "केरळ" राज्य बनलें व तें भारत संघराज्यांत सामील झालें. त्रिवेंद्रम हें त्रावणकोर संस्थानचें मुख्य शहर आणि 'पद्मनाभ' मंदिरामुळें प्रसिद्ध क्षेत्र. त्रिवेंद्रमचा राजा हा पद्मनाभाचा भक्त असून आपण पुजारी सेवक व राज्य पद्मनाभाचें ही राजाची श्रद्धा आहे.

राजा पद्मनाभाचा सेवकभक्त व पुजारी तसेंच, राज्य देवाचें या राजघराण्याच्या श्रद्धेमुळें हे संस्थान भारत संघराज्यांत विलीन होतांना, पद्मनाभ मंदिराची राजातर्फे चालणारीं दैनिक पूजा व इतर व्यवस्था यांची हमी भारत सरकारनें राजाला दिलेंली आहे. यामुळे त्रावणकोर संस्थानच्या राजानें आनंदानें आपलें राज्य भारत संघराज्यांत सामील केलें. येथील राजघराण्याला पद्मनाभाचे पुजारी हा मान अद्याप दिला जातो.

पद्मनाभ हा त्रिवेंद्रमच्या राजाचा कुलदेव असून, राजाचा पूर्वज एक अंध होता, कुलदेवावरील निष्ठापूर्वक भक्तीनें त्याला दृष्टिलाभ होऊन राज्यप्राप्ति झाली. राज्यप्राप्ती होतांच त्यानें पद्मनाभ मंदिर बांधलें व देवाची नित्य पूजा स्वत: करू लागला. यानंतर राजाकडून स्वतंत्र पुजारी ठेवला गेला. हे मंदिर अत्यंत सुन्दर असून, सभोंवतीच्या हिरव्यागार वनश्रीमुळें त्याच्या सौन्दर्यांत अधिकच भर पडते. पद्मनाभ दर्शनासाठी भक्तांची नित्य गर्दी असते.

सुमारें बाराशें वर्षापूर्वी त्रिवेंद्रम हें समुद्रकांटचें एक खेडें होतें मध्यभागी विस्तीर्ण व स्वच्छ जलाशय आणि सभोंवतीं लोकवस्ती होती. शेती वागायती आणि मासेमारीं हा त्या खेड्यांतील लोकांचा व्यवसाय होता. लोक सुखी व परोपकारी होते. या खेड्यांत पद्माकर हा एक आंधळा मुलगा पोरका झाल्यानें, त्याच गांवांत आपल्या मामाघरीं राहात असे. पद्माकराचा बाप त्याच्या जन्मापूर्वीच नदीत बुडून मृत्यु पावला होता आणि पद्माकराचा जन्म झाल्यावर एक वर्षातच त्याची माता भाजून मरण पावली होती. पद्माकर हा जन्मत:च अंध होता. त्याला मरणकाळीं आईने भावाचे व भावजयीचे ओटींत घातला होता. या पोरक्या अंध पद्माकराचा सांभाळ मामा ममत्वानें करी.

मामाचे घरी पद्माकर गाईगुरें सांभाळी, दुसरीं कामे करी. आपल्या नम्र व गोड स्वभावानें पद्माकर मामाघरीं तसाच गावातही सर्वांना प्रिय होता. कोणतेंही काम अगत्याने व प्रामाणिकपणें करण हा पद्माकरचा विशेष गुण होता.

मामाच्या मुलाबरोबर पद्माकराचा व्रतबंध झाला होता. तो मामेभावाबरोवर वेदाध्ययनही करीत असे. मामेबहीण पद्मा पण या उभयतांबरोबर शिकत असे.

नित्य प्रात:कालीं उठावें, कुलदेव पद्मनाभाचें स्मरण करावें, मामीचें काम असल्यास तें करून, तळ्याकाठी गुरें चरवावी आणि दुपारीं तळ्याच्या स्वच्छ पाण्यांत स्नान करून गुरांसह घरीं यावें व भोजन करावें हा त्याचा दिनक्रम होता. सायंकाळीं मामांकडे बसून वेदाध्ययन चाले. पद्माकर अंधत्वाचा अपवाद वगळतां, संवयीनें सर्व कामांत हुशार झाला होता.

असाच एका दुपारीं पद्माकर स्नानासाठीं तळ्यांत, रोजच्या दगडावर उतरला' इतक्यांत 'पद्माकर, हाताला मिळेल त्या झाडपाल्याचा रस आपल्या डोळ्यांच्या लाव. दृष्टिलाभ होईल' असा आवाज त्यानें ऐकला. आपली कुणीतरी चेष्टा करीत आहे असें वाटून, पद्माकरानें दुर्लक्ष केलें व स्नान करून तो घरीं आला, दुसरे दिवशीं तोच प्रकार धडला. तेव्हां मात्र पद्माकराला फार दु:ख झालें. स्नान करून वर येतांच त्यानें पद्मनाभाचें स्मरण करून आपलें दु:ख त्याला कथन केलें. जड मनानें घरीं येऊन भोजन केलें.

त्याच रात्रीं पद्माकराला स्वप्न पडलें. स्वप्नांत प्रत्यक्ष पद्मनाभ देव त्याला दिसले. देव म्हणाले, 'बाळ पद्माकर, गेले दोन दिवस दुपार स्नानसमयीं तुला जी सूचना मिळाली ही खरी आहे. मी तुझा कुलदेव आहे. तुझे हाल आता संपले आहेत. उद्यां दुपारीं सूचनेप्रमाणें कर. दृष्टि येईल' चार हातांचीं, हंसतमुखी, आशीर्वाद देणारी ती देवमूर्ति स्वप्नांत हें सांगून गुप्त झाली.

पद्माकर जागा झाला. प्रात:काल झाला होता. मामा उठले होते. पद्माकरानें त्यांना सर्व सांगितलें. मामना गहिंवर आला. त्यांनीं त्याच्या तोडून देवध्यानाचें वर्णन ऐंकून घेतलें. वर्णनाबर-हूकूम पद्मनाभाची छोटीशी मूर्ति त्याच्या बहिणी धरून आणून, मामांनी आपल्या देव्हाऱ्यांत पूजेसाठीं ठेविलेली होती, त्यांना स्वप्नाची सत्यता पटली. त्यांनी पद्माकराची समजूत घालून सूचनेप्रमाणें वागण्यास त्याला सांगितलें. पद्मा कराने श्रद्धेनें कुलदेवस्मरण करून हात जोडले.

दुपारीं पद्माकरानें स्वप्नातील सूचनेप्रमाणें केले. त्याला थोडे थोडें दिसू लागलें. स्नानानंतर त्याला संपूर्ण दृष्टीलाभ झाला. त्यानें सभोंवतीं पाहिलें. तळ्याकांठचें तें सृष्टिमौंदर्य तो अतृप्त नजरेनें पिऊं लागला. बऱ्याच वेळानें तो भानावर आला. वर येतांच त्याला एका तुळसी वृक्षाजवळ कुणीतरी उभा राहून, आपणाकड़े हास्यमुद्रेनें पहात असल्याचा भास झाला. जवळ गेल्यावर कुणीच दिसलें नाहीं. तो तसाच धावत सुटला. मामां-कडे आला. ' मामा, मला दृष्टी मिळाली. स्वप्न खरें ठरलें, मामाना अपार आनंद झाला. पद्माकराला पोटाशीं धरून त्यांनी आनंदाश्रुनीं त्याला न्हाऊं घातले. नंतर मामांच्या आज्ञेवरून पद्माकरानें स्वहस्तें पद्मनाभाची पूजा केली. अगदीं स्वप्नांतील दृष्टांताप्रमाणेंच ती सुवर्णमूर्ति होती. पूजा केल्या नंतर याला फार समाधान लाभले. नंतर सर्वांना भोजन केले.

देवकृपा होऊन पद्माकराला दृष्टी लाभ झाल्याची वार्ता हां हां म्हणतां सर्व गांवभर पसरली सर्वजण पद्माकराच्या समा-चारास आले. तो अंधाचा डोळस झाला म्हणून सर्वांनाच आनंद

झाला. पद्मनाभावर त्यांची भक्ति बसली पद्माकराला सर्वांनीच आशीर्वाद दिले. मामांनी पद्माकराला त्याच्या माता पित्याची पूर्वकहाणी सांगितली व कुलदेवावर श्रद्धा ठेवण्यास बजावलें.

मामांच्या आज्ञेप्रमाणे पद्मनाभावर निष्ठा ठेवून पद्माकर, मामाघरचे सर्व व्यवहार पहात असे. रोज तळ्याकांठी जाऊन तुलसीवृक्षाखालीं वसे व पद्मनाभ स्मरण करीं. घरांत पूजा करी. आतां तो वीस वर्षाचा झाला होता.

एका रात्री पद्माकरला पुन्हां स्वप्नांत पद्मनाभदर्शन झाले. देव त्याला म्हणाला ' पद्माकर येत्या अमावस्येच्या रात्रीं गावावर चांचे लोकांचा दरोडा पडणार आहे. तूं गावच्या तरुणांना गोळा करून त्यांना ही सूचना दे व सर्वाच्या मदतीनें गांवचें रक्षण कर. पद्माकर जागा झाला. त्यानें हा दृष्टांत मामांना सांगितला. मामांनी हात जोडलें. पद्माकराचेंही आपोआप हात जोडले गेले. मामा म्हणाले, ' तो दयाधन प्रभु सांगतो आहे तेंच कर ' पद्माकरानें गांवच्या सर्व तरुण मुलांना गोळा केलें. त्यांना स्वप्नाचीं कथा सांगितली व अमावास्येच्या रात्रीं समुद्रकाठीं सावधगिरीने लपून बसून गांवावर येणाऱ्या संकटाला तोंड देण्याची कल्पना दिली. सर्वजण कबूल झाले.

बरोबर अमावास्येच्या रात्रीं चाचेलोक कांठावर उतरले. सर्वांकडे हत्यारें होतीं. सावधगिरीने आपल्या म्होरक्याच्या मागोमाग, ते चांचे पुढें पुढें काळोखांत सरकत होते. जवळच झाडींत पद्माकराचे साथीदार लपून बसले होते. त्यांनीं लगेच हातांतील दांड्यानी त्या चाच्यांचा समाचार घेतला. हा अनपेक्षीत हल्ला पाहतांच मागचे चाचे पळून गेले पण पुढचे सांपडले.

त्यांना बराच मार बसला. तरीपण तेही काळोखत गुप्त झाले चाच्यांचा कांही माल व थोडेसें द्रव्य पद्माकराचे हातीं लागलें.

तिसऱ्या दिवशी शेजारच्या गांवावर चांच्यांनी दरोडा घातल्याची वार्ता कळली. त्या गांवचे लोक पद्माकराकडे आले व मदत मागूं लागले कारण त्यांना त्रिवेंद्रमचे पद्माकरानें रक्षण केल्याची वार्ता कळली होती. पद्माकरानें आपल्या साथीदारांचे मदतीने त्या गांवच्या तरुणांचीं सेना उभारली.

दुसऱ्या अमावस्येला दोन दिवस असतांनाच पद्माकराला पुन्हा स्वप्नांत दृष्टांत झाला की, पूर्वींचा चाच्यांचा म्होरक्या येत्या अमास्येला मोठ्या तयारीनिशीं गावावर दरोडा घालणार आहे. मागीलप्रमाणें सावधानता ठेवावी.

पद्माकराने आपलें साथीदार व शेजारच्या गांवचें साथी-यांना सूचना देऊन अमास्येच्या सायंकाळी समुद्रकाठी झाडीत वाकवून बसविले. सर्वाकडे धनुष्यबाण, गोफण व दगडांची पाठीला बांधलेंली पिशवी दिली. दोनदोनांची टोळीं ठिकठिकाणी लपविली आणि योग्य संधीची सर्व वाट पहात बसले.

बरोबर मध्यरात्रीं चांचें जमिनीवर उतरले. त्यांनी बरो-बरचें कांहीतरीं वाळूंत पुरुन टाकलें. सावधपणें तें काळोखांत गावांकडे सरकू लागले. पद्माकर एका ऊंच झाडावर मामेभावा सह बसून हें सर्व पहात होता. सर्वजण टप्यांत येतांच पद्माकरानें खुणेची टाळी वाजविली. त्यावरोबर सर्वांनी चाच्यांवर एकदम हल्ला केला. यावेळीं सर्व चांचें ठार झाले, त्याची प्रेतें पाहण्यासाठीं सर्वं गावकरीं जमले. नंतर तीं प्रेतें समृद्रात फेंकून दिली. पद्माकराने सर्वांच्या मदतीने, चाच्यांच्या म्होरक्यानें पुरून काय ठेवले होते

ते उकरून काढलें. त्यांना सुवर्णाच्या मोहरांचा हंडा पुरलेला मिळाला. पद्माकरानें तें द्रव्य सर्वांना सारखें वाटून दिले. त्यावेळीं पद्माकर व त्याचा कुलदेव पद्मनाभ यांचा सर्वांनीं जयजयकार केला. सर्वांच्या संमतिने पद्माकर हा गांवचा सरदार निवडला गेला आणि तुलसीवृक्षाभोवती बसून सर्वांनी पद्मनाभ हा ग्राम-देव म्हणून व पद्माकर हा सरदार नायक म्हणून, मान्य अस-ल्याच्या शपथा घेतल्या. चांच्यांची समूद्रातील गलबतें पद्माकरा-च्या स्वाधीन करण्यात आली. समुद्राकांठी गलबतांच्या साह्यानें पद्माकर साथीदाराच्या मदतीनें पहारा करूं लागला.

पद्मामाकराच्या दृष्टातांची व शौर्याची कीर्ति सगळीकडे पसरली होती. त्यामुळें त्या भागांत पुन्हां चांच्यांच्चा दरोडा पडला नाही. परंतु दुसऱ्या एका भागांत चांच्यांचा दरोडा पडणार असल्याच्या भयाने ते लोक पद्माकराकडे मदतीसाठीं आले. त्याने आनंदानें मदत दिली. दुसऱ्या दिवशीं रात्री त्या गावी चाचे आले. पण पद्माकरापुढें त्यांचा बेत फसला. त्याचा म्होरक्या हातीं आला. बाकीचे पळून गेले. म्होरक्याला भरपूर चोप दिल्यावर तो शरण आला व त्यानें सर्वांचा ठावठिकाणा सांगितला. दरोडे घालून मिळविलेलें सर्व द्रव्य देण्याचें कबूल केलें. पद्माकरानें सर्वांना पकडून, त्या गांवच्या राजाकडे त्यांना पाठवून दिलें. म्होरक्याने दिलेलें द्रव्यही, त्याच्यासह राजाकडे पाठवून दिलें. राजानें सर्वांना शिक्षा करून पद्माकराला उंची पोशाख, पालखी व घोडा नजराणा म्हणून सन्मानानें बोलावून दिला. शिवाय पुष्कळसें धनही दिलें. पद्माकर घरीं आला.

त्याच रात्री पद्मकराला स्वप्नांत पुन्हां दृष्टांत झाला. 'पद्ममाकर, तूं तळ्याकाठीं ज्या तुळसीवृक्षाजवळ नेहमीं बसतोस

त्याखालीं तळघर आहे. आंत माझी पाषाणी मूर्ती असून कोपऱ्यांत एक द्रव्याचा हंडा आहे. जवळच एक शुभ्रवर्णी अंध झालेला सर्प आहे. तो तुझा मूळ पूर्वज असून माझा परम भक्त आहे. त्यानेंच आपली दृष्टि तुला देऊन स्वत: अंधत्व पत्करलें आहे. येत्या पौर्णिमेदिनीं हें तळघर खणून माझी मूर्ति बाहेर काढ व तुलसी-वृक्षाखालीं तात्पुरती स्थापना कर. आंत प्रवेश करतांच त्या सर्परूपांत असणाऱ्या पूर्वजाला वंदन कर. तो कांहीं करणार नाहीं. त्याला दूध दे व पुढेंही नित्य देत जा. पुढच्या पौर्णिमेदिनीं मजसाठीं मंदिर बांधण्याचा मुहूर्त कर व मंदिर पूर्ण होतांच त्यांत माझी प्रतिष्ठापना समारंभपूर्वक कर. मंदिर समारंभानंतर तुझा तो पूर्वज मुक्तीला जाईल.'

पद्माकर जागा झाला. कुलदेवाच्या कृपाप्रसादासाठीं आपला पूर्वज सर्परूपांत तळघरांत अंधत्व पत्करून, देवभक्ति करीत मुक्तीसाठी ताटकळत आहे हें ऐकतांच पद्माकरला दु:ख झालें. दृष्टांताप्रमाणें आचरण करून पूर्वजाला मुक्ती देवविणें व देवमंदिर उभारणें आवश्यक होतें. नित्याप्रमाणें प्रात:स्मरण करून तो कामाला लागला. योग्य वेळीं त्यानें मामा व इतर ग्रामस्थ यांना ही हकीकत कथन केली. या कामीं सर्व ग्रामस्थ पद्माकरला मदत करायला तयार झाले. पौर्णिमेला अद्यापि चार दिवसांचा अवधि होता.

पौर्णिमेदिवशीं प्रात:काळीं पद्माकर एकटाच तळ्याकांठच्या तुळसीवृक्षाजवळ गेला. तेथें त्याला त्याचा सर्प रूपांतला पूर्वज तुलसीपर्णे खात असलेला दिसला. त्याचा वर्ण शुभ्रच होता-पद्माकरानें त्याला वंदन करून, आज तळघर खणून पद्मनाभ

मूर्ति वर काढणार असल्याचें सांगितलें. पूर्वजानें हें ऐकतांच फणा उभारून व डोलून आनंद दर्शविला आणि तो मुळाजवळच्या एका बिळांतून आंत निघून गेला.

पद्माकर शुचिर्भूत होऊन, सर्व मातुल कुटुंबासह तळ्याजवळ आला. दुसरेही जमले. बरोबर सूर्योदयाच्या मुहूर्तावर, पद्माकरानें तुळशीवृक्षापासून ५ हातांवर पहिली कुदळ मारली. नंतर सर्वांनीं बरोबरीनें खणून तळघराची वाट शोधून काढली व आंत प्रवेश मिळविला दृष्टांतांतील सूचनेप्रमाणें पद्माकरानें आपल्या पूर्वजाला वंदून दूधाचा पेला त्यापुढें ठेविला. आंत सूचनेप्रमाणें सर्व दिसून आलें. दूध पिऊन तो पद्माकरपूर्वज एका बाजूला झाला. पद्माकरानें पद्मनाभाचें स्मरण करून मूर्तीला हात लावला व इतरांचे मदतीनें ती वर आणली. द्रव्याचा हंडाही वर आणून ठेवला. तुळशीवृक्षाखालीं मूर्ति व हंडा ठेवला. लगेच तो पूर्वजही तेथें येऊन वेटोळें करून रक्षणार्थ बसला. माध्यान्ह-समयीं विधीपूर्वक स्थापना झाली व पद्माकरानें पूजा आटोपली. मंदिर पूर्ण होईपर्यंत सर्वजणांनीं त्या स्थानरक्षणाची पाळी वाटून घेतली,

पद्मनाभाची तात्पुरती स्थापना झाल्या दिवसापासून पद्माकर रोज सकाळ, दुपार, सायंकाळीं दर्शनास व पूर्वजाला दूध देण्यास जात असे. दुपारीं पूजा करी. सर्व ग्रामस्थ रात्रौ नित्य भजन करीत असत. कधीं कधीं भजनसमयीं पद्मा सर्पासाठीं दूध आणी व त्यापुढें ठेवी. असा नित्यक्रम चालू असतां, एका रात्रीं पद्मनाभ मंदिर बांधण्याबद्दल, सर्वांमतें विचार होऊन नक्की दिवस ठरला. त्यावेळीं पद्मा व पद्माकर या उभयतां-

भोवतीं, सर्पानें तीन फेऱ्या घालून मग आपल्या जागीं तुळशी-वृक्षाखालीं बैठक घेतली. याचा अर्थ कोणाचेच ध्यानीं येईना. शेवटीं एका विद्वान वृद्धानें स्पष्टीकरण केलें कीं, आपण जी आतां चर्चा करून मंदिर बांधण्याचा नक्की निर्णय घेतला आहे, त्यापूर्वीं पद्मा व पद्माकर यांचा विवाह व्हावा व त्यांच्या हस्तें पद्मनाभ मूर्तीची मंदिरांत प्रतिष्ठापना व्हावी. दुसरा या कृतीला अर्थ नाहीं. पद्माकराचा मामा या विवाहाला संतोषानें कबूल झाला. सर्वांना ही गोष्ट मान्य होऊन, तेथेंच या विवाहाचा बेत ठरला.

यावेळेपर्यंत पद्मनाभ देवाची व पद्माकराची बरीच प्रसिद्धी झाली होती. आजूबाजूच्या गावांतून कित्येक लोक त्रिवेंद्रमला दर्शनासाठीं येत. पद्माकराच्या विवाहाची वार्ता अशाच प्रकारें सर्वत्र पसरली. सर्वांनाच आनंद झाला. लवकरच एका शुभ मुहूर्तावर पद्मा व पद्माकर विवाहबद्ध झालीं. या विवाहानें पद्माकराचा गौरव केला. शेजारच्या प्रदेशाचा राजाहि आलेला होता. त्यानें पद्माकराला पुष्कळ भेटी दिल्या व मंदिर बांधण्याकरितां कांहीं द्रव्यहि दिलें.

विवाह झाल्यावर पद्माकरानें सर्वांच्या संमतीनें पद्मनाभ मंदिर बांधण्याचें काम हातीं घेतलें. सहा महिन्यांत मंदिर बांधून पूर्ण झालें. एका उत्तम मुहूर्तावर मूर्तीची प्रतिण्ठापना विधी-पूर्वक पद्मा व पद्माकर हस्तें झाली. यावेळीं अखेरच्या क्षणीं पद्माकराचा पूर्वज गर्भागारांत मूर्तीच्या पायाशीं येऊन वेटोळें घालून व फणा काढून बसला. त्यानें मनुष्यवाणीनें पद्माकर व पद्मा यांना जवळ बोलावून घेतलें. उभयतांना आशीर्वाद

दिला. सर्व ग्रामस्थांचा निरोप घेतला आणि पद्मनाभाची भक्ति व सेवा करून, त्याची कृपा संपादन करण्याची विनंति केली. पद्माकराला आपल्या तोंडांत पद्मनाभाचें तीर्थ घालण्यास सांगून, आपल्याला तुलसीवृक्षाजवळ दहन करण्यास सांगून, त्यानें तीर्थ घेऊन प्राणत्याग केला. पद्माकराला दुःख झालें. त्यानें पूर्वजाचे इच्छे प्रमाणें करून त्याची तेथेंच समाधी बांधली. त्रिवेंद्रमला पद्मनाभ मंदिराचें प्राकारांत, ही समाधी व तुलसीवृक्ष पाहायला मिळतो.

आपल्या पूर्वजाच्या मुक्तीसाठीं, पद्माकरानें सतत अकरा दिवस, अकरा ब्राह्मणांकरवीं पद्मनाभावर दुधाचा अभिषेक करविला व त्यांस एकेक गाय दान दिली. त्याच रात्रीं पद्माकरला पुन्हां, पद्नाभदर्शन स्वप्नांत झालें. त्याला पद्मनाभ संतोषपूर्वक आशीर्वाद देऊन म्हणाले, 'पद्माकर, तुझा पूर्वज मुक्ती पावला आहे. त्या माझ्या भक्ताला मी वैकुंठलोकीं स्थान दिलें आहे. तूं अकरा गायी दान दिल्या आहेस म्हणून, तुझ्या कुळांत एकंदर अकरा पुरुष राजपद भोगतील. नंतर तुझ्या वंशजांना फक्त राजपदाचा मान राहील. लवकरच तूं या भागाचा राजा होशील. न्यायानें व दयाबुद्धीनें आपलें कर्तव्यपालन कर.'

पद्माकर जागा झाला. त्याचवेळीं पद्मा पण हेंच स्वप्न अनुभवून जागी झाली होती. तिनें पतीला हें स्वप्न कथन केलें उभयतांनीं मामापाशीं जाऊन त्यांचा आशीर्वाद घेतला. मामांना पण फार समाधान झालें. मामा व मामीनें उभयतांना देवघरांत नेऊन पद्मनाभाचें तीर्थप्राशन करविलें.

त्याच दिवशीं दुपारी शेजारचे राजाचा हत्ती राजचिन्हानीं

विभूषित व सोंडेंत रत्नमाला घेतलेला असा पुढें व मागें प्रधान, इतर सरदारमंडळी घोडयांवर बसलेली अशा थाटांत पद्माकराचे दारात उभा राहिला. पद्माकर पूजा करीत होता. पूजा आटोपून काय प्रकार आहे ते पाहण्यासाठीं तो बाहेर आला. तोंच हत्तीनें त्याचे गळयांत माळ घातली व इतरांनीं, 'पद्माकर महाराज कीं जय !' असा जयघोष केला. पद्माकर गोंधळला पण प्रधानानें पुढें येऊन उलगडा केला कीं, 'शेजारचें त्याचा गौरव केलेले महाराज गेल्या संध्याकाळीं शिकारीस गेले असतां त्यावर वाघानें हल्ला करून त्यांचा प्राण घेतला. महाराज निपुत्रिक असल्यानें राज्याच्या प्रथेप्रमाणें हा हत्ती शृंगारून चालविला होता. तो तडक आपल्याच दारीं थांबला आणि त्याने आपणांस महाराजे म्हणून ही रत्नमाला घातली आहे. तरी आपण आजपासून आमचे महाराजे आहांत' सर्वांनीं पद्माकराचा पुन्हां जयजयकार केला. आतां त्याला रात्रींच्या स्वप्नांचा उलगडा झाला. त्यानें मार्ग वळून पद्मानाभाला हात हात जोडले. त्याच्या मागे पद्मा उभी होती. तिला महाराणी म्हणूत अलंकार व वस्त्रें प्रधानानें अर्पण केली. सर्वांना आनंद झाला.

पद्मानाभसेवेंत अंतर पडूं नये म्हणून पद्माकरानें, सर्वांच्या विचाराने त्रिवेंद्रमलाच राज्यांभिषेक समारंभ व राजधानी करण्याचें ठरविलें. त्याच दिवशीं तिसरे प्रहरीं त्याचा राज्याभिषेक झाला व पद्माकर त्रिवेंद्रमचा राजा झाला.

केवळ देवकृपेमुळें पद्माकर अंधत्व नष्ट पावून राजा झाला. त्यानें आपल्या प्रजेचें सतत कल्याण केलें. न्यायानें कार-

भार केला. जागृत देवस्थान म्हणून पद्मनाभाची प्रसिद्धी आहे. पद्माकराची त्यावर अत्यंत श्रद्धा होती. पुष्कळ वर्षे राज्य करून मोठ्या समाधानानें पद्मा व पद्माकर यांनीं एकाचवेळीं प्राण-त्याग केला. उभयतांची समाधी पद्मनाभ मंदिरांत दीपमाले-जवळ आहे. पद्मनाभ आणि पद्मा, पद्माकराची ही कथा यात्रेकरूंना त्रिवेंद्रमवासी सांगतात.

* * *

कथा सातवी.

# चा मुं डा दे वी ची कृ पा

---

म्हैसूर शहराजवळ राजधराण्याची कुलदेवता "चामुंडादेवी" हिचें स्थान उंच डोंगरावर असून त्या स्थळाला "चामुंडा हिल्स" म्हणून संबोधतात. मंदिरासमोर महिषासुराचा अजस्त्र पुतळा आहे. माता पार्वतीचा चामुंडादेवी हा अवतार असून दैत्यांचा नाश करून, धर्माचरणी व भक्तजनांच्या रक्षणा-साठीं हा अवतार पार्वतीनें धारण केला आहे. संकटांत सांपडलेल्या देव आणि मानव भक्तांना ही देवी अभय देऊन, शाश्वत संकट-मुक्ति देते असा तिचा लौकिक आहे. अठरा शक्तिदेवतांमधील हा प्रमुख अवतार आहे. नयनरम्य व आल्हाददायी निसर्गसौंदर्य असलेला परिसर, स्वच्छ, शांत व जागृत स्थान असल्यानें तेथें भक्तांची सदैव गर्दी असते. राजघराण्यातर्फें येथें नित्य उत्तम पूजा व्यवस्था लावून दिलेली आहे.

धनदेवता लक्ष्मी हिच्या शाश्वत प्राप्तीसाठीं, एकदां धनपाल व धनपति यांच्या वादांत लक्ष्मीवर मोठें धर्मसंकट आलें असतां, माता चामुंडेच्या कृपेनें धनपालाला शिक्षा मिळून, देवी लक्ष्मी

संकटमुक्त होऊन कशी संतोष पावली त्याविषयीं खालीलप्रमाणें कथा प्रसिद्ध आहे.

धर्मपाल नांवाचा एक चामुंडा भक्त म्हैसूरच्या पंचक्रोशींत पूर्वी होऊन गेला. मनाचा दयाळू वृत्ति धार्मिक आणि सत्यावलंबी असल्यानें मातेच्या कृपेनें, देवी लक्ष्मी त्याची अहोरात्र सेवा करीत असे. नित्य प्रात:काळीं धर्मपालाच्या उशापाशीं, रत्नें व सुवर्णमुद्रा भरलेलें एक सुवर्णतबक, रेशमी वस्त्रानें झाकलेलें असें देवी लक्ष्मी ठेवीत असे. धर्मपाल प्रात:काळीं उठतांच माता चामुंडा व लक्ष्मी यांचें स्तवन करून, आपले देहधर्म आटोपून डोंगरावर चामुंडा दर्शनास जाई. घरी येऊन आपले दैनिक व्यवहार पुरे होतांच, त्या सुवर्णतबकाची पूजा करून सर्व द्रव्य, तबक व वस्त्रासह अडचणींत असलेले गरीब लोक व सत्पात्र अतिथी यांना वांटून देई. निर्लोभी स्वभावामुळें तो द्रव्यसंचयापासून अलिप्त राही. प्रसंगीं देशसंकट निवारणार्थ, राजालाही तो हें द्रव्य देई. धर्मपालाला राजा व सर्व प्रजाही फार सन्मानानें वागवी. परोपकारांतच त्याचें सर्व द्रव्य खर्च होई. देवी लक्ष्मी रात्रौ धर्मपाल निद्राधीन झाल्यावर त्याचे पाय चुरणें, वारा घालणें व त्याची अन्य सेवा करणें यासाठीं साक्षात होऊन त्याच्या आसपासच राही.

धर्मपालाच्या अवसानानंतर, त्याचा वंशज धनपति हा पण हीच परंपरा टिकवून होता. गीतेंतील भगवान श्रीकृष्णवचन "यतो धर्मस्ततो जय: !" हें आयुष्याचें ध्येय मानून धनपति वागत असे. पित्याकडून मृत्यूसमयीं धनपतीला मिळालेला उपदेश आजन्म आचरणें एवढेंच तो जाणत होता. त्या घराण्यांत प्रत्येक

पुरुष याच मार्गाचा अवलंब करीत असल्यानें त्यांवर श्रीसरस्वति व श्रीलक्ष्मी यांची पूर्ण कृपा होती. धर्मपालाचें घराणें ही त्या परिसराची शोभा व भूषण होतें.

धनपाल नांवाचा एक व्यापारी यात्रा व व्यापार यासाठीं दक्षिणेकडून उत्तरेकडे फिरत फिरत एकदां धनपतीच्या घरीं मुक्कामाला राहिला. अत्यंत द्रव्यलोभी असा त्याचा स्वभाव होता. त्याचा फार मोठा व्यापार चाले व निरनिराळ्या गांवीं त्याच्या पेढ्याही होत्या. व्यापारांत त्यानें अगणित द्रव्य मिळविलें होतें. सदैव द्रव्यसंचयाची चिंता तो वाही. निर्व्यसनी, द्रव्यलोभी व द्रव्यप्राप्तीसाठी कोणतेंही अन्याय्य कृत्य करण्यांत तो तरबेज होता. जो जो त्याच्या तावडींत सांपडला त्यांची संपत्ति हरण करण्यांत धनपालाची विलक्षण बुद्धि चाले.

धनपतीचीं कीर्ति धनपालानें ऐकली होती व त्या गांवांत एकादी पेढी स्थापन करावी अशा हेतूनें तो धनपतीच्या घरीं येऊन राहिला होता. धनपालाचा अंतस्थ हेतु धनपतीला त्याच्या सरळ स्वभावामुळें कधींच कळला नाहीं. उलट धनपालाच्या गोडबोल्या स्वभावानें धनपति त्याला सन्मित्र मानून वागवीत असे.

पहिल्याच दिवशीं धनपतीनें त्याचें उत्तम आतिथ्य करून त्याची योग्य व्यवस्था लावून दिली. धनपाल मनोमन खूष झाला. रात्रौ धनपतीनें आपल्याच शयनगृहांत धनपालाची झोंपण्याची व्यवस्था केली. निद्रेपूर्वीं परस्परांत व्यापार व अन्य गोष्टींची चर्चा झाली. यानंतर उत्तम केशरमिश्रित दूध उभयतां प्याले व धनपति निद्राधीन झाला. धनपाल आपल्या व्यवसायाचे विचार

मनांत घोळवीत असल्यानें तो फक्त पडून राहिला. त्याला निद्रा आली नाहीं. रात्र बरीच झाली होती.

व्यवसायाचे विचार मनांत आंखीत असतां, सहज धनपालाची दृष्टि शेजारीच गाढ निद्रा करीत असलेल्या धनपतीवर पडली. कुणीतरी अत्यंत रूपवति व तेजस्वी स्त्री धनपतिशेजारीं उभी असून, त्याला पंख्यानें वारा घालीत आहे, असें दृश्य त्याला दिसलें. मधेंच धनपति झोपेंत अंथरुणावर इकडचा तिकडे कूस बदली तेव्हां, त्याचे देहावरील शाल ती स्त्री सारखी करी व त्याची सर्व सेवा करी. धनपालानें नीट लक्षपूर्वक पाहिलें. ही स्त्री, धनपतीची दासी असावी कीं, धर्मपत्नि ? त्याला कांहींच बोध होईना. झोपेच्या मिषानें धनपाल त्या स्त्रीवर लक्ष ठेवूं लागला. इतक्यांत धनपतीनें झोपेंत कूस बदलली व त्याचे अंगावरील शाल शेजारी पेटत असलेल्या समईवर पडली. चटकन त्या स्त्रीनें ती शाल उचलून धनपतीच्या देहावर नीट घातली. समईची ज्योत विजली नाहीं कीं, शाल जळली नाहीं. झोपेंत काय घडलें याची धनपतीला जाणीवही झाली नाहीं पण त्या सेवाभावी दक्ष स्त्रीमुळें त्यावरील संकट टळलें हें धनपालानें जाणलें. तो आश्चर्यचकित झाला. या एकंदर गोष्टीचा छडा लावला पाहिजे असा बेत करून, तो लक्ष ठेवूं लागला.

नित्यनियमाप्रमाणें धनपति प्रात:कालीं जागा झाला. त्याची सेवा करणारी ती रूपवती स्त्री त्याला प्रणाम करून निघून गेली. ती स्त्री निघून जातांच धनपतीच्या उशाशेजारीं एक आच्छादित सुवर्णतबक एकाएकीं दिसूं लागलें. धनपति नित्यकर्माला निघून गेला. निद्रामिषानें धनपाल हें सर्व पहात होता.

सूर्योदयसमयीं धनपति माता चामुंडा दर्शन करून घरीं परतला तेव्हां धनपाल शय्येवर उठून बसला होता. धनपतीनें त्याची व्यवस्था पाहण्यास सेवकास बोलावून, धनपाला कडे पाठवून दिलें. धनपति दिवाणखान्यांत धनपालाची अल्पोपहारा-साठीं वाट पहात थांबला होता.

दिवाणखान्यांत धनपाल येतांच धनपतीनें त्याला स्वस्थ निद्रा लागली कीं नाहीं वगैरे चौकशी करून दूध व उपहार घेण्यास विनंति केली. स्वस्थ निद्रा लागली असें सांगून धनपा-लानें उपहार आटोपला. रात्रौ निद्रेपूर्वी शयनगृहांतील सेवा करणाऱ्या स्त्रीची माहिती मिळवावी या हेतूनें तो गप्प राहिला व आपल्या कामास निघून गेला. धनपति आपल्या नित्यकर्माला लागला.

रात्रौ पूर्वरात्रीनुसार उभयतां दुग्धपान करून निद्रा करणार इतक्यांत, धनपालानें आपला गतरात्रींचा अनुभव कथन केला व रहस्यभेद करण्याची धनपतीला विनंति केली. "ती स्त्री साक्षात लक्ष्मी असून श्रीचामुंडाकृपेनें आपलें रक्षण करते" असा यावर धनपतीनें खुलासा केला. धनपाल हें ऐकून वरवर समधान झाल्याचें दर्शवून, मनांत ही लक्ष्मी आपणाला कशी वश होईल याचे बेत करूं लागला. आज रात्रीं कोणतें दृश्य दिसतें तें पाहण्या-साठीं तो आतुर झाला होता. त्यारात्रींही माता लक्ष्मी त्याच्या सेवेला हजर असल्याचें त्याला अनुभवास आलें.

दुसऱ्यां दिवसीं धनपतीकडे सकाळीं उपहार करून धनपाल आपल्या कामासाठीं बाहेर निघाला. पण धनपतीचा नाश करून लक्ष्मीला आपली दासी करण्याचें दुष्टी विचार त्याचे मतांत

घोळत होते. सारा दिवस याच दुष्ट बेताच्या योजनेंत त्याने वेचला व मनांत कांहीं निश्चित बेत केल्यावर तो स्वस्थ झाला. रात्रीं भोजन उभयतांनीं बरोबर केले व धनपाल शयनगृहांत निघून गेला. धनपनि आपलें काम आटोपून शयनगृहांत आला आणि त्यानंतर उभयतांसाठीं सेवकानें दूध आणून त्याच्या पलंगा-शेजारीं ठेविलें व सेवक निघून गेला. धनपाल योग्य संधीची वाट पहात राहिला.

पूर्वयोजनेनुसार धनपालाचा माणूस धनपतीच्या चौकशीला आल्यानें धनपती शयनगृहांतून बाहेर निघून गेला. याच संधीची धनपाल वाट पहात होता. त्यानें चटकन कमरेच्या पुडींतील वीष धनपतीच्या दुधांत टाकून दिलें व पुढील योजना मनाशीं जुळवीत, धनपाल पलंगावर बसून धनपतीची वाट पहात राहिला. धनपती येत असल्याचा पावलांचा आवाज त्यांला ऐकू आला. इतक्यांत, एकाएकी दुधाचे पेले बदलले गेले. पण पेले बदल-णारी व्यक्ति मात्र, धनपालाला दिसली नाहीं. धनपति येतांच त्यानें त्याला दूध घेण्याची विनंती केली, स्वत: आपलें दूध प्याला व निद्राधीन झाला. धनपाल मनोमन खजिल झाला. दुधाकडे दुर्लक्ष करून तो क्रुद्धमुद्रेनें निद्रिस्त धनपतीकडे पाहात राहिला. फसलेला बेत कसा साधावा याचेच बेत तो मनोमन करीत होता.

धनपति निद्रिस्त झाल्यावर गतरात्रींप्रमाणेंच देवी लक्ष्मी त्याच्या सेवेत तत्पर असलेली त्याला दिसली. गतरात्रीपेक्षां आज ती विशेष दक्षता घेत आहे असें धनपालाला आढळलें. मधेच ती क्रुद्ध दृष्टीनें धनपालालाकडे पाहात असल्याचेंही

त्याला कळून आलें, तिच्या दृष्टीला दृष्टि देण्याचें धैर्य त्याला होईना. आपलें नेत्र जड होत असून, झोंप येत असल्याची त्याला जाणीव झाली व तो गाढ झोपी गेला. धनपाल पूर्ण निद्राधीन झाल्याची खात्री होताच, देवी लक्ष्मी धनपतीकडे कृपादृष्टि टाकून तडक, माता चामुंडा मंदिरांत दाखल झाली व रडून सारा धनपालाचा कावा, माता चामुंडेला कथन केला. चामुंडादेवीनें लक्ष्मीला अभय देऊन शांत केलें व काय इच्छा असेल तें सांगण्यास आज्ञा केली.

"माते, धनपति हा धर्माचरणी असून माझी त्यावर पूर्ण कृपा आहे व त्याला तूंच कारण आहेस. मला तो पतिस्थानीं आहे व असावा एवढीच इच्छा आहे. शिवाय त्याचा पाहुणा धनपाल हा, मला केवळ पित्यासमान असावा. तो द्रव्यलोभी असून कृपण आहे. धनसंचय हेंच त्याचें कर्तव्य आणि धनव्यय हें धनपतीचें असावें असा आशीर्वाद असावा.

"देवीं, उदईक प्रातःकाली धनपालाला त्याच्या कृत्याचीं व हेतूची जाणीव देऊन किडा होशील असा शाप दे. माझा तुला संपूर्ण आशीर्वाद आहे."

देवीं लक्ष्मी प्रसन्न मनानें धनपतिगृहीं आली. प्रातःकाल व्हायला थोडा अवधि होता. धनपति व धनपाल उभयतां प्रातःकालीं एकदमच जागे झाले. त्याचवेळीं देवी लक्ष्मी उभयतांसमोर उभी राहून धनपालाला म्हणाली, "धनपाल, केवळ धनसंचय हेंच तुझें कर्तव्य. धनपभोगाचा तुला अधिकार नाहीं. तो खरा अधिकार धनपतीचा आहे. तूं धनपाल या नात्यानें मला पित्यासमान आहेस पण रात्रीं धनपतीला दुधांत वीष मिसळून

त्याचा नाश करून, मला वश करण्याचा तुझा बेत असल्यानें तूं कीडा होशील असा तुला शाप देत आहें."

"माते. चूक झाली. तुझ्या दर्शनानें मला स्वकर्तव्याची जाणीव झालो आहे. मी आनंदानें शाप भोगीन पण माझ्या वंशजाना धनपाल ही संज्ञा शाश्वत असावी."

"तथास्तु." असा आशिर्वाद देऊन देवी लक्ष्मी निघून गेली. धनपाल तेथेंच कीडा झाला व धनपतीला एकंदर प्रकाराची पूर्ण कल्पना आली. 'माते, तुझी कृपा अखंड असू दे' असी धनपतींनें हात जोडून प्रार्थना केली व तो आपल्या नित्य कर्माला लागला.

धनपाल व धनपति असे दोन भेद आपणाला श्रीमान व्यक्तींत आढळतात ते याचमुळें होत. कृपणाप्रमाणें धनसंचय करावा पण, स्वत:साठींहीं तें धन उपयोगांत आणणें म्हणजे धनव्यय मानणारे श्रीमंत असतात तेच हे लोक. हे लोक त्या धनपालाचे वंशज आहेत. धनाचा पूर्ण उपभोग घेणारे व कधीहीं धनाची कमतरता न भासणारे दिसतात, तेच धनपतीचे वंशज होत.

दरवर्षी वर्षाकालारंभीं मृग नक्षत्रसमयीं आपणाला जमीनीवर एक मखमली रंगाचा किडा दिसतो. त्याला मृगकिडा म्हणतात. मखमली नाजुक देह व सुंदर तांबुस मखमली रंगी किडे हेंच धनपाल होत. ते प्रतिवर्षी वर्षारंभीं उत्पन्न होतात व जमिनींत धन शोधीत असतात. आद्रा नक्षत्रात हे किडे पुन्हा मृत होतात. देवी चामुंडाकृपेनें लक्ष्मीदेवी अशा प्रकारें धनपतीची सेवा करीत असते अशी कथा चामुंडाभक्त मोठ्या श्रद्धेनें सांगतात.

* * *

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र ........ नों. दि ..............
वि. ................. भा. ..................

कथा आठवी.

# शिवभक्त जयपाल

दक्षिणेंत रेनिगुंठाजवळ ‘श्रीकालहस्ती’ हें शंकरतीर्थ आहे. भगवान शंकरांचीं जीं पंचतत्त्व लिंगस्थानें आहेत त्यापैकीं, ‘वायुतत्त्वलिंग’ म्हणून हें शिवतीर्थ प्रसिद्ध आहे. पृथ्वीवर नंदीश्वरानें कैलासाचीं जीं तीन शिखरें स्थापन केलीं त्यांपैकीं हें एक मानतात. येथें ‘सुवर्णनदी’ वाहत असून जवळच ‘श्रीकालहस्तीश्वर’ हें सुंदर व विशाल मंदिर आहे.

या क्षेत्राच्या परिसरांत येतांच, मनांतील दुष्ट भावना आपोआप नष्ट होऊन, शिवलिंग दर्शनानें भक्ताला मोक्षपद प्राप्त होतें असें सांगतात. यासाठीं मरणोत्तर सद्गति मिळावी या श्रद्धेनें यात्रेकरू येथें दर्शनासाठीं गर्दी करतात. कित्येक भक्त येथील सुवर्णनदीचें जल ताम्रकलशांतून स्वगृहीं आणून देवघरांत जपून ठेवतात. अंतसमयीं हें जल आपल्या मुखांत पडावें अशी त्यांची इच्छा असते. येथील सुवर्णनदींत मंदिरासमोरील घाटाजवळील डोहांत, एका भाबड्या भक्ताच्या दर्शनाच्या हट्टामुळें

प्रत्यक्ष कालहस्तीश्वर प्रकट झाले व त्यामुळेंच नदीहि पवित्र होऊन, तिचें पाणी सोनेरी रंगाचें झालें असें म्हणतात. म्हणूनच त्या नदीला 'सुवर्णनदी' असें नांव पडल्याचें क्षेत्रस्थांकडून ऐकूं येतें.

या क्षेत्राजवळ सुवर्णनदीपलीकडे एक गुराखी रहात असे. जयपाल असें त्याचें नांव होतें. गावांतील सर्व गाईगुरें घेऊन जयपाल नदी पार करून, कालहस्तीश्वर मंदिरामागील रानांत गाई चरायला आणी व त्यांना रानांत सोडून, जयपाल रानफुलें गोळा करून मोठ्या भक्तीनें कालहस्तीला अर्पण करी. तीच त्याची देवपूजा होती. जयपाल स्वभावानें गरीब, प्रामाणिक व भाबडा शिवभक्त होता. फुलांनीं शिवपूजा करावी. दोनप्रहर होतांच, गुरें सवयीनें नदींत उतरून पाणी पीत व झाडाखालीं सावलींत विश्रांतीसाठीं बसत. त्यानंतर नदीपलीकडे घरीं जाऊन जयपाल भोजन करी व परत मंदिरांत येऊन आराम करी. सूर्यास्तसमयीं महादेवाला नमस्कार करून तो गुरें घेऊन घरीं परते. बालपणासून त्याचा हा नित्यक्रम होता.

एके दिवशीं दुपारचे वेळीं दोन ब्राह्मण नदीवर आले व घाटावर कांहीं धर्मकृत्यें करूं लागले. जयपाल जिज्ञासेनें तें पाहूं लागला. ते ब्राह्मण तेथलेच व जयपालाला परिचित होते. कांहीं गोष्टी उरकल्यावर ते मंदिरांत गेले. तेथें देवदर्शन करून, पुन्हा घाटावर येऊन स्नानासाठीं डोहांत उतरले. स्नान करतांना ते ब्राह्मण तोंडानें 'ॐ शिवाय नमः' असा उच्चार करीत, बोटांनीं नाक दाबून पाण्यांत बुडत व बऱ्याच वेळानें वर येत. हा प्रकार जयपालानें बराच वेळ पाहिला. ब्राह्मण हें कशासाठीं

करतात तें जाणण्यासाठीं जयपाल त्यांना म्हणाला, " हे गुरुदेव, आपण नाक दाबून बराच वेळ पाण्यांत कां बुडतां ?" तेव्हां त्या ब्राह्मणांना या भाबड्या जयपालाची थट्टा करावी असें वाटून, ते उत्तरले, " जयपाल, आम्ही तोंडानें ' ॐ शिवाय नमः ' म्हणून पाण्यांत बुडालों कीं आम्हांला तळाशीं प्रत्यक्ष श्रीकाल-हस्ती दर्शन देतो. यामुळें आम्हांला मोक्षपद मिळेल."

" खरंच ! तुम्हांला पाण्यांत देवदर्शन झालें ?"

" होय तर ! खोटं वाटतं तुला ? तूं सुद्धां शिवस्मरण करून नाक दाबून पाण्यांत बुडी मारलीस तर, तुला नक्कीच शिवदर्शन होईल." जयपालाकडे मिस्किलपणें पहात ब्राह्मण म्हणाले.

जयपालाला जेवणासाठीं घरीं जायचें होतें. पण इतक्या सोपेपणीं जर प्रत्यक्ष श्रीकालहस्ती या ब्राह्मणांना दर्शन देतो तर, आपणहि त्याचें दर्शन अवश्य घेतलें पाहिजे. तो जेवण विसरला. त्याची शिवदर्शनाची भूक तीव्र झाली. क्षणभर जयपालानें विचार केला, अंगावरचें कुडतें काढून फेंकून दिलें व ' ॐ नमः शिवाय ' म्हणून, नाक बोटांनीं घट्ट दाबून दिली उडी ठोकून पाण्यांत. कांही वेळानें तो पाण्यांत गुदमरला व घाईनें वर आला. ब्राह्मणांना म्हणाला,

" गुरुदेव, मला दर्शन घडलें नाहीं. कांहीं चुकलें तर नाहीं ना ?"

" जयपाल, ॐ नमः शिवाय म्हणालास. आमच्या ॐ शिवाय नमः या मंत्रोच्चारानें कालहस्तीश्वरावर विश्वास ठेवून पाण्यांत बुडी मार. देवदर्शन घडेपर्यंत दाबलेलें नाक सोडूं नको. नक्कीच देवदर्शन घडेल."

भाबड्या जयपालानें ब्राह्मणांच्या उपदेशानुसार शिवस्मरण करून नाक दाबलें व पुन्हां पाण्यांत उडी मारली. शिवदर्शन घडल्याविना नाक सोडणार नाहींच हा त्याचा निर्धार होता. बराच वेळ झाला पण जयपाल वर येईना म्हणून ब्राह्मण गडबडले. थट्टा अंगलट येते कीं काय ? या विचारानें ते भ्याले

जयपालाचे प्राण कासावीस होत होते. शिवरूप पाहीन तेव्हांच नाक सोडीन गुरुदेवांची वाणी खोटी कशी असेल ? प्राण कंठाशीं आले तरी शिवदर्शन किंवा मृत्यु हाच त्याचा वज्रनिर्धार होता. तो मनोमन शिवस्मरण करून दर्शनासाठीं शिवाला आळवूं लागला. ' महादेवा दर्शन द्या. '

महादेव कैलासावर समाधिस्त होते. कैलासपर्वत हालूं लागला. पार्वती, नंदी घाबरली. पार्वतीनें नंदीला पृथ्वीवर चौकशीसाठीं पाठविलें. नंदी त्वरेनें पृथ्वीवर उतरला. तोंच त्याच्या शोधांत असलेला, कालहस्ती क्षेत्रपाल भैरवनाथ त्याला भेटला. त्यानें नंदीला सर्व कथन केलें. दोघेही जयपालाची महादेवावरील श्रद्धा पाहून आनंदित झाले. नंदीनें हें वर्तमान मातेला सांगितलें. पार्वती त्वरेनें शंकराकडे गेली. " हे त्रैलोक्यनाथ ! आपल्या दर्शनासाठीं एक भोळा भक्त प्राणत्यागाच्या बेतांत आहे. उठा, त्याला दर्शनानें पावन करा. "

महादेव हें ऐकतांच पृथ्वीवर आले. जयपालासमोर प्रकट होऊन बोलले, " वत्सा, जयपाला, हा पहा मी तुझ्यासमोर उभा आहे. हट्ट सोड व पाण्याबाहेर जाऊन सुखानें घरीं जा. मी तुझी इच्छा पूर्ण केली आहे, ऊठ. "

" हे शंभुदेवा ! आपल्या दर्शनानें मी धन्य झालों. पण मला आपलें दर्शन घडलें याचा पुरावा त्या ब्राह्मणांना देतां

आला पाहिजे. त्यावांचून मी येथून वर जाणार नाहीं." महादेव विचारांत पडले पण त्याच्या भोळ्या भक्तीनें प्रसन्न झाले.

"समजलों. जयपाल, या माझ्या रत्नजडित सुवर्णपादुका घे. या पादुकांवर माझी पिंडिका आहे. या नीट जपून ठेव. तुझें कल्याण असो." शिव जयपालाला आशीर्वाद देऊन गुप्त झाले. त्या पादुका घेऊन जयपाल वर आला. ब्राह्मणांचीं तोंडें सुकून गेलीं होतीं. जयपालावर दृष्टि पडतांच त्यांनीं सुटकेचा श्वास सोडला. जयपाल अति आनंदित होत्साता त्यांच्याकडेच येत होता. "गुरुदेव, शिवदर्शन झालें. या पहा प्रत्यक्ष भगवान शिवांनीं दिलेल्या पादुका."

त्या पादुकांवर दृष्टि पडतांच त्या ब्राह्मणांची दृष्टि गेली, वाचा बंद झाली. जयपालाला पादुकांत प्रत्यक्ष भगवान श्रीकालहस्तीच दिसत होतें. त्याचें ब्राह्मणाकडे लक्ष नव्हतें. ब्राह्मण जयपालाच्या पायांवर लोळण घेऊन, आपली दृष्टि व वाचा गेल्याचें त्याला खुणेनें सांगत होतें. त्याचे पाय धरून रडत होते. जयपालाला वाईट वाटलें. त्यानें या पादुकांत दिसणाऱ्या शिवाला म्हटलें, "हे देवा, या ब्राह्मणांमुळेंच मला तुझें दर्शन घडलें. हे माझे गुरु आहेत. यांवर कृपा कर."

तोंच समोरून शिवसेवक भैरवनाथ साधुरूपानें घाटावरून म्हणाला, "जयपाल, या ब्राह्मणांनीं तुझी थट्टा केली. यांची शिवभक्ति हें ढोंग होतें. तूंच खरा शिवभक्त म्हणून, देवांनीं तुला दर्शन देऊन वर आपल्या पादुका दिल्या. महादेवांनीच या ब्राह्मणांना ही शिक्षा केली आहे."

"साधुमहाराज, पण हे माझे गुरु आहेत. यांच्या वचनावर विश्वास ठेवल्यानेंच मला देव भेटले. माझ्यासाठीं या गुरूंना कां

शिक्षा ? दया करा."

" जयपाल. तुझी इच्छाच असेल तर या पादुकांचा त्यांच्या मस्तकांवर स्पर्श कर."

साधूच्या उपदेशाप्रमाणें जयपालानें त्या पादुका, गुरु मानलेल्या ब्राह्मणांच्या मस्तकीं स्पर्श केला. त्यांची दृष्टि व वाचा त्यांना पुन्हा प्राप्त झाली.

त्यांनीं जयपाल व साधु यांची खोटें बोलल्याबद्दल क्षमा मागितली. पुन्हा असत्याचा आश्रय करणार नाहीं अशी प्रतिज्ञा केली. जयपालच आपला गुरु अशी ते कबुली देऊन, जयपालाकडे कृपादृष्टीची याचना करूं लागले.

"ब्राह्मण हो, जयपालामुळें तुम्हीं महादेवाच्या अवकृपेपासून मुक्त झालांत. यापुढें नीतिधर्मानें वागा म्हणजे झालें. पण लक्षांत ठेवा, या शिवक्षेत्रांत जो दुष्टवासनेनें वास करील त्याला प्रत्यक्ष महादेव शिक्षा करतील. यासाठीं सर्वांनीं सत्य व श्रद्धाधर्मानें वागून, आपलें कल्याण करून घेतलें पाहिजे."

ब्राह्मण साधूला शरण गेले. जयपाल व साधूचा निरोप घेऊन ते पसार झाले.

" जयपाल, तुझ्यासाठीं या नदींत महादेवांना प्रकट व्हावें लागलें. तुला या सुवर्णपादुका मिळाल्या. महादेवांच्या स्पर्शानें पावन झालेल्या या नदींला लोक ' सुवर्णनदी ' म्हणतील. तुझी ही कथा, खरी श्रद्धा अमर होईल. सुखी रहा." साधु गुप्त झाला. जयपाल समजला, हा साधु म्हणजे क्षेत्रपाल भैरवनाथ होता. जयपालानें पादुका छातीशीं धरून, त्या साधूला हात जोडले. पुढें जयपाल शिवभक्तीनें त्या पादुकांसह कैलासीं गेला. अद्यापिही जयपाल कथा श्रद्धेनें सांगतात.

* * *

कथा नववी

# सौ भा ग्य दा यि नी भ्र म रा रं भा

दक्षिणेंत 'श्रीशैल्यमल्लिकार्जुन' हें द्वादश ज्योतिर्लिंगस्थान श्रीशैल्य पर्वताच्या अत्युच्चभागीं असून, तें दक्षिणेंतील 'कैलासभुवन' म्हणून प्रसिद्ध आहे. हें अतिपुरातन क्षेत्रस्थान येथील पार्वतीस 'भ्रमरारंभा' म्हणतात. अठरा शक्तिदेवीपैकीं ही एक देवी म्हणून प्रख्यात आहे. या देवीपार्वतीच्या आशीर्वादानें सौभाग्यवृद्धि होते अशी स्त्रियांची भावना असल्यानें या भ्रसरारंभा पार्वतीच्या कृपाप्रसादासाठीं या क्षेत्रांत, पुरुषापेक्षां स्त्रियाच बहुसंख्येनें दर्शनार्थ नित्य गर्दी करीत असतात.

नंदीश्वरानें कैलासाची जीं ३ शिखरें पृथ्वीवर स्थापन केलीं ती श्रीशैल्य, कलाहस्ती व वेदाचल या नांवानें प्रख्यात असून श्रीशैल्य मल्लिकार्जुन तें हेंच आहे. पर्वतपायथ्याशीं 'पातळगंगा' नदी वाहत असून हिचें पात्रांत स्त्रियां स्नान करून वर भ्रमरारंभादर्शनार्थ जातात. स्त्रियांची संकटनाशिनीदेवी म्हणून दक्षिण भारतांत ती प्रसिद्ध आहे.

शिक्षा ? दया करा."

"जयपाल. तुझी इच्छाच असेल तर या पादुकांचा त्यांच्या मस्तकांवर स्पर्श कर."

साधूच्या उपदेशाप्रमाणें जयपालानें त्या पादुका, गुरु मानलेल्या ब्राह्मणांच्या मस्तकीं स्पर्श केला. त्यांची दृष्टि व वाचा त्यांना पुन्हा प्राप्त झाली.

त्यांनीं जयपाल व साधु यांची खोटें बोलल्याबद्दल क्षमा मागितली. पुन्हा असत्याचा आश्रय करणार नाहीं अशी प्रतिज्ञा केली. जयपालच आपला गुरु अशी ते कबुली देऊन, जयपालाकडे कृपादृष्टीची याचना करूं लागले.

"ब्राह्मण हो, जयपालामुळें तुम्हीं महादेवाच्या अवकृपेपासून मुक्त झालांत. यापुढें नीतिधर्मानें वागा म्हणजे झालें. पण लक्षांत ठेवा, या शिवक्षेत्रांत जो दुष्टवासनेनें वास करील त्याला प्रत्यक्ष महादेव शिक्षा करतील. यासाठीं सर्वांनीं सत्य व श्रद्धाधर्मानें वागून, आपलें कल्याण करून घेतलें पाहिजे."

ब्राह्मण साधूला शरण गेले. जयपाल व साधूचा निरोप घेऊन ते पसार झाले.

"जयपाल, तुझ्यासाठीं या नदींत महादेवांना प्रकट व्हावें लागलें. तुला या सुवर्णपादुका मिळाल्या. महादेवांच्या स्पर्शानें पावन झालेल्या या नदींला लोक 'सुवर्णनदी' म्हणतील. तुझी ही कथा, खरी श्रद्धा अमर होईल. सुखी रहा." साधु गुप्त झाला. जयपाल समजला, हा साधु म्हणजे क्षेत्रपाल भैरवनाथ होता. जयपालानें पादुका छातीशीं धरून, त्या साधूला हात जोडले. पुढें जयपाल शिवभक्तीनें त्या पादुकांसह कैलासीं गेला. अद्यापिही जयपाल कथा श्रद्धेनें सांगतात. * * *

कथा नववी

# सौभाग्यदायिनी भ्रमरारंभा

दक्षिणेंत 'श्रीशैल्यमल्लिकार्जुन' हें द्वादश ज्योतिर्लिगस्थान श्रीशैल्य पर्वताच्या अत्युच्चभागीं असून, तें दक्षिणेंतील 'कैलासभुवन' म्हणून प्रसिद्ध आहे. हें अतिपुरातन क्षेत्रस्थान येथील पार्वतीस 'भ्रमरारंभा' म्हणतात. अठरा शक्तिदेवीपैकीं ही एक देवी म्हणून प्रख्यात आहे. या देवीपार्वतीच्या आशीर्वादानें सौभाग्यवृद्धि होते अशी स्त्रियांची भावना असल्यानें या भ्रसरारंभा पार्वतीच्या कृपाप्रसादासाठीं या क्षेत्रांत, पुरुषापेक्षां स्त्रियाच बहुसंख्येनें दर्शनार्थ नित्य गर्दी करीत असतात.

नंदीश्वरानें कैलासाची जीं ३ शिखरें पृथ्वीवर स्थापन केलीं ती श्रौशैल्य, कलाहस्ती व वेदाचल या नांवानें प्रख्यात असून श्रीशैल्य मल्लिकार्जुन तें हेंच आहे. पर्वतपायथ्याशीं 'पातळगंगा' नदी वाहत असून हिचें पात्रांत स्त्रियां स्नान करून वर म्रमरारंभादर्शनार्थ जातात. स्त्रियांची संकटनाशिनीदेवी म्हणून दक्षिण भारतांत ती प्रसिद्ध आहे.

फार पूर्वी पातळगंगा किनारीं त्या प्रदेशाच्या राजाचा राजवाडा होता. हा राजा या भ्रमरारंभादेवीचा परम भक्त असून, नित्य देवीदर्शनास शिखरावर जात असे. पूजाअर्चा करण्यासाठीं त्यानें एका विद्वान व धर्मपरायण ब्राह्मणाची नियुक्ति केली होती. शिवपार्वतीचे भक्त दर्शनासाठीं येतांना यथाशक्ति द्रव्य, रत्नें, सुवर्णालंकार व उंचीं वस्त्रें देवाला अर्पण करींत. हा सर्व व्यवहार राजानें त्या ब्राह्मणाचेंच स्वाधीन ठेविला होता. प्रतिवर्षी राजा आपल्या गरीब प्रजेला व विद्वान ब्राह्मणांना त्या द्रव्याचें व वस्त्राचें दान करीत असे. ही परंपरा राजवंशांत पुष्कळ पिढ्या चालू होती.

भ्रमरारंभादेवीची ख्याति फारच वाढू लागून, देवीला अर्पण केलेल्या विविध वस्त्रालंकारांच्या राशी देवालयांत लागूं लागल्या. त्या संपत्तीचा मोह मूळ पुजाऱ्याच्या वंशजाला झाला आणि परिणामीं त्याला मृत्युदंड मिळून, त्या राजवंशांतील एका राजकन्येला विवाह कालीं येणारी वैधव्यदशा टळून, राजकन्येची भ्रमरारंभाकृपेनें सौभाग्यवृद्धि होऊन, ती सुखी झाली. राजघराणेंही या संकटांतून बचावले. त्याची कथा सांगतात ती अशी:—

मूळ पुजाऱ्याचा वंशज वामनय्या म्हणून देवालयाचा मुख्य पुजारी होता. कामाच्या व्यापामुळें निरनिराळे पुष्कळ ब्राह्मण नेमलेले होते मुख्य जबाबदारी वामनय्यावर असे. वामनय्याला विशेष कांहींच काम नसे. त्यामुळें त्यांचा वेळ ब्राह्मणाला अयोग्य अशाच दुसऱ्या कामांत खर्च होई. राजपुरोहित असल्यानें इतर लोक स्वस्थ राहत पण विरोध दर्शवीत नसत इतकेंच.

वामनय्या देवीला अर्पण केलेल्या वस्त्रालंकाराचा अपहार करी, मद्यमांस खाई, कुलटा स्त्रियामागें फिरे. हळुहळु तो कुणाची भीडमर्यादा न पाळतां, स्वैराचारी बनून, नगरांतील अन्य धनिक वर्गांप्रमाणें उघडपणें वेश्या पदरीं बाळगून, देवीची संपत्ति त्यांच्या निर्वाहासाठीं खर्चूं लागला. राजा शिखरावर देवीदर्शनास येई तेव्हांच फक्त तो मंदिरांत हजर असे. राजा देवदर्शन करून खालीं उतरतांच, वामनय्याही आपल्या वेश्यांच्या घरीं गमन करी. कितीकवर्षें राजाला या गोष्टीचा पत्ताच नव्हता. वामनय्याचा नित्यक्रम मजेंत चालू होता.

राजाला एकच कन्या संतति होती. या राजकन्येचें नांव मालिनी होतें. मालिनीच्या जन्मकालीं राजज्योतिषानीं तिचें असें भविष्य वर्तविलें होतें कीं, मालिनी वयाचे १६ वे वर्षींच विवाहोत्तर, लग्नमंडपांतच गतधवा होईल. हें संकट टळण्यास एकच उपाय दिसतो तो म्हणजे, मालिनीला मातापित्यापासून दूर ठेऊन तिजकडून भ्रमरारंभेची आराधना करावयाची. पार्वतीमातेच्या सौभाग्यदानाचा आशीर्वाद मिळवूनच मग विवाह निश्चत करावा. तोंपर्यंत तपस्विनीसमान मालिनीनें आपलें जीवन केवळ देवीउपासनेंतच घालविणें योग्य दिसतें. शिवाय लग्नसमयीं ज्या राजकुमाराला मृत्युयोग नसेल अशाच राजकुमाराचा शोध करून त्याची वर म्हणून निवड करून नंतर विवाह उरकावा.

राजाला ही गोष्ट मान्य झाली. त्यानें राजगुरूस विनंति करून त्यांचे आश्रमांत मालिनीला ठेवून, तिजकडून भ्रमरारंभेची उपासना व शिक्षण करवून, संभाव्य आपत्ति टाळण्यास साह्य करण्याची मागणी केली. राजगुरूंनीं लगेच मान्यता देऊन

मालिनीचा सांभाळ, शिक्षण व पार्वतीसेवा करण्याची जबाबदारी पत्करली. राजानें दासीसह मालिनीची, राजगुरुगृहीं पाठवणी केली.

मालिनी वर्षाची झाली तेव्हां तिला राजगुरूंनीं संभाव्य संकटाची व त्यांतून मुक्त होण्यासाठींच मातापित्यापासून दूर ठेवल्याची कल्पना दिली. मालिनी हें ऐकून भ्रमरारंभेची उपासना मन लावून करूं लागली. गुरुगृहीं ती गुरु हाच पिता व गुरुपत्नि हीच माता मानून राहिली. पार्वतीमातेच्या सेवेंत तिनें कधीं अंतर केलें नाहीं. द्वादशवर्षीय मालिनी सुखरूप व तेज:पुंज दिसूं लागली. तिच्या सौंदर्य व तेजानें गुरुगृहीं आगळेंच चैतन्य व मांगल्य निर्माण झालें. गुरुगृहीं पाताळगंगाकिनारीं, भ्रमरारंभा-मूर्ति स्थापन करवून मालिनी आपलें तपस्विनी जीवन जगत होती. तिच्या सेवेनें पार्वतीमातेला तिची दया येऊन तिचे मनोरथ पूर्ण करण्याचें देवीनें मनोमन ठरविलें. मालिनी आपल्या उपासनेनें देवीला प्रिय झाली होती.

त्याच राज्याशेजारीं दुसरें राज्य होतें. त्या राजालाही एकच राजपुत्र होता व त्याच्या जन्मकालींही, राजज्योतिषांनीं त्याचें भविष्य असें वर्तविलें होतें कीं, विवाह होतांच राजपुत्राचा मृत्युयोग संभवतो परंतु, जर जन्मापासून तपस्वी जीवन घालवून, शक्तिदेवीच्या सेवेचें पुण्य पदरीं पाडलेली एकादी राजकन्या वधु म्हणून, राजपुत्राला उपलब्ध होईल तर, अशा विवाहानें मृत्यु-संकटांतून राजपुत्र बचावेल आणि सुखानें राज्य करील. यासाठीं राजपुत्रानेंही आतांपासूनच मातापित्यास सोडून एकाद्या तीर्थस्थानीं आपल्या कुलदेवाची उपासना करून, पुण्यसंचय करणें

हा यावर उपाय दिसतो. विवाहपूर्व ऐश्वर्यउपभोग आणि जन्मगृह यापासून दूर राहून देवसेवा करावी.

मालिनीच्या पित्याप्रमाणेंच हा राजाही देवभक्त व धर्मपरायण होता. राजपुत्राचें नांव मधुकर होतें. राजानें मधुकरालाही आपल्या गुरुगृहीं ठेवून, सर्व व्यवस्था लावून दिली. मधुकराचा कुलदेव आदित्यनारायण म्हणजे सूर्यदेव असल्यानें, तो सूर्यदेवाची आराधना, आपल्या गुरूंच्या देखरेखीखालीं करी.

वामनय्या संपत्ति व सत्ता यांच्या जोरावर कुणाची पर्वा न करतां, आपलीं व्यसनें निरंकुशपणें पुरवून घेत होता. प्रसंगीं आपलीं व्यसनें भागविण्यासाठीं तो देवीचे अलंकारही चोरून नेऊं लागला. दुर्जनांचे संगतीनें तो जुगारही खेळत असे. यामुळें तो नेहमीं पैशांच्या अडचणींत असे. देवभांडार सदैव भरलेलें व राजा वर्षांतून एकच दिवस तें द्रव्य गरीब प्रजेला वाटून देत असल्यानें, वामनय्या निर्धास्तपणें खुद्द देवीचे अलंकार आणि वस्त्रें चोरूं लागला होता. इतर ब्राह्मण 'करील तो भरील' या न्यायानें गप्प होते. स्वतः राजा आपल्या कन्येच्या चिंतेंत असल्यानें वामनय्याच्या बाबतींत अज्ञच होता.

राजकन्या मालिनीला १६ वें वर्ष लागलें. ती रूपसंपन्न व तेजस्वी दिसत असे. आपली आराधना पूर्ण झाल्यामुळें तिनें भ्रमरारंभेला रत्नजडित सुवर्ण समई मोठ्या श्रद्धेनें अर्पण केली यावेळीं राजानें सर्व नगराला भोजन घातलें. खूप दानधर्म केला. सर्वांचे आशीर्वाद राजकन्येला मिळाले. या नंतर राजगुरूंच्या सल्ल्यानें राजा वर संशोधनाला लागला.

मालिनीच्या व्रतसांगतेमुळें त्या दिवसभर भ्रमरारंभामातेच्या

मंदिरांतच वामनय्याला रहावें लागलें. सूर्योदयापासून मध्यरात्री-पर्यंत समारंभ चालू होता. त्यामुळें राजकुटुंब, राजगुरु व इतर दरबारी तसेंच क्षेत्रस्थ मंडळी खालीं निघून गेल्यावर वामनय्या मोकळा झाला. आपल्या मर्जींतील एका वेश्येला त्यानें मंदिरांतच थांबण्यास सूचना केली. अवघ्या मंदिरांत तीं उभयतां उरलीं. गर्भागाराच्या मागील मोकळ्या जागेंत, तो स्त्रीलंपट वामनय्या त्या वेश्येसह निजला.

मालिनीनें अर्पण केलेली रत्नजडित सुवर्ण समई कशी आहे ती पाहण्यासाठीं, प्रत्यक्ष पार्वतीमाता श्रीशंकरासह, मध्यरात्रीं-नंतर त्या मंदिरांत आली. ती कलाकौशल्यपूर्ण सुंदर समई पाहून, पार्वतीदेवी खूष झाली. ती परत जाऊं लागणार इत-क्यांत वामनय्या व वेश्या यांचा संवाद मातेच्या कानीं आला. भ्रमरारंभा मनोमन क्रोधित झाली. तिनें तेथेंच वामनय्याला शाप दिला. 'मालिनीचा नियोजित पति मधुकर याचा मृत्यु, तुला त्यांच्या विवाहकालीं मिळेल व त्याचा सुखी संसार होईल. तुझ्या या कृत्याला हीच योग्य शिक्षा आहे.' माता शाप देऊन तडक निघून गेली, परंतु वामनय्याला त्याचा पत्ताच नव्हता. तो वेश्येशीं बोलण्यांत गुंग झाला होता.

प्रधान व राजगुरु यांनीं पुष्कळ शोध करून, मालिनीसाठीं योग्य वर म्हणून मधुकराची निवड केली. उभय राजांना हा विवाह पसंत झाला व लौकरच विवाहतिथी निश्चित झाली, दोन्हीकडे विवाहतयारी सुरू झाली.

सूर्योपासनेनें राजपुत्र मधुकर आरोग्यसंपन्न व तेजस्वी दिसत होता. रूप गुण, पराक्रम व औदार्य यांत मालिनी मधुकर

परस्परांना योग्य होती, उभयतांच्या विवाहाचें स्थान 'भ्रमरारंभा मंदिर' ठरलें होतें. प्रत्यक्ष विवाहकालीं मधुकरामागें सूर्यदेव व मालिनीमागें पार्वतीमाता, अदृश्यरूपांत उभी होतो. राजगुरूंनीं मंगलाष्टकें आटोपून मालिनीला मधुकराचे गळचात माला घालण्यास खुणाविलें. मालिनीनें माला पतिकंठीं घातली. मधुकरानेंही मालिनीच्या कंठांत माला घातली आणि त्याच वेळीं, मुख्यघंटेखालीं उभा असलेल्या वामनय्यांच्या डोक्यावर, ती घंटा एकदमच कोसळून तो घंटेखालीं चेंगरून मृत्यु पावला. उभयराजे या शुभवेळीं झालेल्या त्या वामनय्याच्या अकल्पित मृत्यूनें घाबरले. पण त्याचवेळीं मृत्युदेवतेनें तेथें आकाशवाणीनें वामनय्याला मातेनें दिलेली शापवाणी उच्चारली व आपली सर्वांस ओळख देऊन मातेच्या व सूर्यदेवाच्या कृपाप्रसादानें मधुकर मालती यांचा विवाह झाल्याचें सांगितलें. सर्वांना हायसें झालें. पुढें पुष्कळ दिवस हा लग्नसोहळा दोन्ही राज्यांत चालू होता.

मधुकर–मालतीनें पुढें पुष्कळ वर्षे सुखानें संसार केला. मधुकर उभय राज्यांचा धनी झाला. मालतीनें भ्रमरारंभेची आणखी उपासना करून वामनय्याला मुक्ति मिळवून दिली. वामनय्यानंतर राजगुरूंकडे श्रीशैल्य मल्लिकार्जुन देबालयाचें पुजारीपण आलें. तेंच त्यांच्या वंशांत अद्यापि चालू आहे. मात्र वरील घटनेमुळें श्रीशैल्यमल्लिकार्जुन क्षेत्राच्या परिसरांत वेश्याव्यवसाय नष्ट झाला तो मात्र कायमचाच. 'सौभाग्यदायिनी माता' म्हणून भ्रमरारंभा स्त्रियांना पूज्य वाटते.

* * *

कथा दहावी.

# कन्या कुमारी

कन्याकुमारी हें भारताचें दक्षिण टोंक व प्रख्यात तीर्थक्षेत्र आहे. येथें 'देवी कन्याकुमारी' मंदिर आहे. मंदिर, मंडप व मंदिराचा विस्तार फारच विशाल आहे. मंदिराभोंवतीं तांबड्या व शुभ्रवर्णाचे आडवे पट्टे आहेत. मागील बाजूस घाटावर स्नानदान व इतर धर्मकृत्यें करतात. बंगालचा उपसागर, हिन्दीमहासागर व अरबीसमुद्र यांचा मिलाफ याच क्षेत्रांत झाला असून येथील सूर्योदय व सूर्यास्त अत्यंत प्रेक्षणीय आहे. जवळच बंगालच्या उपसागरांत प्रसिद्ध 'विवेकानंद शिला' उभी आहे. कन्याकुमारीचा परिसर हा विपुल प्राकृतिक सौंदर्यानें परिपूर्ण व समृद्ध आहे.

कन्याकुमारीची मूर्ति सुमारें ४ फूट उंचीची व उभी आहे. काळ्या शिलेची ही पूर्वाभिमुख मूर्ति असून हातांत जपमाला आहे. शिवध्यानमग्न, अत्यंत तेजस्वी रत्नें नासिका व मुखभागीं आहेत. विविध रत्नजडित सुवर्णालंकार विशिष्ठ उत्सवप्रसंगीं

वापरले जातात आणि त्या मंगल व तेज:पुंज ध्यानदर्शनाला यात्रेकरू येथें गर्दी करतात.

'कुमारी कन्येवांचून अन्य कुणाही हस्तें तुला मृत्यु नाहीं' या शिवानें दिलेल्या वरामुळें बाणासूर मातला व याच बाणासुराच्या नाशासाठीं, भगवान विष्णूंनीं सांगितल्याप्रमाणें, देवांनीं यज्ञ करून 'पराशक्ति प्रकृति' ला प्रसन्न करून घेतलें. त्यावेळीं यज्ञकुंडांतील अग्नींतून ही हातीं जपमाला व शिवध्यानमग्न अशी 'कन्याकुमारी' प्रकटली. यथासमय तिनें बाणासुराचा नाश करून देवांना निर्भय केलें. बाणासुराला मृत्युदंड देण्यापूर्वी शिवदेवपति लाभावे म्हणून तिची तपश्चर्या चालू होती; परंतु देवकार्यासाठीं नारदमुनींनीं, शुचिंद्रमक्षेत्रीं विवाहासाठीं येत असलेंल्या महादेवांना अडविलें. मुहूर्त टळल्यानें महादेव माघारीं कैलासावर गेले व देवी तशीच ध्यान करीत उभी राहिली. यापुढें शिवप्राप्तीसाठीं हें खडतर तप करणाऱ्या कन्याकुमारीशीं भगवान शिव 'कल्पांत' समयीं विवाहबद्ध होणार आहेत असें भाविक भक्त सांगतात.

मंदिरांत स्वच्छता, शांतता व पवित्र वातावरण कटाक्षानें पाळलें जातें. पुरुषभक्तांना केवळ पंचा नेसूनच दर्शनासाठीं आंत प्रवेश मिळतो. शाश्वत व सात्विक पतिप्रेम लाभावें म्हणून स्त्रिया कन्याकुमारीची आराधना करतात.

कन्याकुमारी देवीच्या सेवेनें दृष्टांत होऊन सात पिढ्यापर्यंत छळ करणाऱ्या एका ब्रह्मसंबंधाला शांत करून, राघवाचार्य ब्राह्मण कसा सुखी व निर्भय झाला त्याची कथा खालीलप्रमाणें प्रसिद्ध आहे :—

पूर्वी सोमदत्त नामें एक ब्राह्मण कुमार विद्याध्ययनासाठीं कन्याकुमारीहून काशीक्षेत्रीं जाऊन राहिला. तेथें गुरुगृहीं १४ विद्या ६४ कला पारंगत होऊन तो १२ वर्षांनीं आपल्या घरीं येण्यास निघाला. वाटेंत मुक्काम करीत करीत तो शुचिंद्रमक्षेत्रीं राघवाचार्याचा पूर्वज अंबादास याचें घरीं आला.

सोमदत्त ज्या ठिकाणीं मुक्काम करी त्या ठिकाणीं ग्रामस्थांच्या संमतीनें हरिकथा, पुराण, प्रवचनें करी, शास्त्रार्थ सांगे. त्यामुळें त्याला भरपूर दक्षिणा मिळे. अशाप्रकारें त्याच्याजवळ पुष्कळ सुवर्णमोहरांचा सांठा झालेला होता व हा सांठा एका तांब्याच्या घागरींत संभाळीत, ती घागर खांद्यावर घेऊन तो पुढील मुक्काम गांठी. अशाच तऱ्हेनें तो अंबादासचें घरीं मुक्कामाला आला होता.

अंबादास हा दरिद्री व यथातथाच विद्या झालेला एक लोभी ब्राह्मण होता. पूजा सांगणें व जेवणाला 'ब्राह्मण' जाणें यापरती त्याची विद्या नव्हती. परंतु गांवांतील इतर ब्राह्मणांच्या आधारानें त्याचा निर्वाह चाले. मात्र जरी तो विद्वान नव्हता तरी धनलोभी होता. अन्य ब्राह्मणांप्रमाणें त्याला दक्षिणा कधींच मिळत नसल्यानें तो सदैव गांवच्या विद्वान ब्राह्मणांचा द्वेष करी. अंबादासाची घरची विपन्नावस्था जाणून ब्राह्मण त्याच्या या द्वेषी स्वभावाकडे दुर्लक्ष करीत.

सोमदत्त सायंकाळीं सूर्यास्तानंतर अंबादासाचें घरीं आला. कारण तेंच घर त्या बाजूला प्रथम होतें. येतांच त्यानें आपला हेतु सांगून रात्रीपुरता आश्रय देण्याची अंबादासाला विनंति केली आणि आपली द्रव्याची घागर संभाळण्यासाठीं अंबादासाचे

स्वाधीन केली. अंबादासानें ती घागर नेऊन घरांत सुरक्षित जागीं ठेवली व सोमदत्त आपल्या सायंसंध्येच्या कामांत गुंतला.

घागर भरून सुवर्णमुद्रा अंबादासानें कधींच पाहिल्या नव्हत्या. त्यामुळें त्याच्या मनांत लगेच स्वार्थी विचार थैमान घालूं लागले. या सर्व मोहरा प्राप्त करायच्या असतील तर सोमदत्ताला ठार करणें आवश्यक होतें व तोच बेत अंबादासानें मनोमन पक्का केला व रात्रीं हें कृत्य पार पाडायचें त्यानें नक्की केलें. बिचारा सोमदत्त हें कांहींच माहित नसल्यानें निर्धास्त होता. रात्रीं भोजन झाल्यावर, अंबादासानें त्याच्या निद्रेची उत्तम व्यवस्था करून, त्यास निद्रिस्त केलें.

मध्यरात्रीं अंबादासानें आपल्या मुलाच्या मदतीनें, पत्नीचा विरोध असतांही सोमदत्तास लांकूड फोडण्याची कुऱ्हाड डोक्यांत घालून ठार केलें. घरामागील आंब्याच्या झाडाखालीं त्याचें प्रेत पुरलें. घागरींतील कांहीं द्रव्य काढून घेऊन, ती घागर नीट बंदोबस्तानें देवघरांत पुरून टाकली. त्याची बायको घरची अब्रु जाऊं नये म्हणून गप्प राहिली पण झाला प्रकार अनुचित असून त्याचें शासन भोगावें लागेल हें मात्र तिनें पतिपुत्रांना बजावलें.

" दारिद्र्यामुळें देशांतराला जाऊन नशीब हात देतें तर पाहावें म्हणून मी देशांतराला जाणार आहे" असें अंबादास सर्वांना सांगू लागला व एके दिवशीं, आपल्या पत्नि पुत्राचा सांभाळ आपल्यामागें करावा अशी गांवच्या कांहीं ब्राह्मणांना विनंति करून, तो खरोखरच दूरच्या एका गांवीं निघून गेला. जवळचें द्रव्य खर्चून त्यानें त्या गांवीं एक दुकान थाटलें. दुकानातून त्याला थोडीफार उदरनिर्वाहाची प्राप्ति होऊं

लागली. सुमारें सहा महिन्यांनीं अंबादास गांवीं येऊन आपणास व्यापारांत नशीवानें हात दिल्याचें लोकांस भासवूं लागला.

आतां त्याचे कपडे चांगले असत. चांगलें अन्न तो सेवन करी आणि एकाद्या धनिकासमान आपली राहणी ठेवी. अंबादासाला चांगले दिवस आल्याचें पाहून गांवच्या लोकांनाहि समाधान झालें व ते त्याला मानानें वागवूं लागले. तो ८-१० दिवस घरीं राही व पुन्हा व्यापारासाठीं त्या गांवीं जाई.

लौकरच अंबादासाचा व्यापार उत्तम चालूं लागला व तो त्या गांवीं प्रतिष्ठित व्यापारी म्हणून नांवाजला. त्यानें आपल्या गांवीं नवा वाडा बांधला. शेतजमीन घेतली. गायगुरें ठेवलीं व आरामांत राहूं लागला. व्यापाराच्या व्यवस्थेसाठीं त्यानें दुकानांत मुनीम व नौकर ठेवले होते. आपल्या गांवींहि त्यानें एक छानपैकीं दुकान थाटलें.

थोडयाच अवधींत अंबादासाच्या मुलाचें थाटामाटांत लग्न झालें. यावेळपर्यंत त्यानें केलेल्या पापकर्माची स्मृति त्याला कधींच झाली नव्हती. पण मुलाच्या विवाहानंतर घरामागील आंब्याकडे जाण्यास सून फार भिऊं लागलीं. तिला तेथें कोणी-तरी ब्रह्मचारी रागीट मुद्रेनें बसलेला दिसत असे. अंबादास, त्याची पत्नि व मुलगा कशीतरी वेळ मारीत नेत पण मनांतून त्या तिघांनाहि फार भय वाटूं लागलें होतें. सुनेला कांहींतरी भास होतो अशी ते तिची समजूत घालीत पण सून मात्र फारच भयभीत झालेली होती. तिनें घरामागें आंब्याच्या झाडाकडे जाणेंच बंद केलें. तिघांनाहि सामाधन वाटलें.

दुसऱ्या वर्षी सून गरोदर राहिली. सून गरोदर झाल्यानंतर

लगेच अंबादासाला स्वप्नांत तो सोमदत्त प्रथमच दिसला व त्यानें 'तुझा वंश मी वाढू देणार नाहीं' अशी निश्चयवाणी क्रोधमुद्रेनें अंबापासाला ऐकवली. अंबादास मनांत भ्याला व सुनेला फारच जपण्याविषयीं पत्नि व मुलगा यांना त्यानें सूचना दिली. मुलालाहि बापाप्रमाणेंच स्वप्नांत सोमदत्त दिसू लागला होता. अंबादासापेक्षां मुलगाच यामुळें फार भ्यालेला होता. सुनेला कांहींच कल्पना नव्हती. सासू मूग मिळून स्वस्थ होती पण सुनेच्या प्रकृतीवर लक्ष होतें.

थाटामाटानें सुनेचें डोहाळजेवण झालें. पण पुढें सुनेला ती एकटी असतांना, पाणी आणण्यास जातांना, रात्रीं झोपल्यानंतर एक सर्प आपणाला चावण्यास येत आहे असा भास होऊं लागला. एक दोन वेळां तर प्रत्यक्ष सर्पच तिला दिसला व ती त्या भयानेंच आजारी पडली. सोमदत्त हा सूड उगवीत आहे याची बिचाऱ्या सुनेशिवाय सर्वांना जाणीव होती. सून यथाकाळीं प्रसूत झाली. उत्तम सुदृढ पुत्र झाला. नामकरण झालें व त्याच दिवशीं रात्रीं पाळण्यांत झोपविलेला मुलगा, सकाळीं मृतावस्थेंत आढळला या पुत्रनाशानें सुनेला फार दु:ख झालें पण अन्य तिघांना याचें मर्म माहीत असल्यानें तीं काय करावें अशा संकटांत सांपडलीं होती. अशा प्रकारें सुनेला ८ अपत्यें झालीं व मृतहि झालीं शेवटीं ९ वें मूल जगलें. पण त्याच वर्षी अंबादासाची पत्नि थोड्याशा आजारानें कालावश झाली.

पत्नीच्या मृत्यूनें व सोमदत्ताच्या भयानें अंबादास अगदीं खंगला होता. मुलगाही पश्चात्तापानें पोळत होता. पण वस्तुस्थिति सुनेला सांगणें त्यांना जड जात होतें. सून मात्र देवधर्म,

लागली. सुमारें सहा महिन्यांनीं अंबादास गांवीं येऊन आपणास व्यापारांत नशीबानें हात दिल्याचें लोकांस भासवूं लागला.

आतां त्याचे कपडे चांगले असत. चांगलें अन्न तो सेवन करी आणि एकाद्या धनिकासमान आपली राहणी ठेवी. अंबादासाला चांगले दिवस आल्याचें पाहून गांवच्या लोकांनाहि समाधान झालें व ते त्याला मानानें वागवूं लागले. तो ८-१० दिवस घरीं राही व पुन्हा व्यापारासाठीं त्या गांवीं जाई.

लौकरच अंबादासाचा व्यापार उत्तम चालूं लागला व तो त्या गांवीं प्रतिष्ठित व्यापारी म्हणून नांवाजला. त्यानें आपल्या गांवीं नवा वाडा बांधला. शेतजमीन घेतली. गायगुरें ठेवलीं व आरामांत राहूं लागला. व्यापाराच्या व्यवस्थेसाठीं त्यानें दुकानांत मुनीम व नौकर ठेवले होते. आपल्या गांवींहि त्यानें एक छानपैकीं दुकान थाटलें.

थोड्याच अवधींत अंबादासाच्या मुलाचें थाटामाटांत लग्न झालें. यावेळपर्यंत त्यानें केलेल्या पापकर्माची स्मृति त्याला कधींच झाली नव्हती. पण मुलाच्या विवाहानंतर घरामागील आंब्याकडे जाण्यास सून फार भिऊं लागली. तिला तेथें कोणी-तरी ब्रह्मचारी रागीट मुद्रेनें बसलेला दिसत असे. अंबादास, त्याची पत्नि व मुलगा कशीतरी वेळ मारीत नेत पण मनांतून त्या तिघांनाहि फार भय वाटूं लागलें होतें. सुनेला कांहींतरी भास होतो अशी ते तिची समजूत घालीत पण सून मात्र फारच भयभीत झालेली होती. तिनें घरामागें आंब्याच्या झाडाकडे जाणेंच बंद केलें. तिघांनाहि सामाधन वाटलें.

दुसऱ्या वर्षी सून गरोदर राहिली. सून गरोदर झाल्यानंतर

लगेच अंबादासाला स्वप्नांत तो सोमदत्त प्रथमच दिसला व त्यानें 'तुझा वंश मी वाढूं देणार नाहीं' अशी निश्चयवाणी क्रोधमुद्रेनें अंबापासाला ऐकवली. अंबादास मनांत भ्याला व सुनेला फारच जपण्याविषयीं पत्नि व मुलगा यांना त्यानें सूचना दिली. मुलालाहि बापाप्रमाणेंच स्वप्नांत सोमदत्त दिसूं लागला होता. अंबादासापेक्षां मुलगाच यामुळें फार भ्यालेला होता. सुनेला कांहींच कल्पना नव्हती. सासू मूग मिळून स्वस्थ होती पण सुनेच्या प्रकृतीवर लक्ष होतें.

थाटामाटानें सुनेचें डोहाळजेवण झालें. पण पुढें सुनेला ती एकटी असतांना, पाणी आणण्यास जातांना, रात्रीं झोपल्यानंतर एक सर्प आपणाला चावण्यास येत आहे असा भास होऊं लागला. एक दोन वेळां तर प्रत्यक्ष सर्पच तिला दिसला व ती त्या भयानेंच आजारी पडली. सोमदत्त हा सूड उगवीत आहे याची बिचाऱ्या सुनेशिवाय सर्वांना जाणीव होती. सून यथाकाळीं प्रसूत झाली. उत्तम सुदृढ पुत्र झाला. नामकरण झालें व त्याच दिवशीं रात्रीं पाळण्यांत झोंपविलेला मुलगा, सकाळीं मृतावस्थेंत आढळला या पुत्रनाशानें सुनेला फार दुःख झालें पण अन्य तिघांना याचें मर्म माहीत असल्यानें तीं काय करावें अशा संकटांत सांपडलीं होती. अशा प्रकारें सुनेला ८ अपत्यें झालीं व मृतहि झालीं शेवटीं ९ वें मूल जगलें. पण त्याच वर्षी अंबादासाची पत्नि थोड्याशा आजारानें कालावश झाली.

पत्नीच्या मृत्यूनें व सोमदत्ताच्या भयानें अंबादास अगदीं खंगला होता. मुलगाही पश्चात्तापानें पोळत होता. पण वस्तुस्थिति सुनेला सांगणें त्यांना जड जात होतें. सून मात्र देवधर्म,

व्रत-वैकल्यें निष्ठेनें करीत असे.

अंबादासाचें पशुधन बरेंच होतें. एके दिवशीं दोनप्रहरीं एकाएकीं गुरांच्या गोठ्याला आग लागली. सर्व गुरें जळून मेलीं. तेथें अंबादासाला सायंकाळीं एक सर्प दिसला व लगेच गुप्त झाला. दुसरे दिवशीं अंबादासाचा मुलगा सर्पदंशानें मरण पावला. पतिनिधनाच्या दु:खानें त्याची बायको, अंबादासाची सूनही विहिरींत उडी टाकून पतिमागें गेली व अंबादास एकटाच नातू संभाळीत मागें राहिला.

नातू १५ वर्षांचा झाल्यावर अंबादासानें त्याचा विवाह केला व त्याच दिवशीं रात्रीं अंबादास सर्पदंशानें मरण पावला. यानंतर नातवाचे कांहीं दिवस बरे गेले. गांवच्या लोकांनाही समाधान झालें. परंतु अंबादासानें कांहींतरी दुष्कृत्य केलें असलें पाहिजे व त्याचेंच फळ त्याला भोगावें लागलें असा लोकसमज झालेला होता आणि त्याच्या मृत्यूने तें पाप संपुष्टांत आल्यानें आतां त्याचा वंशज जो नातू तो तरी सुखी राहील अशी लोकांची भावना होती. मात्र अंबादासाचें दुष्कृत्य कोणतें असेल याबद्दल गांवांत निरनिराळ्या कल्पना होत्या. जो तो आपलीच कल्पना बरोबर असल्याची ग्वाही देई आणि निरुद्योगी लोकांचा तो एक चर्चेचा विषयच झालेला होता.

अंबादासाचा नातू २० वर्षांचा झाल्यावर त्याच्या दुर्दशेला आरंभ झाला. गांवांत घर, शेतजमीन आणि शेजारच्या गांवीं व्यापारी पेढी यामुळें त्याला पोटाचा प्रश्न नव्हता. पण विवाहा-नंतर त्याला बालपणाच्या स्मृति सतावू लागल्या. त्याला कुठेंही नेले तरी आपणांमागें कोणीतरी विचित्र आकृति उभी असून

तिचा हेतु शुद्ध नाहीं असा भास होत असे. रात्रीं स्वस्थ निद्रा सुद्धां मिळत नसे. क्वचित पत्नीला घरांत दृश्यें दिसत. कधीं सर्प तर कधीं पिशाच्च तर केव्हां क्रुद्धमुद्राधारी ब्राह्मण. तिनें पतीला याची कल्पना दिली. पतीनेंही पत्नीला विश्वासांत घेऊन आपल्या पितामहापासून घडलेल्या घटनांची कल्पना दिली व कांहींतरी संकट पुढें असल्याचें सांगून पत्नीला धीर दिला. या पुन्हां उद्‌भवलेल्या संकटाचा नाश करणेसाठीं त्यानीं पुष्कळ व्रतें, देवधर्म केले पण पण व्यर्थ ! याच अवस्थेंत पत्नीला एक पुत्र झाला पण नामकरणापूर्वींचे तो रात्रौ अंथरुणांत गत:प्राण आढळला. उभयतांना हें दु:ख जाणवलें. यावर उपाय म्हणून देशांतर करून रहावें असा पत्नीच्या पित्यानें सल्ला दिला व उभयतां कन्याकुमारी येथें श्रद्धापूर्वक राहिली.

अंबादासाचा पौत्र पत्नीसह कन्याकुमारीला राहून तेथें कन्याकुमारीची सेवा करूं लागला. उभयतां धर्माचरणानें वागून 'आजोबानें केलेल्या पापकर्मांतून सोडव. त्याच्या मृत्यूमुळें त्याला योग्य ती शिक्षा मिळाली आहे. आपले मातापिताही यांतून मुक्त नव्हती. आतां आम्हाला तरी मुक्त ठेव' अशी त्या अज्ञात शक्तीची आणि देवी कन्याकुमारीची अखंडपणें विनवणी करून रहात.

कन्याकुमारीला असतांना पत्नीला २-३ वेळां गर्भसंभव झाली. पण प्रत्येक वेळीं एक सर्प आसपास राहून तिला भिववी. स्वप्नांत अशा प्रकारच्या त्रासांनीं संततिसुख त्यांना लाभलें नाहीं. एके दिवशीं त्या क्षेत्रांत एक साधुपुरुष आला व कन्याकुमारी मंदिरांत राहिला. त्याचें दर्शन घेतल्यावर अंबादासाच्या

नातवास तो साधु म्हणाला, " तुला आयुष्याचे अखेरीस एक पुत्र होईल. मात्र येथील सेवा सतत सुरू राहूं दे." तीं त्याप्रमाणें तेथें राहिलीं.

खरोखरच त्यांना एकच पुत्ररत्न झालें आणि कांहीं महिन्यांतच उभयतांना देवीदर्शन घेऊन घरीं येत असतां घराचे पायरीवरून पडल्यानें मृत्यु आला. या घटनेमुळें मूल अनाथ झालें. त्याचा शेजाऱ्यानें सांभाळ केला. मुलगा तेथें शिकूं लागला. चांगला ज्ञानी झाला, आणि त्याला आपल्या मातापित्याची सर्व हकीकत लोकांकडून कळली. पण मातापिता मूळचे दुसरीकडचे होते हेंही त्याला आढळून आलें. हा अंबादास प्रपोत्र आपल्या पूर्वजांचे गांवीं चौकशी करीत करीत आला व तेथें शुचिंद्रमक्षेत्रीं त्याच्या पूर्वजांचें घर, शेती व शेजारचे गांवीं व्यापारी पेढी असल्याचें ग्रामस्थांकडून त्याला कळलें.

गांवच्या वृद्ध माणसाकडून त्याला सर्व मूळ वृत्तांत समजून आला. कन्याकुमारी येथें विद्वान ब्राह्मण गुरूकडे विद्याप्राप्ति झाल्यानें हा मुलगा सत्प्रवृत्त झालेला होता. सर्वांचा निरोप घेऊन तो एकटाच रात्रीं आपल्या मूळ घरीं आला व कांहीं कमीजास्ती प्रकार समजून येतो कीं काय यासाठीं एकटाच त्या घरांत जागृत राहिला.

मध्यरात्रीचे सुमारास त्यासमोर एक तेजस्वी ब्राह्मण उभा राहिला. " तूं जिज्ञासेनें येथें आलास याचें मला कौतुक वाटतें पण मी कोण, कोठला ? तुझ्या पूर्वजाची अशी दु:स्थिति कां झाली ? याचा तपास तुला जमणार नाहीं आणि मीही तुला सुखानें राहूं देणार नाहीं एवढें जाणून हा " अशी रागीट मुद्रेनें

धमकी देऊन अदृश्य झाला. थोड्या वेळानें सारें घर आगीनें पेटत असल्याचें दिसलें. तो घाबरून बाहेर धांवला. तेथें घरासमोर तोच ब्राह्मण त्याकडे पाहून हंसत असल्याचें दिसलें. दुसरे दिवशीं हा अंबादासाचा पणतू इतर व्यवहाराच्या चौकशीला लागला.

शेती, व्यापारी पेढी यांचा व्यवहार ध्यानीं घेऊन तो पुन्हां रात्रीं एका शेजाऱ्यास सोबत घेऊन पुन्हां त्याच घरांत राहिला. त्या रात्रीं त्याला आंब्याच्या झाडाखालीं पुरलेला असा तोच ब्राह्मण दिसला. थोड्या वेळानें देवघरांत एक द्रव्याचा हंडा असल्याचें त्याला दिसलें. शेवटीं तो ब्राह्मण देवघरांत संध्या करीत असलेला दिसला. कांहींतरी 'समंध पीडा' आहे हें ध्यानीं घेऊन हा 'पणतू' कन्याकुमारीला निघून आला. या समंधाचा बंदोबस्त झाल्यास आपल्या मागचा त्रास चुकेल ही त्याची खात्री होती.

त्यानें कन्याकुमारी क्षेत्रांतील निरनिराळे मांत्रिक बोलावले व त्यांना आपल्या कल्पनेप्रमाणें आलेला अनुभव सांगून कांहीं उपाय सांगण्याची विनंति केली. मंत्रविद्या पारंगत असे बरेच ब्राह्मण तेथें जमले होते. त्यांनीं उपाय सांगण्याचें व त्यानुसार ही समंधपीडा दूर करून त्याला निर्धास्त करण्याचें वचन दिलें. यासाठीं त्या ब्राह्मणांनीं १ महिन्याची मुदत मागून घेतली व ते कामाला लागले.

एक महिन्यानंतर त्या सर्व मंत्रवेत्त्या ब्राह्मणांनीं मोठें हवन करून आपल्या समजुतीप्रमाणें ही समंध पीडा नष्ट केली. पणतू पण त्रास होत नसल्यानें निर्भय झाला. यानंतर त्याचा त्याच

गांवीं विवाह झाला आणि तो सुखानें राहूं लागला.

दुसरे वर्षीं या पणतूच्या पत्नीला पुत्रप्राप्ति झाली. पुत्राचा नामकरण विधि झाला व त्याच रात्रीं हा पणतू झोंपलेला असतांना अंथरुणासह जळून मृत्यु पावला. त्याच्या पत्नीला त्याचवेळीं सोमदत्त ब्राह्मण स्वप्नांत दर्शन देऊन म्हणाला, "केवळ या पुत्र जन्मासाठींच याच्या बापाला मी अद्यापि जिवंत ठेविलें होतें. या मुलाचीही पण तो पितृपदाला पोंचतांच अशीच गत होईल."

हा ५ वा अंबादास वंशज मातेच्या कृपाछत्राखालीं वाढला. गांवच्या ब्राह्मणांनीं त्यांना सर्व संरक्षण दिलें. मुलाचा यथाकाळ व्रतबंध झाला आणि तेथील गुरुगृहीं विद्याध्ययन करूं लागला. या अवधींत समंधपीडा आपल्या मंत्र शक्तीनें नष्ट करूं पाहणारे सर्व मंत्रवेत्ते ब्राह्मण, सोमदत्तानें हरप्रयत्नांनीं अंध बनवून सोडले होते आणि त्यांना, आपण ही शिक्षा दिली असल्याचेंही बजावून ठेवलें होतें.

हा ५ वा वंशज २० वर्षांचा झाला तेव्हां त्याचाही विवाह तेथील एका ब्राह्मण कन्येशीं झाला व तो त्या क्षेत्रांत कन्याकुमारी देवीवर श्रद्धा ठेवून, इतरांबरोबर यात्रेकरूंचीं धर्मकृत्यें करून आपला उदरनिर्वाह करीत होता. यथाकाळ त्याच्या पत्नीला पुत्र झाला व हा ५ वा वंशज समुद्रस्नानाचे वेळीं बुडून मरण पावला.

अंबादासाचा ६ वा वंशज हा जन्मकालींच पितृहीन होता. मातेनें त्या गांवच्या लोकाश्रयावर मुलाला वाढवून त्याचा व्रतबंध करविला आणि त्याला घेऊन ती रामेश्वर क्षेत्रीं येऊन

राहिली. तेथें एका आश्रमांत मुलाचें शिक्षण झालें व तो माते-सह तीर्थयात्रा करीत काशीला निघून गेला. यावेळपर्यंत त्याला किंवा मातेला सोमदत्ताकडून कोणताच त्रास झालेला नव्हता. काशीला विश्वनाथ मंदिराजवळ त्यांनीं झोंपडी बांधून गंगा-घाटावर आपला मुक्काम ठोकला. मातेच्या आज्ञेवरून त्यानें शिवाराधना आरंभिली व तेंच व्रत करून मुलाचें पुण्यबल वाढवूं लागली.

काशीला असतांना या मातापुत्रांना भोजनसमयीं अन्नाला दुर्गंधी येणें, त्यामुळें भोजन न करणें, पाणी रक्तासमान भासणें व तृष्णा न भागणें असे कष्ट सहन करावे लागले. रात्रौं झोप-डींत वाघ–सिंह दिसणें, उशाजवळ मांस, विष्ठा दिसणें वगैरे प्रकारें त्यांना शिव उपासनेपासून परावृत्त करण्याचे प्रकार सोमदत्तानें करून पाहिले परंतु, अत्यंत श्रद्धेनें त्या मातापुत्रानें हें सर्व सहन करून आपली शिवाराधना अखंड चालू ठेविली. देहानें तीं कृश बनलीं पण त्यांच्या चर्येवर उपासनेचें तेज विखुरलेलें स्पष्ट दिसत असें. शेवटीं एका रात्रीं उभयतांना स्वप्नांत शिवदर्शन झालें व कन्याकुमारी क्षेत्रीं राहून, देवीसेवा करण्याची आज्ञा शंकरांनीं केली.

शिवाज्ञेनुसार ही उभय मातापुत्र मोठ्या धर्मश्रद्धेनें पुन्हां कन्याकुमारी येथें येऊन राहिलीं. तेथें मूळच्याच लोकांनीं त्यांना आश्रय दिला व देवी कन्याकुमारीची सेवा करून उभयतां राहूं लागलीं. तेथें या मुलाचा विवाह झाला. हीं तिघेजणें देवीसेवेंत मग्न असत.

सोमदत्त सांवलीप्रमाणें या सर्वांवर दृष्टि ठेवून होता. एके

दिवशीं सासू उपवासानें भूक सहन न होऊन गतप्राण झाली व उभय पतिपत्नि उरलीं. यांना छळण्याचे बेत सोमदत्त करीत होतांच. ती संधी त्याला लगेच मिळाली. पत्नि गर्भवति होतांच सोमदत्त तिला सर्परूपानें भीति दर्शवून, गर्भपात करण्याचे बेत आंखू लागला. पण ही पत्नी पितृकुळाकडून श्रीदत्तभक्त होती तिनें दत्तसेवाव्रत बालपणींच पित्याकडून घेतलेलें होतें. स्वतःचें उदरीं गर्भसंभव झाल्याचें ज्ञान होतांच, तिनें दत्तयोगीश्वराला विनविलें, "हे श्रीवल्लभा, हा पुत्र तुझ्याच सेवेला वाहीन. त्याचे रक्षणाची चिंता तुला!" आपली दत्तोपासना व्यर्थ होणार नाहीं याची तिला पूर्ण खात्री होती. आपल्या पतीलाही तिनें आपला मनोदय सांगून त्याची संमति घेऊन ठेवली.

देवी कन्याकुमारी व दत्तराजांची पतिपत्नीची उपासना चालू असतां, त्यांना एका अतिथीनें कांहीं दिवस आश्रय देण्याची विनंति केली. छद्मीवेषानें आलेला हा अतिथी सोमदत्त होता. त्याचें स्वागत झालें व घर त्याचेंच समजून त्यानें रहावें अशी त्या पतिपत्नीनें त्याला विनंति केली. सोमदत्त मनांतून खूष झाला. काशीक्षेत्रीं शिवसेवा सफल झाल्यानें व दत्तोपासना चालू झाल्यानें आपला डाव दुसऱ्या तऱ्हेनें कसा साधावा? याचा विचार त्या पतिपत्नीसन्निध राहून करण्याचें सोमदत्तानें ठरविलें होतें. अनुकूल संधीची तो वाट पहात होता.

अतिथी म्हणून आलेला ब्राह्मण ६ महिने झाले तरी जात नव्हता कीं तो जावा अशी उभयतांची इच्छाही नव्हती. असे दिवस जात असतांना ती पुत्रवति झाली व मुलाचें नांव 'राघवाचार्य' ठेवण्यांत आलें. यावेळपर्यंत सोमदत्ताला संधीच

मिळाली नाहीं व तो सूडभावनेनें पेटून गेला होता. अशा स्थितींत राघवाचार्य वाढूं लागला व मातापित्यांस संतोष प्राप्त झाला. अतिथी या मुलाचें कौतुक करून आपला डाव साधण्याची युक्ति शोधित राहिला होता.

राघवाचार्य २ वर्षांचा झाला. त्यावेळीं अतिथी यात्रा करण्याचें निमित्त करून निघून गेला. त्यावेळेपासून घरांत कपडे जळणें, रात्रीं अंगावरील वस्त्रें गुप्त होऊन नग्नावस्थेमुळें घराबाहेर पडणें कठीण होणें, पूजासाहित्य ऐन पूजाप्रसंगींच गुप्त होणें, देवी किंवा दत्तोपासनेसाठीं मंदिरांत जातेवेळीं दारांत अतिथी येणें व स्वयंपाकसमयीं भोजनसामुग्रीच नसणे वगैरे प्रकार होऊं लागले. केव्हां केव्हां राघवाचार्याला विचित्र व भयानक अशी दृश्यें दिसून, त्यानें एकदम किंकाळ्या माराव्या व त्याला शांत करण्यांत त्याच्या मातापित्यांची आराधना टळावी वगैरे उपयांनीं, सोमदत्त त्या मातापित्यांचा पुण्यसंचय संपुष्टांत आणूं लागला. कित्येक प्रसंगीं भोजनपात्रांत रक्तमांस पडून सर्वांना उपोषण घडावें. अर्थात क्षुधा, तृषा आणि खंडित उपासना यांमुळें जीवनाचा अंत करण्याचा विचार राघवाचार्याच्या पित्याचे मनीं वारंवार येई पण पत्नि त्याचें समाधान करी. अशा स्थितींत त्या पतिपत्नीला रात्रीं स्वप्नांत एक वृद्ध मुद्रायुक्त ब्राह्मण नेहमी दिसूं लागला. स्वस्थ झोपलेला छोटा राघवाचार्य रात्रीं, भयाकुल होऊन ओरडे यामुळें त्यांना स्वस्थ निद्रा मिळत नसे व त्यांना वेड लागण्याची पाळी आली.

गांवांतील ब्राह्मण यामुळें घाबरून गेलेले होते परंतु यावर उपाय करण्याचें धैर्य त्यांचेठायीं नव्हतें. कारण अंध झालेले



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ग्रंथ.
क्र. ५५९९८ नों. दि. १५/११/७५
वि. ...

त्यांचे पूर्वज हा पूर्वानुभव. अशा स्थितींत एके दिवशीं, देवघरांत राघवाचार्याचा पिता पूजेसाठीं गेला असतां, देव्हाऱ्यांत देवच नव्हते ! पुष्कळ शोध करूनही देव मिळेनात. तेव्हां राघवाचार्याच्या पित्यानें दुःख व क्रोध यांमुळें देव्हाऱ्यासमोर डोकें आपटून जीव दिला, पतीची ही अवस्था पाहून पत्नीनेंही तोच मार्ग अनुसरला. राघवाचार्य अनाथ झाला. शेजाऱ्यांनीं पुढील विधि आटोपले.

राघवाचार्य जरी अल्पवयी होता तरी त्याला मातापित्याची पक्की स्मृति होती. कांहींतरी दैवी आपत्ति कोसळून त्यांचा प्राणनाश झाला एवढें त्याच्या बालबुद्धीला आकलन झालें पण तें शब्दांनीं व्यक्त करून दाखविणें त्याला अशक्य होतें. तरीसुद्धां त्याच्या दृष्टीसमोर घडलेला प्रकार त्याच्या स्मरणांत राहिला.

ग्रामस्थांच्या आश्रयावर राघवाचार्य वाढत होता. आठव्या वर्षीं त्याचा व्रतबंध झाल्यावर तो गुरूंकडे विद्याध्ययन करू लागला दुपारीं एकवेळ भिक्षा मागून भूक भागवी आणि देवी कन्याकुमारी मंदिरांतच आपला विश्रांतीचा वेळ घालवी. रात्रौ तेथेंच निद्रा करी. स्वगृहीं जाण्याची त्याला इच्छाच होत नसे, देवी उपासनेबरोबरच योगिराज दत्तात्रेयांचें ध्यान तो करी. कुणीहि न सांगतां त्याला दत्तात्रेय उपासना करण्याची आवड उत्पन्न झाली होती. अशा प्रकारें १६ व्या वर्षीं त्याचें अध्ययन पूर्ण झालें व विद्यार्थी जीवनांतून, गुरूंनीं त्याला मुक्त करून उत्तम आशीर्वाद देऊन स्वतंत्रपणें रहाण्याची आज्ञा केली.

राघवाचार्य देवीमंदिरांतच मुक्काम ठोकून होता. कोणता स्वतंत्र व्यवसाय करून उदरनिर्वाह करावा याचा त्याला प्रश्न

पडला होता. विद्यार्थी जीवन संपल्यानें यापुढें भिक्षा मागणें त्याला अमान्य होतें. मातापित्याचा अंत त्याच्या पूर्ण स्मरणांत होता आणि, त्याचा छडा लावूनच मग आपल्या घरांत रहावें, तत्पूर्वी कन्याकुमारीची सेवा करून तिचा आशीर्वाद घ्यावा या हेतूनें त्यानें, केवळ तीर्थप्राशन करून तिचें ध्यान आरंभिलें. तो मंदिरांत एका कोपऱ्यांत ध्यानस्थ झाला.

सुमारें तीन महिने या अवस्थेंत राघवाचार्य होता. शरीर कृश झालें होतें परंतु, चेहऱ्यावर उपासनेचें तेज विलसर होतें. एका रात्रीं त्याला प्रत्यक्ष कन्याकुमारी दर्शन झालें व शुचिंद्र-मक्षेत्रीं योगिराज दत्तगुरूंचे मातापिता मंदिरांत त्यांच्या दर्शनास जाणेंची आज्ञा राघवाचार्याला मिळाली. राघवाचार्य शुचिंद्रमला आला.

राघवाचार्याची उपासना सोमदत्ताला कांहींच करूं देईना उलट, त्यालाच ती मारक ठरूं लागली. त्यामुळें राघवाचार्याला त्यानें कोणताच त्रास दिलेला नव्हता. शुचिंद्रमला येत असतां वाटेंत नदी पार करून जातांना मात्र त्याला पाण्यांत बुडवून ठार करण्याचा सोमदत्तानें प्रयत्न केला पण, त्याचे रक्षणासाठीं प्रखर तेज त्याजवळ वावरत असल्याचें त्याला आढळून आलें व सोमदत्त भयभीत झाला पण त्यानें आपला हेतु सोडला नाहीं.

देवी अनुसूया मंदिरांत येऊन राघवाचार्यानें, अनुसूयादर्शन घेतलें, आपला हेतु कथन केला आणि सर्व क्लेश मुक्त करण्याची विनंति केली.

त्याच रात्रीं प्रत्यक्ष दत्तात्रेयांच्या मातापित्याचें राघवा-चार्याला दर्शन होऊन त्याची इच्छा पूर्ण करण्याचें वरदान

मिळालें. "बाळ, तूं गिरनार पर्वतावर जाऊन ध्यानस्थ असलेल्या दत्ताचें दर्शन घे व हें कमलपुष्प त्याला दे म्हणजे तो सर्व समजेल. तुला क्षुधातृषादि कष्ट होणार नाहींत. सुखी रहा."

आज्ञेप्रमाणें दुसरेच दिवशीं, राघवाचार्य कमलपुष्प घेऊन निघाला. एक महिन्यानें तो गिरनार पर्वतपायथ्याशीं पोंचला. तेथें वनराज त्याची वाट अडवीत पण कमलपुष्प त्याचे हातीं पाहतांच ते मुकाट्यानें दूर होत. शेवटीं तो ध्यानमग्न दत्तात्रेयां-समोर येऊन उभा राहिला.

राघवाचार्य समोरील ध्यानमग्न अशा तेजस्वी व प्रसन्न-मुद्रायुक्त दत्तराजांकडे, अतृप्त दृष्टीनें पहात हात जोडून उभा राहिला. ज़वळच कांहीं श्वान व गोमाता स्वस्थ बसलेली होती. योगासन घालून ध्यानस्थ झालेल्या त्या मूर्तीला तीन शिरें आहेत कीं एक ? सहा हात आहेत कीं दोनच ? अशा संभ्रमांत तो पडला होता. कारण तो पाही तसें तें दत्तध्यान त्याला दिसे. त्रिशूळ, डमरू, पोथी, रुद्राक्षमाला व कमलपुष्प एकेक हातांत होतें. सहावा हात कमंडलूवर ठेवलेला होता. पण दोनच हातांची कल्पना केल्यास मात्र, ते नमस्कारासाठीं जोडलेले दिसत. भालप्रदेशीं भस्म दिसे तर कधीं चंद्रही भासे. मस्तकाच्या मागील बाजूस प्रकाशवलय चकाकत होतें. राघवाचार्य तें सुन्दर रूप पाहून देहभान हरपला. आपण येथें कां आलों याचेंही त्याला भान उरलें नाहीं. रक्तवर्णी कमलपुष्प हातीं धरून उभय कर जोडलेल्या अवस्थेंत राघवाचार्य कांहीं क्षण उभा राहिला.

एकाएकीं दत्तराजांची समाधी भंग पावली. त्यांनीं नेत्र उघडून समोर दृष्टि फेंकली. कमलपुष्प पाहतांच त्यांनीं माता-

पित्यास प्रणाम केला व राघवाचार्याच्या मस्तकावरून प्रेमळ हात फिरविला. त्याबरोबर राघवाचार्य शुद्धीवर आला. त्यानें त्वरेनें हातचें कमलपुष्प दत्तराजांपुढें ठेवत साष्टांग प्रणिपात केला.

" वत्सा, उठ ! मला सर्व कांहीं समजलें आहे. तुझे सर्व क्लेश नष्ट होतील. तूं पूर्ण सुखी व निर्भय होशील." दत्तराजांनीं राघवाचार्याला उठवून म्हटलें.

" हे योगीश्वर, माझ्या मातापित्यांनीं कोणतें दुःष्कर्म केल्यानें त्याना घरांतील देवांसमोर प्राणत्याग करावा लागला हें जाणून घेण्याची इच्छा आहे."

" राघवा, तुझे ६ पूर्वज हे कामक्रोधादि षड्रिपुंचेच जन्म होते. त्यांतल्या पहिल्यानें वेदविद्यापारंगत व उत्तम मंत्रवेत्त्या अशा सच्छील ब्राह्मणाची कपटानें, द्रव्याभिलाषेनें स्वगृहीं तो निद्रिस्त असतां हत्त्या केलेली आहे. तो सोमदत्त ब्राह्मण होता व तुझा पूर्वच अंबादास हा होता. या अंबादासानें केलेल्या या ब्राह्मण हत्येमुळें तो समंध होऊन तुझ्या पूर्वजांना छळीत होता. अत्यंत नीतिमान, सर्वविद्या व कला यांनीं परिपूर्ण आणि शिव-भक्त अशा त्या ब्राह्मणाचें द्रव्य, तुझ्या अंवादास नामक पूर्वजानें गिळंकृत केलें. त्याचा सूड म्हणून तो सोमदत्त ब्राह्मण समंध झाला आहे. तुझ्या कुलाचा वंशच्छेद करण्याचा त्याचा निर्धार होता."

" योगिराज, समंध म्हणजे काय ? "

" वत्सा, समंध म्हणजे जोड, किंवा परद्रव्य द्रव्य हरण. "

" मग महाराज, ही समंध पीडा नष्ट होण्यासाठीं मी काय करूं ? "

" राघवा, समंधपीडानाशार्थ मोठा यज्ञ कर. शुचिंद्रम क्षेत्रांतून कोणी विद्वान मंत्रवेत्ता ब्राह्मण प्राप्त कर, मग त्याच्या पीडेंतून मुक्त होशील. "

" हे देवाधिदेव, माझे ते पूर्वज मुक्तीला कसे जातील ? उपाय सांगावा. " " यज्ञकार्य चालू असतां सोमदत्त ब्राह्मणाची विद्याशक्ति नष्ट होत जाईल व कोपिष्ट ब्राह्मण स्वविद्यासामर्थ्य नष्ट झाल्यानें त्याच यज्ञकुंडांत आत्मार्पण करील. मग ही समंधपीडादग्ध असे तुझे पूर्वज, त्यांनींच आचारिलेल्या तपः-सामर्थ्यानें मुक्ति पावतील. "

" हे पतितोद्धारका, आणखी कांही आज्ञा ?"

" वत्सा, तुझ्या मूळ गृहांत शुचिंद्रमक्षेत्रांत त्या सोमदत्त ब्राह्मणाचें प्रेत मागील बाजूला बाजूला एका आम्रवृक्षाखालीं, पुरलेलें आहे. तो आम्रवृक्ष तेव्हांपासूनच फलहीन झालेला आहे. तेथें यज्ञांतील विभूति नेऊन टाक म्हणजे ती जागा शुद्ध होईल."

" हे भगवान, पण तें द्रव्य कसें परतफेड करूं ? हें परद्रव्य कुठें असेल ? "

" वत्सा, तुझ्या शुचिंद्रमच्या घरांतल्या देवगृहांत तें पुरलेलें आहे. तें वर काढ व विद्वान परंतु सत्पात्र ब्राह्मणांना दान दे. यामुळें कोणताच दोष उरणार नाहीं "

राघवाचार्यांने हात जोडले. दत्तगुरूंनीं सांगितलेलें ध्यानीं ठेवून तो निघण्याची आज्ञा मागूं लागला. तेव्हां दत्तात्रेयांनीं

त्याला दोन कमलकंद खाण्यास दिले. कमंडलूंतलें शुद्धजल प्राशन करायला लावले. त्याच्या मस्तकावर हस्त ठेवून आशीर्वाद दिला. त्याबरोबर राघवाचार्यांचा कृश देह सुदृढ झाला. साष्टांग प्रणिपात करून तो निघाला.

गिरनारच्या पायथ्याशीं येतांच सोमदत्त त्यापुढें उभा राहिला. अत्यंत क्रोधायमान होऊन मोठ्या कर्कश आवाजांत राघवाचार्याला म्हणाला, "दत्तराज हे माझे वैरी. त्यांच्या कृपेनें माझ्या त्रासांतून बचावलास ! पण लक्षांत ठेव, माझा नाश करणें तुला जमणार नाहीं."

राघवाचार्य हंसला. "हे सोमदत्ता, माझ्या पूर्वजाना छळलेंस. अजून तुझा क्रोध शमला नाहीं कां ? क्षमा हें ब्राह्मणाचें शस्त्र, पण तू मात्र विद्यासंपन्न असून व्यर्थ झालास."

"राघवाचार्या, माझ्या संसाराच्या सर्व इच्छा अतृप्त राहिल्या. माझें द्रव्य लुबाडून वर माझा कपटानें घात केला तुझ्या अंबादास पूर्वजानें. त्याचा हा सूड आहे"

"सोमदत्ता, माझ्या पूर्वजाचें हें कृत्य अक्षम्य आहे. ब्राह्मणाला अयोग्य आहे. पण छळलेंस तेवढें पुरें. मला त्यांच्या मुक्तीची इच्छा आहे. कृपा कर. आणि तूं आपली कर्तृत्वशक्ति स्वतःच्या मोक्षासाठीं उपयोगिली असतीस तर या योनींतून तरी सुटला असतात. वर जा आणि त्या योगेश्वराचे पाय धर."

राघवाचार्य आपल्याला दबणार नाहीं हें सोमदत्तानें ओळखलें. "माझ्या वैऱ्याचे पाय धरूं ? तें अशक्य आहे. आणि तुझा हेतु साधणेंही अशक्य हेंही लक्षांत ठेव."

"ठीक आहे. तो दत्ताराज तुला सुबुद्धि देवो" राघवा-

चार्यानें आपला रस्ता धरला. सोमदत्त निराश होऊन, सूड भावनेनें पेटलेला असा त्याच्या मागोमाग निघाला.

राघवाचार्य मार्गक्रमण करीत शुचिंद्रम क्षेत्रीं परतला. अत्रीअनुसूया दर्शन घेतलें. दत्तराजांची आज्ञा कथन केली व रात्रीं तेथेंच राहिला. त्याच रात्रीं त्या मंदिरांत एक पांथस्थ मुक्कामाला राहिला होता. सहज गप्पा करतां करतां राघवाचार्याला कळलें कीं तो पांथस्थ आपल्या शोधासाठीं, कन्याकुमारीला गेला होता. तेथें देवी कन्याकुमारीमंदिरांत निजला असतां त्याला शुचिंद्रम क्षेत्रीं जाण्याची सूचना मिळाली होती. अंबादासानें चालविलेल्या, व्यापारी पेढीचा हिशेब व द्रव्य सांठा देण्यासाठीं हा मूळ मुनिमाचा वंशज राघवाचार्याच्या शोधांत असतां आतां भेटला होता.

राघवाचार्यानें त्याला आपली ओळख पटविली व स्वतः बरोबरच राहण्याची त्या मुनीमाला सूचना दिली. दुसरे दिवशीं उदईक आपले देहधर्म उरकून व कन्याकुमारी तसेंच दत्तप्रार्थना आटोपून दोघेहीं क्षेत्रांतील विद्वान व मंत्रविद्या पारंगत ब्राह्मणाच्या शोधार्थ निघाले. लवकरच त्यांना तसा योग्य ब्राह्मण मिळाला. त्याची भेट घेऊन, राघवाचार्यानें त्याला सर्व पूर्वकथा निवेदन करून, यज्ञकर्म करण्यास त्याची मान्यता मिळविली. त्या ब्राह्मणानें एका शुभमुहूर्तीं सर्व सिद्धता करण्याचें मान्य करून तेथपर्यंत थांबण्यास उभयतांस सांगितलें. उभयतां तेथेंच राहिले.

नियुक्त मुहूर्तावर राघवाचार्यानें ब्राह्मणद्वारां सर्व सिद्धता करून यज्ञकर्मास आरंभ केला. पहिला दिवस व्यवस्थित पार

पडला. दुसरे दिवशीं एकंदर ब्राह्मणांनीं एकमुखानें सोमदत्तास यज्ञवेदीसमोर हजर होण्यास आवाहन केलें. सोमदत्त लगेच देहरूपानें प्रकट झाला व मोठ्यानें गर्जून म्हणाला, " हे राघवा आणि ब्रह्मवृंद हो, मी अथर्ववेदपारंगत असा उत्कृष्ट मंत्रवेत्ता ब्राह्मण आहे. तुमचा यज्ञहेतु सिद्ध होणार नाहींच पण, मीच तुमचा या यज्ञांत बळी देईन.'

आचार्य ब्राह्मण हंसला व सोमदत्ताला प्रत्युत्तर न देतां कामाला लागला. राघवाचार्य स्वस्थ बसून सारें पहात होता. सोमदत्त कोणतें विघ्न आणतो या विवंचनेंत तो होता. आचार्य ब्राह्मणाबरोबर अन्य ब्राह्मण समंत्रक यज्ञकर्म करूं लागले. त्यांच्या मंत्रांना तितक्याच प्रभावीपणें प्रतिमंत्रांनीं सोमदत्त प्रत्युत्तरें करून यज्ञ निष्प्रभ बनवू लागला. सर्व ब्राह्मण चिंतित झाले. दुसरा दिवस यांतच संपला.

राघवाचार्य चिंतायुक्त मनानें रात्रीं निद्रा न घेतां श्रीदेवी कन्याकुमारी व योगीराज दत्तांचा धांवा करूं लागला. मध्यरात्रीचें सुमारास राघवाचार्याला मंदिराचे गर्भागारांतून मंद प्रकाशकिरण दिसूं लागले. जणु ज्योत्स्नाच ! हळूहळू ते किरण त्याच्याच दिशेने सरकत अगदीं जवळ आले व त्याला हांक ऐकूं आली, " वत्सा, राघवा लक्षपूर्वक ऐक, उदईक एका ब्राह्मणाला गांवच्या पंचक्रोशींत पाठवून तीन दिवसांच्या प्रसूत स्त्रीचें मूत्र मिळव. तें सोमदत्त बसण्याचे जागीं शिंपडून ठेव. आणि सोमदत्त तुम्हांला मंत्रानींच प्रतिकार करीत असतां, त्याच्या नकळत तें मूत्र त्याचे देहावर शिंपडून द्या असें आचार्यांस सांग उद्यां मूत्र मिळविण्यांत १ दिवस जाईल. परवां ही कृति होतांच सोमदत्त निष्प्रभ होऊन, यज्ञ हेतु सिद्धीस जाईल. आमचा तुला

चार्यानें आपला रस्ता धरला. सोमदत्त निराश होऊन, सूड भावनेनें पेटलेला असा त्याच्या मागोमाग निघाला.

राघवाचार्य मार्गक्रमण करीत शुचिंद्रम क्षेत्रीं परतला. अत्रीअनुसूया दर्शन घेतलें. दत्तराजांची आज्ञा कथन केली व रात्रीं तेथेंच राहिला. त्याच रात्रीं त्या मंदिरांत एक पांथस्थ मुक्कामाला राहिला होता. सहज गप्पा करतां करतां राघवाचार्याला कळलें कीं तो पांथस्थ आपल्या शोधासाठीं, कन्याकुमारीला गेला होता. तेथें देवी कन्याकुमारीमंदिरांत निजला असतां त्याला शुचिंद्रम क्षेत्रीं जाण्याची सूचना मिळाली होती. अंबादासानें चालविलेल्या, व्यापारी पेढीचा हिशेब व द्रव्य सांठा देण्यासाठीं हा मूळ मुनिमाचा वंशज राघवाचार्याच्या शोधांत असतां आतां भेटला होता.

राघवाचार्यानें त्याला आपली ओळख पटविली व स्वतः बरोबरच राहण्याची त्या मुनीमाला सूचना दिली. दुसरे दिवशीं उदईक आपले देहधर्म उरकून व कन्याकुमारी तसेंच दत्तप्रार्थना आटोपून दोघेहीं क्षेत्रांतील विद्वान व मंत्रविद्या पारंगत ब्राह्मणाच्या शोधार्थ निघाले. लवकरच त्यांना तसा योग्य ब्राह्मण मिळाला. त्याची भेट घेऊन, राघवाचार्यानें त्याला सर्व पूर्वकथा निवेदन करून, यज्ञकर्म करण्यास त्याची मान्यता मिळविली. त्या ब्राह्मणानें एका शुभमुहूर्तीं सर्व सिद्धता करण्याचें मान्य करून तेथपर्यंत थांबण्यास उभयतांस सांगितलें. उभयतां तेथेंच राहिले.

नियुक्त मुहूर्तावर राघवाचार्यानें ब्राह्मणद्वारां सर्व सिद्धता करून यज्ञकर्मास आरंभ केला. पहिला दिवस व्यवस्थित पार

पडला. दुसरे दिवशीं एकंदर ब्राह्मणांनीं एकमुखानें सोमदत्तास यज्ञवेदीसमोर हजर होण्यास आवाहन केलें. सोमदत्त लगेच देहरूपानें प्रकट झाला व मोठ्यानें गर्जून म्हणाला, " हे राघवा आणि ब्रह्मवृंद हो, मी अथर्ववेदपारंगत असा उत्कृष्ट मंत्रवेत्ता ब्राह्मण आहे. तुमचा यज्ञहेतु सिद्ध होणार नाहींच पण, मीच तुमचा या यज्ञांत बळी देईन.'

आचार्य ब्राह्मण हंसला व सोमदत्ताला प्रत्युत्तर न देतां कामाला लागला. राघवाचार्य स्वस्थ बसून सारें पहात होता. सोमदत्त कोणतें विघ्न आणतो या विवंचनेंत तो होता. आचार्य ब्राह्मणाबरोबर अन्य ब्राह्मण समंत्रक यज्ञकर्म करूं लागले. त्यांच्या मंत्रांना तितक्याच प्रभावीपणें प्रतिमंत्रांनीं सोमदत्त प्रत्युत्तरें करून यज्ञ निष्प्रभ बनवू लागला. सर्व ब्राह्मण चिंतित झाले. दुसरा दिवस यांतच संपला.

राघवाचार्य चितायुक्त मनानें रात्रीं निद्रा न घेतां श्रीदेवी कन्याकुमारी व योगीराज दत्तांचा धांवा करूं लागला. मध्यरात्रीचें सुमारास राघवाचार्याला मंदिराचे गर्भागारांतून मंद प्रकाशकिरण दिसूं लागले. जणु ज्योत्स्नाच ! हळूहळूं ते किरण त्याच्याच दिशेने सरकत अगदीं जवळ आले व त्याला हांक ऐकूं आली, " वत्सा, राघवा लक्षपूर्वक ऐक, उदईक एका ब्राह्मणाला गांवच्या पंचक्रोशींत पाठवून तीन दिवसांच्या प्रसूत स्त्रीचें मूत्र मिळव. तें सोमदत्त बसण्याचे जागीं शिपडून ठेव. आणि सोमदत्त तुम्हांला मंत्रानींच प्रतिकार करीत असतां, त्याच्या नकळत तें मूत्र त्याचे देहावर शिपडून द्या असें आचार्यांस सांग उद्यां मूत्र मिळविण्यांत १ दिवस जाईल. परवां ही कृति होतांच सोम. दत्त निष्प्रभ होऊन, यज्ञ हेतु सिद्धीस जाईल. आमचा तुला

पूर्ण आशीर्वाद आहे. प्रत्यक्ष देवी कन्याकुमारी व योगीराज दत्तात्रेय त्याला हें सांगत असल्याचें कळून आलें. त्यानें त्यांना प्रणाम केला. मन शांत झाल्यानें उत्तर रात्रीं स्वस्थ निद्राही मिळाली. प्रात:काळीं तो जागा झाला.

रात्रीं मिळालेल्या सूचनेप्रमाणें राघवाचार्यांनें तीन दिवसांच्या प्रसूत झालेल्या स्त्रीचें मूत्र मिळविण्यासाठीं एक ब्राह्मण पंचक्रोशींत पाठविला. सूर्योदयाला पुन्हां यज्ञारंभ झाला. सोमदत्त आजही आवाहन करतांच आला. गतदिवसाप्रमाणेंच त्यानें सर्व ब्राह्मणांना पराभूत केलें होतें.

पंचक्रोशींतून चवथ्या प्रहरीं ब्राह्मण प्रसूत स्त्रीचें मूत्र मिळवून आला. ते आचार्यांनीं जपून ठेवलें दुसरें दिवशीं तें सूचनेनुसार सोमदत्ताच्या आसनाखालीं शिपडून टाकलें. सोमदत्त आंत येऊन बसला. आचार्यांना स्वतंत्र सामर्थ्यानें आपला पराक्रम दाखवूं लागला. तो आतां रंगांत आला असतां त्यावर तें मूत्रपात्र फेकून त्याला मंत्रसामर्थ्यहीन करण्यांत आलें. तो अदृश्य स्पर्श होतांच सोमदत्त मोठ्यानें किंचाळू लागला. " घात केलांत, विश्वासघातानें मला फसविलेंत " असें ओरडून ओरडून शेवटीं त्यानें आपली मंत्रशक्ति अग्नीला अर्पण केलीं व हात जोडून स्वस्थ बसला.

" सोमदत्ता सूक्ष्मरूपानें या नरोटींत प्रवेश कर. तुला यांत बंद करून, ही नरोटी उलटी गाडून तुझा कायमचा बंदोबस्त करतों. चल. "

" आचार्या, मंत्रविद्यांहीन झाल्यानें आतां मी तुमचा ताबेआहे. पण मला विश्वासघातानें फसविल्याबद्दल तूं १२ वर्षे अंध होशील असा शाप देतों. सोमदत्तानें भूमीवर मोठ्यानें थाप

मारली. स्वत: सूक्ष्मरूपानें नरोटींत शिरला व आचार्य तत्काल अंध बनला. पुढील यज्ञकर्म आचार्यांच्या आदेशाप्रमाणें अन्य ब्राह्मणांनीं पूर्ण केलें व राघवाचार्य यज्ञसांगतेनें कृतार्थ झाला.

शेवटीं राघवाचार्यासह सर्व ब्रह्मवृंदांनीं दत्तराजाच्या चरणीं व देवी कन्याकुमारी चरणीं हें यज्ञफल अर्पण केलें. त्यावेळीं मंदिराच्या गर्भागारांतून आवाज आला. " राघवा, तुझे पूर्वज सद्गति पावले व तूंही मोक्षाला जाशील. आणखी कांहीं इच्छा?"

" हे दयाघना, मजसाठीं आचार्यांना अंधत्व आलें तें दूर व्हावें.' ' तथास्तु ! हा शाप १२ घटकांनीं नष्ट होऊन आचार्य डोळस होतील. गिरनार पर्वतावरील आज्ञेप्रमाणें पुढील व्यवस्था कर. आणखी काय हवें ?"

" भगवान ! त्या सोमदत्तालाही मोक्षपदाला न्यावा. जर तो कधीं मुक्त झाला तर आणखी कुणाचा तरी छळ करील."

" जशी तुझी इच्छा. त्याला गाडलेल्या ठिकाणीं यज्ञ वेदीं-तील विभूति टाक." राघवाचार्यानें त्वरेनें तेथें यज्ञविभूति टाकली सोमदत्त उद्धरून गेला. जातांना त्यानें राघवाचार्यांचे पाय धरले व क्षमा मागितली. उदार राघवाचार्यानें त्याला क्षमा केली. अशा प्रकारें तो सप्तपिढ्यांचा समंध उद्धरून गेला.

कन्याकुमारी क्षेत्रीं मंदिराचे उत्तरबाजूला जी प्रचंड शिळा दिसत तीच हा सोमदत्त समंध व त्या शिळेसमोर जी सहा जल-कुंडें दिसतात तेच राघवाचार्यांचेच पूर्वज होत. स्वत: राघवा-चार्यानें आपलें आयुष्य देवी उपासनेंत घालवून तेथेंच देह ठेविला. त्याची समाधीही तेथें आहे. प्रतिवर्षी कन्याकुमारी उत्सवानंतर राघवाचार्यांच्या समाधिवर निर्माल्य व दीप पेटवून ठेविला जातो. तो राघवाचार्यांच्या स्मृतीसाठीं असें भक्त सांगतात.

* * *

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. १५८ ६८ नों. दि ९.५.९.८९
वि. ...

मुलांनो ! आवडल्या ना, या गोष्टी ?

## अशाच चांगल्या
## मजेदार, बोधप्रद गोष्टींसाठीं
## खालील मंगल प्रकाशनें वाचा

| | |
|---|---|
| १. मंगल कथा १ | – मा. गो काटकर |
| २. मंगल कथा २ | – मा. गो. काटकर |
| ३. मंगल कथा ३ | – मा. गो. काटकर |
| ४. मंगल कथा ४ | – मा. गो. काटकर |
| ५. गोष्ट सांगते, ऐका १ | – सौ. मालती निमखेडकर |
| ६. गोष्ट सांगते, ऐका २ | – सौ. मालती निमखेडकर |
| ७. सुंदर गोष्टी | – मधुकर इंगळे |
| ८. तिरुपतीच्या कथा | – बाळकृष्ण बर्वे |
| ९. दक्षिणेतील देवकथा | – बाळकृष्ण बर्वे |

**उत्कृष्ट छपाई : आकर्षक सजावट**

**म्हणजेच**

IRBK-0115697

# मंगल प्रकाशनें

आजच वाचा